ॐ नमः श्रीलक्ष्मीकांताय ।

पांगारकर कृत

कुमारसिंह-कालिंदी

नाटक.

किंमत १ रुपया.

विजय छा० मुंबई.

ॐ नमः श्रीलक्ष्मीकांताय।

कुमारसिंह-कालिंदी नाटक.

अंक १ ते ६.



श्रीव्यंकटेशचरणं शिरसा प्रणम्य ॥
श्रीशारदां विमलब्रह्मसुतां तथैव ॥
श्रीसद्गुरुं सुखमयं पितरौ च कांक्षे ॥
यत्नो ह्ययं बुधजनादरभाजनं मे ॥

लेखक व प्रकाशक

सखाराम कृष्ण पांगारकर,

रा. पौड, जि. पुणें.

सन १९०५.] आवृत्ति पहिली. [शके १८२७.

किंमत १ रुपया.

हें पुस्तक
मुंबई येथें विजय छा० छापिलें.

प्रस्तावना.

विश्व रंगभूमीवर अविष्कृत होत असलेल्या जगन्नियंत्याच्या लीलेचें चित्र, भिन्न भिन्न रसाविर्भावानें दाखविण्यापासून मनाचें रंजन होऊन बोधाचा ठसाही हृत्पटलावर उमटतो. कारण दृग्गोचरापासून मनुष्याच्या मनावर जितका लौकर परिणाम घडतो तितका लौकर ऐकीव गोष्टीपासून किंवा वाचनाच्या परिशीलनानेंही होऊं शकत नाहीं. ह्मणूनच कविकुलगुरु कालिदास भवभूत्यादिकांनीं नाटकाच्या कल्पनेस जन्म दिला आहे. या त्यांच्या कल्पनेबद्दल आपण सर्व त्यांचे ऋणी आहों. अशा रीतीनें जनमनरंजन करण्याचें काम नाट्यकलाकुशल अशा अनेक आधुनिक कवींनीं आजपर्यंत केलें आहे व करीत आहेत. त्यांतच माझ्या सारख्या अल्पज्ञानें आपलें घोडें पुढें ढकलण्याचा प्रयत्न केलेला पाहून रसिक वाचक वर्ग खप्पा तर होणार नाहीं ना ! कारण—

भाषा गीर्वाण मोठी सुरुचिर–मधुरा–अर्थगांभीर्य युक्ता ॥
दुर्भाग्यें प्राप्त झाली लव न, मजविशीं होय साध्वी विरक्ता ॥
आलंकारें स्वभाषा नटवुं परि न तें शब्द–लालित्य ठावें ॥
सामुग्री अल्प ऐसी रसिक–बुध मनीं प्रेम कैसें उठावें ॥ १ ॥

असो. प्रस्तुतचें नाटक "कादंबरी कल्पद्रुम" मासिक पुस्तकांत छापून प्रसिद्ध झालेली "वीरेंद्रवीर अथवा कटोराभर रक्त" नांवाची कादंबरी आधारभूत घेऊन त्यावर तयार केलें आहे. कित्येक वाचक वर्गांनीं तिचा रसास्वाद घेतला असेलच, ह्मणून त्याचें संविधानक यांत देण्याचा प्रयत्न केला नाहीं.

बंगाली कादंबऱ्या मूळच्याच चटकदार आहेत, हें आज नव्यानें सांगावयास नको. परंतु मूळ कादंबरींत असलेला सुरसपणा अंशत: देखील दाखविण्याचें सामर्थ्य माझ्या लेखणींत नाहीं. असें असून मी हें धाडसाचें कृत्य हातीं घेतलें आहे, तरी रसिक व सूज्ञ जन याचा अगदींच अव्हेर करणार नाहींत, आणि माझा हा प्रथमचाच प्रयत्न आहें हें जाणून यांत जे कांहीं प्रमाद घडले असतील, त्याबद्दलही वाचकवर्ग मला क्षमा करतील अशी आशा आहे. पुस्तक छापतानांही बऱ्याच चुका झाल्या आहेत, पण त्या आज दुरुस्त करणें अशक्य असल्यामुळें तात्पुरतें शुद्धिपत्रक जोडिलें आहे. ईशकृपेनें पुनरावृत्तीचा योग आल्यास सुधारणा करण्याबद्दल अवश्य खबरदारी घेईन. अगाऊ आश्रयदात्यांसही विनय पूर्वक प्रार्थना आहे कीं, वचन दिलेल्या मुदतींत अनेक कारणांनीं माझे हांतून त्यांस हें पुस्तक सादर करतां आलें नाहीं, या बद्दल क्षमा असावी.

सदरहू पुस्तक संशोधनाचे कामीं, माझ्या एका परमप्रिय सन्मान्य व पदवीधर मित्रांनीं आपल्या कार्यातिक्रमांतील आपला अमोल वेळ खर्च करून पुष्कळ परिश्रम घेतले, याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहें. तसेंच पुस्तक छापत असतां मि. रा. रा. बापूराव खंडेराव जोशी यांनीं जे कांहीं श्रम घेतले याजबद्दल त्यांचा व विजय छापखान्याचें मालक रा. रा. गणेश नारायण जोशी यांनींही पुस्तक लौकर व चांगलें छापून देण्याचें मनावर घेतलें, तेव्हां त्यांचाही फार आभारी आहें. शेवटीं ज्या प्रभूंनीं माझा हा यत्न शेवटास नेला त्याजगदात्म्यास प्रेमानें वंदन करून हा अल्प लेख पुरा करतों.

मुंबई,
आषाढ वद्य ९ शके १८२७. } स. कृ. पांगारकर.

पुस्तकावरील अभिप्राय.

रा. रा. सदाशिव वासुदेव परांजपे, मॅनेजर–डायमंड सोप कंपनी, संपादक–उद्यमोत्कर्ष पुष्पमाला, मेंबर–ओ. यं. मे. असोसिएशन–टोकीओ (जपान) वगैरे वगैरे–मुंबई हे लिहितात–

...आपण लिहिलेलें "कुमारसिंह–कालिंदी" नांवाचें नाटक समग्र वाचून पाहिलें. आपला हा पहिलाच प्रयत्न असून तो फारच चांगला साधला आहे. संविधानक चटकदार व बोधपर असून भाषा सरळ, प्रयोगास योग्य अशी आहे. यांतील रसाचीं प्रमाणें चांगलीं मर्यादित आहेत, ह्या मुळें हें नाटक कुलीन स्त्रीयांनांही फारच प्रिय होईल. ह्याचा प्रयोग रंगभूमीवर झाल्यास हें लोकांस आवडतें होईल. एकंदरींत आपल्या ह्या नवीन नाटकानें मराठी भाषेची आपण अल्प पण चांगलीच सेवा बजावली, हें लिहिण्यास मला आनंद वाटतो.......

मुंबई.
ता. २३-७-०५.

आपला,
सदाशिव वासुदेव परांजपे.

मुंबईतील प्रसिद्ध '**विहारी**' **पत्राचे संपादक** लिहितातः–

...... सदर्हू पुस्तकाचें सविधानक मर्मभेदक असून भाषाही जोरदार आहे. स्त्रीपात्रांची भाषाही चांगली साधली आहे. नाटकांतील कथानक जरी काल्पनिक असलें तरी रा. पांगारकरांनीं आपल्या भाषेनें व विचारांनीं त्यास ऐतिहासिक स्वरूप आणण्याचा प्रयत्न केला आहे. नाटक रंगभूमीवर आणण्यास हें जरा मोठें झालें आहे, तरी एकंदरीनें नाटक चांगलें झालें आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं....विहारी, ता.३१-७-०५

परस्परांचा संबंध दाखविणारी
पात्रांची जंत्री.

पुरुष पात्रें.

सिंधुराज	... ...	कांचीपूरचा मूळ भूपति, योगीरूप धारण केलेला.
कमलनाभ	... ...	सिंधुराजाचा वडील मुलगा, चतुरसिंह नांवानें पुढें आलेला.
कुमारसिंह	... ...	सिंधुराजाचा मुलगा, कांतिवर्मानें पाळलेला.
द्युमत्सेन	... ...	कालिंदीचा भ्रतार व सिंधुराजाचा जामात.
मदन	... ...	कमलनाभ ऊर्फ चतुरसिंह याचा गुप्त हेर.
कांतिवर्म	... ...	सिंधुराजाचा कारकून व हल्लींचा कांचीपूरचा राजा.
विजयसेन	... ...	राजमंत्री.
भीमसिंग	... ...	सेनापति.
शांतिदुर्ग	... ...	एक सरदार.
बखत्सिंग	... ...	कांतिवर्म राजाचा खानगी दिवाण.
क्रूरसिंह, विश्वसेन, देवलनाथ, गुलाबसिंग	...	कांतिवर्म राजाचे विश्वासू सेवक.
सोमदत्त	... ...	एक नगरशेट.

मणिभद्र	... ...	त्याचा मुलगा.
विचित्रवीर्य चित्रसेन शामसुंदर	...	प्रजाजनांपैकीं सन्मान्य गृहस्थ.

स्त्री पात्रें.

कालिंदी	... ...	सिंधुराजाची मुलगी, कांतिवर्मानें पाळलेली.
कोकिला	... ...	कालिंदीची मैत्रीण.
शांता	... ...	कोकिलेची दासी.
राणी	... ...	कांतिवर्म राजाची पत्नी.
कमला	... ...	राणीची दासी.
पद्मिनी	... ...	कुमारसिंहाची पत्नी, शांतिदुर्गाची मुलगी.
चमेली	... ...	पद्मिनीची दासी.

यांशिवाय १ वृद्ध, दोन गोंवारी मुलें, चार भिल्ल व इतर शिपाई प्यादे वगैरे.

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	ओळी.	अशुद्ध.	शुद्ध.
१३	२०	तिच्या	त्यांच्या
१४	१८	करून	करून)
२०	१३	मिळेल. हो	मिळेल हो.
२७	६	पडत	पडली
२९	१०	उगारतो तो	उगारतो ती.
,,	१५	वहिनीलाही	वहिनीला ही
३०	३	क्रूरसिंहा,	क्रूरसिंह
३८	१६	क्रूरसिंह व शांतिदुर्ग	०
५५	३	वर कारतो	वर करतो.
६५	२२	हालून	हलालून
८०	२	रडून	रडून रडून
,,	२०	पाऊल	पाऊलच
८६	१६	पाहून	पाहून पाहून
११९	१२	तूं कोण ? आहेस बोल	तूं कोण आहेस? बोल.
१३१	१२	लता भुवि ॥	ल ही भुवि ॥
१३६	१३	राखिलीस तूं लाज	राखिलीस लाज
१३८	१०	भीति मुळ	भीति मुळं.
१५२	५	पैक	पैका
१५९	१८	कल्ह्याण	कल्याण

ॐ नमः श्रीलक्ष्मीकांताय ।

कुमारसिंह--कालिंदी नाटक.

प्रथमांक.

प्रवेश पहिला.

स्थळ--कांचीपुर, राजरस्ता.

पात्रें--शांतिदुर्ग, क्रूरसिंह, विश्वसेन व देवलनाथ.

शांति०--(प्रवेश करून) अती नीच काम करून पोटाची खांच भरणाऱ्या क्षुद्र जनांच्या मनोवृत्ती उच्चतम स्थितीला कधींही जाऊन पोंचणार नाहींत; त्याला जर सुसंगतीची जोड मिळेल, तर मात्र कालांतरानें तसें होण्याचा संभव आहे खरा. पण जेथें सुसंगतीची वाण, तेथें सज्जनाची घाण. राजा प्रजेचा पालनकर्ता ह्मणतात, पण तोच जर प्रजेस दुःख देऊं लागला तर त्यांनीं दाद कोणाकडे मागावयाची ? हल्लीं राजाच्या कुमार्गगामी वर्तनाचा लोकांना अतिशय वीट आला आहे. चांगल्या चांगल्या मुत्सद्दी लोकांस सध्यां 'हरी हरी' ह्मणत स्वस्थ बसण्याची पाळी येऊन, हलकट, व्यसनी व कार्यसाधु अशा लोकांचें त्याच्या भोंवतीं जाळें पसरलें आहे. ते जसें नाचवितील तसें नाचूं लागल्यामुळें प्रजेस कष्टद स्थिति प्राप्त झाली, न्यायपथ सुटला, कुलिन स्त्रियांच्या पातिव्रत्यास धक्का पोंचूं लागला, साधुसंतांवरची श्रद्धा उडत चालली, अनेक प्रकारच्या करभारानें गोरगरीब चिरडले गेले, एवंच राज्य चिरकाल टिक-

ण्याचें हें ठीक चिन्ह नव्हे. हिरा किती जरी चांगला असला तरी तो जसा ढेंकणाच्या संगतीनें भंग पावतो, तद्वत सध्यां राजाची स्थिति झाली आहे. अशा नीचाच्या सहवासाला राहून त्याची सेवा करण्यापेक्षां अरण्यवास काय वाईट ! मृत्यु तर त्याहून उत्तम ! जळो ती सरदारी आणि आग लागो त्या योग्यतेला ! तरवारीच्या धारेवरील मिष्टान्नापेक्षां गरिबींतील कदान्न फार उत्तम. सध्यांच्या या कामगिरीनें तूर्त माझ्या पांढऱ्या केंसांस बट्टा लागण्याची वेळ आली आहे खरी. धिःकार असो माझ्या कमकुवतपणाला ! पण आतां निरर्थक हळहळून काय उपयोग ? सेवकाला प्रिय वा अप्रिय कामगिरीही बजाविलीच पाहिजे. पहा, राजाच्या नीचपणाची किती तरी परमावधी झाली आहे ! आजपर्यंत राजकुमारी मानलेल्या सुकुमारीस तिच्या सौख्यसदनापासून भ्रष्ट करून तिला राजसेवेंत अर्पण करण्याची मला आज्ञा झाली; परंतु अशी अमंगळ कामगिरी मजसारख्या वृद्ध मनुष्यास कशी सांगावी, या बद्दलचा किंचित् तरी विचार त्याच्या अंतःकरणास शिवावयाचा होता; पण कामातुर मनुष्यास भय आणि लज्जा हीं कोठून असणार ? हायहाय ! ! मृगनयने कालिंदी ! साध्वी स्त्रियांना त्रिभुवनांत ज्यापेक्षां इतर अन्य वस्तु प्रियतर नाहीं, अशा तुझ्या सौभाग्यठेव्यापासून तुला हिरावून नेऊन निराधार करण्यास मीच कारण होणार काय ? खरोखर, या निर्घृण व दुष्ट कृतीस मी कधींही प्रवृत्त झालों नसतों; परंतु जामात कुमारसिंहाचा मोह मला नडत आहे. न जाणो, कदाचित् त्याच्यावर या कुलांगाराचा अकल्पित घाला येईल, ह्मणून या नष्टाची मी इतकी मनधरणी करीत आहे. नाहींतर तुझ्या सारख्या अबलेला जाणून बुजून दुःखसागरांत लोटून देण्याचें श्रेय मी

कधींही घेतलें नसतें. आतां या कामीं मी एकटाच असतों तर कशीही वेळ मारून नेली असती, पण आमचे साथीदार ह्मणजे राजाचे एक कुटिल व अधम मंत्री, मनुष्यरूपी केवळ राक्षसच–

क्रूर०–(एकदम येऊन) ए हरामखोरा थेरड्या, कोणाला ह्मणतोसरे राक्षस ? पुन्हां एकदां बोल पाहूं, ह्मणजे बत्तिसीच रंगवून टाकतों. (तरवार उपसतो)

शांति०–तूंच एकटा जिवंत आईचें दूध प्याला नाहींस. परीक्षा पहाणें असेल तर होऊं दे दोन हात या ह्मातान्याबरोबर. समशेर तयार आहे. (तरवार उपसतो.)

विश्व०—(इतक्यांत गडबडीनें येऊन) हां हां ! हें काय शांतिदुर्ग, क्रूरसिंह ? शत्रूस रणभूमीवर कंठस्नान घालण्याची ज्या तुमच्या तरवारींची योग्यता, त्यांचा उपयोग आपसांतील निष्कारण कलहांत करतां, याला काय ह्मणावें ? दूरवर विचार करून पहा. आपले शत्रू रात्रंदिवस डोळ्यांत तेल घालून, एकसारखी आपल्या कृष्णकृत्यांवर नजर ठेवीत आहेत त्यांचा समाचार घ्या.

शांति०—(मनांत) काय पण लुच्यांनीं साधूपणाचा आव घातला आहे; जणूं कांहीं आपण त्या गांवचेंच नाहीं. पक्के मानभावी ! (उघड) मूर्खा, कोणालारे उपदेश करतोस ? “ काना मागून आलान् तिखट झाला ” नीचांनों, तुमच्या कृतीनें शत्रूंचा तर विध्वंस होणार नाहींच; परंतु अपकीर्ति मात्र तुह्मांस माळ घालून शेवटीं नरकाचें द्वार खुलें करून देईल, हें खूप लक्षांत ठेवा.

क्रूर०–(मनांत) हें भांडण विकोप्यास जाऊं देतां कामा

नये; मिटतेंच घेतलें पाहिजे. नाहीं तर हा थेरडा राजरहस्य बाहेर फोडावयाचा. (त्याच्या खांद्यावर हात टाकून) शांति-दुर्ग, व्यर्थ भांडण्यांत काय अर्थ आहे ? सुकीर्ति अथवा दुष्कीर्ति यांच्यापासून उत्पन्न होणाऱ्या लाभ हानीचा संबंध आपल्याकडे काय आहे ? आपण हुकुमाचे चाकर. चला आपण आपल्या कामाला लागूं.

विश्व०–पण तपास काढण्यास गेलेला मनुष्य तर आला पाहिजेना ? शिवाय चोराला विघ्न करणारा हा शशांक जो पर्यंत आपल्यास दटावीत आहे, तोंपर्यंत तर आपल्याला येथून हालतांच कामा नये.

क्रूर०–अं:, त्याची कोण इतकी पर्वा बाळगतो. जसा त्याचा अव्याहत नित्य क्रम चालू आहे, तसाच आमचाही आहे. मग तो आह्मांस काय ह्मणून अडथळा करील ? (इतक्यांत देवल येतो, त्यास पाहून) हा पहा, देवलनाथ आला. काय देवल, काम फत्ते ना ?

देवल०–अहो, फत्ते ह्मणून काय विचारतां ! एकनिष्ठ सेवकाच्या कामाला व्यत्यय कोठून येणार ? पहा, यावेळेस योग पण असा जुळून आला आहे, कीं ज्याला ह्मणतात तो. आतां मात्र ही संधी व्यर्थ दवडूं नका. नाहीं तर आजपर्यंतचे सर्व परिश्रम फुकट जातील. सध्यां तिचे यजमान बाहेर गांवीं गेले आहेत, तोंच ही शिकार साधेल. चला चला लौकर.

क्रूर०–शांतिदुर्ग, विश्वसेन, चला. (जाऊं लागतात. जातांना मनासीं) कोणी याचें नांव शांतिदुर्ग ठेवलें आहे, न कळे. राग तर इतका आहे कीं, नाकावर माशी सुद्धां बसूं देत नाहीं. महाराजांना सांगून याहीपेक्षां कठीण कामावर याची

योजना केली पाहिजे, ह्मणजे या राजश्रीची शांति किती टिकते ती कळेल.

(सर्व जातात.)

प्रवेश दुसरा.

स्थळ—नंदिग्राम, कालिंदीचें घर.

पात्रें—कालिंदी, कोकिला व शांता.

(कालिंदी व कोकिला बोलत बसल्या आहेत.)

कोकिला—सखे, पुष्कळ दिवस तुला विचारीन विचारीन ह्मणून ह्मणत होतें, पण मेली आजपर्यंत तशी संधीच आली नाहीं. आतां तरी माझ्या बोलण्याला नीट उत्तर देशील कां ?

कालिंदी—कोकिले, तुझ्याशीं मी कधीं खोटं बोललें आहे सांग बरं ?

कोकिला—नाहीं—

कालिंदी—मग कां बरं असं विचारलंस ? अग, परक्या देशांत आपण बहिणीबहिणीच आहोंत.

कोकि०—असं खरंना ? मग तूं एक मोठी गोष्ट माझ्यापासून आजपर्यंत चोरून ठेवली आहेस ती तीच आज तुझ्या मुखांतून ऐकावी, अशी माझी इच्छा आहे. पण आज द्युमत्सेन महाराज इथं नाहींत ना ?

कालिं०—ह्मणून काय झालं ग ?

कोकि०—अग, आपलं निवांतपणीं बोलायला बसायला वेळ सांपडेल ह्मणून विचारलं.

कालिं०–काम नसलं ह्मणजे निवांतपणा हा आहेच. पण मेलं अंमळ कुणी घरीं नसलं किनै ह्मणजे मला अगदीं चैन पडत नाहीं.

कोकि०–अग, सर्वांचीच ती रीत आहे. मग काय सांगतेसना ?

कालिं०–तूं काय विचारणार आहेस, तें समजल्याशिवाय मी काय सांगू ?

कोकि०–(हात पुढें करून) मग दे तर वचन.

कालिं०–हें ग काय ? इश्श मेलं. येवढ्याशा गोष्टी करितां वचन तें कशाला पाहिजे ?

कोकि०–तूं सांगणार नाहींस ह्मणून.

कालिं०–(पालथा हात करून) हें घे वचन, आतां तर झालं ?

कोकि०–हें बघ. मी तुला असं विचारतें कीं, थोडक्यांतल्या थोडक्यांत देवानं तुला सर्व सुखांची अनुकुलता दिली असून, मग अशी नेहमीं खिन्न कां असतेस ? शरीर सुद्धां रात्रंदिवस झिजणीस लागल्यासारखं दिसतं, याचं कारण काय ?

कालिं०–गडे, हें मात्र तूं विचारूं नकोस.

कोकि०–कां बरं ? आपण एकमेकींला आपलीं दुःखें सांगितलीं नाहींत, तर त्याचा परिहार तरी होईल कसा ?

कालिं०–तें दुसऱ्याला सांगून परिहार होण्यासारखं नाहींग !

कोकि०–नसलं ह्मणून काय झालं ? हें बघ. तुझी किती जरी गुह्य गोष्ट असली तरी ती बाहेर फोडण्याइतकी कांहीं मी वेडी नाहीं; असं ठाऊक असून मग कां बरं आढे वेढे घेतेस ? निदान तुझ्या मैत्रिणीची आस पुरविण्याकरतांच कां होईना,

तूं आपल्या गूढ अशा हृदयभांडाराचं द्वार खुलं कर, नी सांगून टाक एकदां झालं.

कालिं०—(मनाशीं) काय बाई तरी करावं, ही तर कांहीं ऐकत नाहीं. नी जी गोष्ट आजपर्यंत मी आपल्या सख्या भावाला देखील सांगितली नाहीं, ती आज हिला सांगावी लागणार आहे.

कोकि०—सखे, तूं कसचा विचार करीत आहेस ? सांगायचं नाहीं ना तुझ्या मनांतून ? अशीच तुझी मैत्री वाटतं ? मग तूं इतक्या दिवस माझ्यावर करीत असलेला लोभ लटकाच ह्मणायचा तर !

कालिं०—कोकिले, अशी रागावूं नकोस गडे. तुझ्याशिवाय इथं मला दुसरी कुणी जिवलग मैत्रीण आहे कां ? तूंच सांग बरं.

कोकि०—ह्मणूनच वाटतं हें हितगुज सांगतेस ?

कालिं०—सांगतें गडे. पण तूं कुण्णाकुण्णाजवळ सुद्धां बोलूं नकोस हो.

कोकि०—(तिच्या गळ्यावर हात ठेवून) तुझ्याच गळ्याची शपथ; मी कुणाजवळ सुद्धां एक अक्षर देखील बोलणार नाहीं, आतां तर झालं ?

कालिं०—कोकिले, ही साधारण स्थितींत असलेली तुझी मैत्रीण थोर घराण्यांतील असून राजकन्या होणार होती बरं ! (गहिंवरून) पण त्याचा आतां काय उपयोग ? हल्लीं आहे ही स्थिति खरी ! (रडूं लागते.)

कोकि०—असं ग काय करतेस; रडूं नकोस गडे.

कालिं०—काय सांगूं कोकिले, मागल्या गोष्टीचं स्मरण झालं, म्हणजे लागलीच पोटांतून दुःखाचे उमाळे येऊं

लागतात व असंच रडूं कोसळतं. म्हणून तर तुला मी ह्मणत होतें, कीं तूं या भानगडींत पडूं नकोस.

कोकि०–तूं सांगितल्याशिवाय आम्हांला तरी तुझी हकीकत कशानं कळणार आहे ?

कालिं०–बरं सांगतें ऐक. माझा बाप काश्मीरच्या राजाजवळ सरदार होता. त्यानें मर्दुमकीचीं पुष्कळ कामं केल्यावरून एक वेळ महाराज सुप्रसन्न झाले; नी त्यांनीं माझ्या बापास कांचीपूरच्या संस्थानची जाहगीर दिली.

कोकि०–अस्सं कां ! मग त्याचं पुढं काय झालं ?

कालिं०–महाराजांची आज्ञा घेऊन आमचे बाबा काश्मीरांतून जेव्हां निघाले, तेव्हां त्यांच्या पदरीं कांतिवर्म या नांवाचा एक कारकून होता. तोच मेला हल्लीं तिथला राजा झाला आहे.

कोकि०–म्हणजे ! हें काय तूं सांगतेस ?

कालिं०–तसंच झालं बाई; त्या मेल्याची कृति ऐक तर खरी. आम्ही तिकडं जात असतां एके दिवशीं वाटेंत आमचा मुक्काम झाला. तेव्हां त्या दुर्बुद्धीनं आमच्या बाबांना कुठं नाहींसं केलं, तें कुणाला देखील कळलं नाहीं.

कोकि०–काय बाई मेल्याचं धारिष्ट तरी !

कालिं०–पुढं तर ऐक. तीच स्थिति मेल्यानं माझ्या वडील भावाची केली. असं दोघांना नाहींसं करून मग मेला मांग, माझा एक धाकटा भाऊ कुमार व मला घेऊन कांचीपुरास आला. खरोखर कोकिले, माझा बाप व वडील भाऊ जिवंत असते तर त्या चांडाळाचा सूड घेतल्या शिवाय कधीं राहिले नसते. (हात चोळून) निःसंतान होवो मेल्याचं.

कोकि०–तुझ्या सारख्या पतिव्रतेचा शाप त्या मेल्याला लागल्याशिवाय कधींही रहाणार नाहीं. पहा, देवांनीं तरी कसे डोळे झांकले ते. बरं, मग पुढं काय झालं ?

कालिं०–कांचीपुरास गेल्यावर तेथील अधिकाऱ्यास सनद दाखवून आपण गादीवर बसला. हीं मुलें आपलींच आहेत, असं प्रथम तो लोकांपाशीं सांगूं लागला. लोकांना तरी काय ठाऊक? त्यांना तें खरंच वाटलं. पण पुढं मेल्याला आपलीं मुलं ह्मणायची लाज वाटूं लागली कीं काय कुणास ठाऊक; हीं माझ्या मित्राचीं मुलं आहेत, त्यांना कुणी नाहीं ह्मणून जवळ बाळगलीं, असं ही मग ह्मणूं लागला. तेव्हां यांत कांहीं तरी कपट असावं, असं लोकांना आतां वाटूं लागलं आहे.

कोकि०–पैशापायीं धन्याची व आईबहिणीची सुद्धां ओळख रहात नाहीं कां ? ठीकच आहे. अशा मांगांना दया माया कुठून असणार ? कसे ग हे पुरूष निर्दयी ! !

कालिं०–अग, पैशाकरितां मनुष्य प्राणी काय करील नी काय नाहीं याचा नेम आहे कां ? त्यांतून तर ही राज्यलक्ष्मी. ही कित्येकांना धुळीस मिळवील व कित्येकांची अब्रू वाढवील. आजपर्यंत या अनिवार राज्यतृष्णेनं कित्येकांचे बळी घेतले आहेत व पुढंही आणखी कितिक घेईल. ह्मणून तर मला रात्रंदिवस काळजी वाटते कीं, माझा धाकटा भाऊ त्या मांगाजवळ आहे, तो तरी खुशाल असो ह्मणजे झालं.

कोकि०–ते तर आतां चांगले मोठे झाले असतील ना ?

कालिं०–अग हो, तो तर आतां चांगला करता सवरता झाला आहे. मंत्री मंडळांत त्या मेल्यानं त्याची नेमणूक केली आहे हो.

कोकि०–मग तर तुला त्यांच्याविषयीं भिण्याचं मुळींच कारण नाहीं ?

कालिं०–पण न जाणो बाई; त्यांनीं कांहीं गडबड करूं नये, ह्मणून ही त्याला बहुमानाची जागा दिली नसेल कशावरून ? किंवा कुमाराचा लोकांत अधिक मान वाढल्यानं, आपल्या बद्दल त्याला विश्वास उत्पन्न करून एखादे वेळीं त्याचा घात करणार नाहीं ह्मणून कशा वरून ! त्याच्या पाठीला कां डोळे आहेत !

कोकि०–खरंच बाई ! दुष्ट लोक केव्हां नी कुणाचा कसा घात करतील, हें समजणार देखील नाहीं. पण तें अझून राजवाड्यांतच राहतात कां ?

कालिं०–नाहीं ग. त्याचं लग्न झाल्यावर त्या मेल्यानं त्याला वेगळा बंगला बांधून दिला आहे, तिथं तो आतां रहातो. कोकिले, त्याची बायको किती सद्गुणी आहे ह्मणून तुला सांगू ! मी जेव्हां राजवाड्यांत रहात होतें, तेव्हां ती आपल्या बापा बरोबर नेहमीं येत असे. बापाची एकुलती एक असून त्याची ती अतिशय लाडकी होती. रूपानं देखणी, सुशील, मनमिळाऊ, अशी असल्यामुळं तिची व माझी मैत्री लवकरच जमली. मग मी पुढं राणी साहेबानां सांगून तिच्याशीं मी आपल्या बंधुरायाचा विवाह करून दिला.

कोकि०–बाई साहेबानीं बरं ग तुझं ऐकलं. त्यांची तुझ्यावर मर्जी होती वाटतं !

कालिं०–राणी माझ्यावर अंत:करणापासून लोभ करीत होती, व राजाहि करीत होता; पण तो मात्र मेला निराळ्या दृष्टीनं करीत होता. लहान पणापासून त्याची माझ्यावर पापदृष्टी होती, हें राणीच्या लक्षांत येऊन तिनं मला गुपचिप आपल्या

बापाकडं चंद्रनगरास पावतं करून दिलं. तिथं त्यानीं मग (लाजून) इकडच्या पदरांत घातली.

कोकि०–तर मग द्युमत्सेन महाराज मोठे दैवशालीच ह्मणायचे. (इतक्यांत शांता प्रवेश करते, तिला पाहून) शांते, कांग तूं आलीस ?

शांता–यजमान सायब घरीं आल्याती.

कोकि०–अस्सं कां ? बरं तूं चल पुढं, मी आलेंच. (दासी जाते व कालिंदीस) सखे मी जातें आतां; स्वारी बाहेरून दमून आली असेल. त्यांतून क्षणभर मी दृष्टी आड झालें कीं, लागलीच कावरं बावरं होणं होतं.

कालिं०–बरं बाई. देवकरो नी अशीच तुमची उभयतांची अखंड प्रीति असो.

कोकि०–(किंचित हंसत हंसत जात असतां) तुमचीही तशीच असो.

कालिं०–अग कुंकूं तरी लावून जा. (आंतून कुंकुमाची डबी घेऊन येते. परस्परांस कुंकूं लावतात.)

कोकि०–जातें बरं मी.

कालिं०–ये आं. पण रिकाम्या वेळीं अशीच कधीं कधीं येऊन करमणूक करीत जा.

(होय, अशी मानेनें खूण करून जाते. कालिंदीही जाते.)

प्रवेश तिसरा.

स्थळ–अरण्य, रस्ता.

चतुरसिंह–(प्रवेशकरून) "सत्यमेवजयते" अशी

एक म्हण आहे, पण मी तर याचा आजपर्यंत निराळ्याच तऱ्हेचा अनुभव घेत आलों. एकानें अविश्रांत श्रम करून न्यायानें संपत्ति मिळवावी आणि तिचा उपभोग हलकट व आळशी लोकांनीं घ्यावा. मागील वैभवाचें स्मरण झालें, म्हणजे हल्लीच्या कष्टद स्थितीचा विचार उत्पन्न न होतां, नीचा, तुझ्या दुष्ट कृतीचें स्पष्ट चित्र डोळ्यासमोर उभें रहातें; आणि एकदम तुझ्या नरडीचा घोंट घेऊन सूड उगवावा, अशा क्षुब्ध मनोवृत्तीनें सर्वांगाची लाही लाही होते. पण काय करूं! गुरुजींचा उपदेश मला वारंवार मागें खेंचित आहे. त्यामुळें माझा नाइलाज झाला. नाहींतर केव्हांच तुला यमाचा पाहुणा केला असता. स्वतःला घातक होऊन पुढें मुलांबाळांना सुद्धां कष्टद होणारा हा विषवृक्ष आमच्या बाबांनीं कशाला लावून ठेवला कोण जाणें! (थांबून) छे. मी त्या महात्म्यावर व्यर्थ दोषारोप करीत आहे. कारण जाणून बुजून आपल्या घरांत कोणी कृष्णसर्प बाळगील काय? हा कुलांगार, कृतघ्न निपजेल हें त्या भोळ्या पुरुषाला काय ठाऊक! दुष्टा, अरे ज्या तुझा खर्डे घासतां घासतां जन्म गेला, तो तूं आज दगलबाजी करून वैभव शिखरीं बसला आहेस. आणि आम्ही शूर, अस्सल क्षत्रिय, सिंहाचे छावे असून उन्हा तान्हांत, गिरी कंदरींत, उपास तापास काढीत अरण्यांत भटकत आहोंत. असो. दैवगति विचित्र आहे. क्षणार्धांत ती रंकाचा राव व रावाचा रंक करते. अधमा, लवकरच आमच्या सुदैवानें असा एखादा दिवस उगवेल कीं, तुझ्या सर्व कृष्ण कृत्यांचा स्फोट होऊन न्याय देवता जागृत होईल व सत्याचा विजय होईल.

(असें म्हणून जातो.)

प्रवेश ४ था.

स्थळ–राणीचा महाल.

पात्रें–राजा राणी, व कमला.

(राणी बसली असून दासी जवळ उभी आहे.)

राणी–काय ग कमले, कालिंदी काय ह्मणत होती ?

कम०–त्या ह्मणत होत्या कीं, मागं बाईसाहेबांनीं जे माझ्यावर पुष्कळ उपकार केले आहेत, ते मी कधीं कधीं सुद्धा विसरणार नाहीं; तसेच या वेळीं माझ्यावर उपकार करून मला संकटांतून मुक्त केलं तर त्यांची मी जन्मोजन्मीं बटीक होऊन राहीन.

राणी–तसी ती कृतघ्न नाहीं, हें मी सुद्धां जाणतें. पण या वेळीं मी तरी काय करूं ग ?

कम०–बाईसाहेब, मागं जशी आपण युक्ती योजलीत तशीच एखादी आतां काढून त्या बिचारीला संकटांतून मुक्त करा एकदांची. काय सांगूं ? जेव्हां जेव्हां मी त्यांना अन्न घेऊन जातें, तेव्हां त्यांचं तें शोकानं शुष्क झालेलं मुख पाहून माझं हृदय कसं अगदीं कळवळून जातं, नी अतिशय वाईट ही वाटतं. माझ्या जर कांहीं हातचं असतं तर खचित मी तिच्या दुःखाची वाटेकरीण झालें असतें.

राणी–तिला इथं आणून ठेवल्यापासून मला कांहीं सुख कां आहे ? तूं आतांशी पाहतेंच आहेस कीं, नेहमीं प्रमाणं स्वारीचं इकडं येणं होतं, कां प्रेमानं बोलावणं होतं; आलिकडं तें सगळ विसरल्या सारखंच झालं आहे.

कम०–खरंच बाई, आपल्या सुखांत व्यत्यय आणण्याची

ज्या मेल्यानं मसलत दिली असेल त्या मेल्याचं वाट्टोळं होवो. पण बाईसाहेब, तुह्मी नाहीं कां सरकारांना कांहीं दोन गोष्टि सांगत ?

राणी–कमले, मी कांहीं बोलत नाहीं असं कां तुला वाटतं ! प्रत्यक्ष पोटच्या गोळ्या प्रमाणं जिला वाढविली, तिच्यावर पापदृष्टी ठेवणं चांगलं नाहीं; असं परोपरीनं सांगितलं. रावण, दुर्योधनादिकांचीं उदाहरणं देऊन पाहिलीं ! परंतु कांहीं नाहीं, पालथ्या घड्यावर पाणी ! महालांत कधीं काळीं येणं झालं, म्हणजे तेवढं मात्र माझ्याशीं गोड गोड बोलून साखर पेरणं होतं नी येथून पुन्हा परत जाणं झालं, कीं आपलं “ येरे माझ्या मागल्या ” ! ‘ बोलणीं मान भावाचीं नी करणी कसाबाची’ अशा स्थितीचा अनुभव आजपर्यंत कधींच मला आला नव्हता, तो आतां येऊं लागला आहे. (विचार केल्या सारखें करून) कमले, मला एक युक्ती सुचली आहे, त्यानीं कदाचित् त्या बिचारीचा कारागृहवास चुकला तर चुकेल. पण गडे, तूं जर साह्य करीत असलीस तर सांगतें.

कम०–मी अगदीं एका पायावर तयार आहें. सांगा काय ती.

राणी–पण अगदीं गुप्त बरं.

राजा०–(इतक्यांत प्रवेश करून अगदीं गुप्त. पट्कर्णी झालेली गोष्ट किती तरी गुप्त राहील ! (त्याचा शब्द ऐकून दोघी चपापून बाजूस उभ्या रहातात.) अशीं कारस्थानं करण्याला कुठें शिकलांत आपण ? (दासी जाते.)

राणी–दुसऱ्या कुणाजवळ शिकायचं आहे ?

राजा–जीभ फार चुर चुर करते. बक्षिसाची आठवण झाली वाटतं ?

राणी–बक्षीस मिळालं तर घ्यायला नको कां ? " धन्यांनीं मारलं नी पावसानीं झोडलं " तर फिर्याद कुणाकडं न्यायची ?

राजा–स्वतंत्रतेचाच हा परिणाम दिसत आहे. तुह्माला फाजील स्वतंत्रता मिळाल्यानें कान बरेच लांब वाढलेसे दिसतात.

राणी–याचा निवाडा मी नको कांहीं करायला. स्वतःचं मनच सांगेल.

राजा–(रागानें) दुष्टे, इतकी निर्भीड कशानें झालीस? मघांपासून तोंड मोकळें सोडलें आहेस, पण विचार केलास काय ? पुरुषांच्या कारभारांत बायकांनीं पडण्याचें कांहीं कारण नाहीं. मागें तूंच माझ्या हेतूचा विरस केलास; आणखी आतांही करूं पहात आहेस. तुला शरम नाहीं वाटत ? आह्मी वाटेल तें केलें, ह्मणून तुझ्या सौख्यांत कांहीं कमी पडलें आहे कां ?

राणी–स्त्रियांची खरी संपत्ति त्यांचें सौभाग्य ? व खरें सौख्य त्यांच्या वरील त्यांच्या पतीचें अद्वितीय प्रेम. अशा सुखाची जोड जिला निरंतर लाभेल, तीच खरी भाग्यवान. पुरुषांस परस्त्रीचा नाद लागला ह्मणजे स्त्रियांस या दोन्ही सुखांचा नाश होण्याची भीति असते. शिवाय सत्तेच्या कदान्नांतील रुचि दुराचरणानें मिळविलेल्या मिष्टान्नांत नाहीं. तें परिणामीं विघातकच होणार ? खेरीज जगांत हसूं होईल तें निराळंच.

राजा–आह्मांला तूं नकोस उपदेश करायला; पूर्वींच या सर्व गोष्टींचा विचार करून मग आह्मीं या कामांत पडलों आहोंत, समजलीस !

राणी–जगाची राहिली पण मनाची लाज तर खरी, बालपणापासून मुली प्रमाणं वाढविलेल्या पोरीवर पापदृष्टी ठेवल्यानं

कन्याभिलाषाचा दोष पदरीं घेऊन सुगति कशी मिळेल, याचा कांहीं विचार केला आहे का ?

राजा–पुरे पुरे, नीतिशास्त्राच्या गोष्टी. कोणाची कोण, आणि ह्मणे कन्याभिलाष ! शास्त्र बिस्त्र हें सर्व थोतांड आहे. तुमच्या सारख्या भोळ्या मनुष्याला फसवण्या करितांच आपमतलबी शास्त्रकर्ते निर्माण झाले.

राणी–बरं आहे. माझ्या सुखाची पर्वा नाहीं तर मीही इथून चाललें. (जाते.)

राजा–(मनाशींच) यावेळेस हिच्या मनाविरुद्ध वागून उपयोग नाहीं. नाहींतर पूर्वीं प्रमाणें भलताच प्रकार करून जुळवून आणलेला घाटही विस्खलीत करील. (उघड मोठ्यानें) अग कमले, जा जा तिला लवकर हांक मारून आण. (मनांत) आतां आपण हिला असें सांगूं ! (इतक्यांत राणी येते.)

राणी–काय ?

राजा–तूं गेलीस काय ह्मणून ?

राणी–किंमत नाहीं त्या ठिकाणीं उभं राहयचं कशाला ?

राजा–तुझें काय ह्मणणें आहे तें तरी मला कळूं दे एकदां. खचीत आजपासून मी निश्चय केला आहे कीं, तुझ्या विरुद्ध ह्मणून कधीं वागायचेंच नाहीं.

राणी–कुणी ह्मणल खरंच ! मला हा मारवाडी कावा सर्व कळतो.

राजा–तुझ्याच गळ्याची शपथ! (गळ्यावर हात ठेवूं लागतो.)

राणी–(किंचित गालांत हांसून) शपथ ती कशाला पाहिजे ? पण सांगितलेल्या गोष्टीचा निकाल झाला, ह्मणजे झालं.

राजा–खरोखर, कालिंदीबद्दल मला आतां अतिशय

पश्चात्ताप होतो. त्या बिचारीला उगीच मी छळिलें, असें मला वाटूं लागलें आहे. ती बिचारी आपल्या घरीं सुखांत असती, पण कुठून मला ही दुर्बुद्धि सुचली कोण जाणे!

राणी—आतांपर्यंत झालं तें झालं; पण आतां तरी तिला आपल्या गांवीं पाठवून द्यावी. ह्मणजे त्या बिचारीचे उगीच शिव्या शाप तरी लागणार नाहींत.

राजा—उद्यां पाठवूनच देणार आहे तिला.

राणी—उद्यां पाठवायची ती आजच कां पाठवून देणं होत नाहीं?

राजा— अग, एका दिवसानें काय होणार? मनांत आलें आहे तें मी करणारच. त्याबद्दल तुला अगदीं काळजी नको. पण हें पहा, माझ्याकडे आतां कांहीं जरूरीच्या कामाकरितां खानगी कारभारी येणार आहेत; तेव्हां मी तिकडे जातों. तूं आज शयन मंदिर शृंगारून ठेव, मी रात्रीं येणार आहें.

राणी—खरंच कां! आनंदाचाच दिवस उगवला ह्मणायचा. जातें तर मी आतां.

राजा—अगदीं बिनदिक्कत. (ती जाते.) गेली एकदांची पीडा. मी अकस्मात आलों म्हणून तिचें खलबत तरी मला समजलें, नाहीं तर आमच्या हातांत बहुतेक तुरीच आल्या असत्या. (किंचित् स्तब्ध राहून) कालिंदी तरी कांहीं सामान्य पोरगी नाहीं. ती वश व्हावी, ह्मणून आज कितीतरी दिवस मी प्रयत्न करीत आहे, परंतु अद्याप ती कांहीं आपला हेका सोडीत नाहीं. थोडासा कठोरपणा केला, तर कदाचित तें सकुमार फूल हाताला आलें तर येईल. आज शेवटचा एकदां प्रयत्न करून पहावा. (असें ह्मणून जातो.)

प्रवेश पांचवा.

स्थळ—बगीचा, फूलबाग.

पात्रें—कमला व चमेली.

[कमला हातांत फुलाची परडी घेऊन फुलें तोडीत आहे, इतक्यांत चमेली येते.]

कमला– (चमेलीस पाहून) अग चमे, तूं ग इकडं कुणीकडं. तुझी धनीण आली आहे वाटतं.

चमेली–अहाहा ! ! नीट बोलायला तोंड नाहीं कां दिलं देवानं ? पद्मिनीबाईसाहेबांचा मान राणी साहेबांच्या खालोखाल आहे समजलीस ?

कमला–अग, पाहिलं ग कसं बोलतां येतं तें.

चमेली–मग फिटली कां हौस ?

कमला--फिटली बरं चमूबाई; पण तुझं आज तोंड कांग उतरल्यासारखं दिसत; तुझा मोगरा फार दिवसांत तुला भेटला नाहीं वाटतं. परवां तुझीच यजमानीण ह्मणत होती कीं, चमेलीचं आतांशी कामावर लक्ष नाहीं ह्मणून. तें खरं कांग ?

चमेली–(मानेस हिसका देऊन) होः काय ग ? कामावर लक्ष नसतं तर आमच्या बाईसाहेब कधींच कां बोलल्या नसत्या?

कमला–बरोबरच आहे. त्या कशा बोलतील ? त्यांना नाहीं कां कळत, तुझी कामानं काय दशा केली आहे ती !

चमेली–(कमलेला थापट मारून) चहाटळ मेली ! बरीच फाजील झाली आहेस. पण मला असलं नाहीं हो खपायचं !

कमला–तुला राग येत असला तर तुझ्याच मोगऱ्याची शपथ; आणि तोंडाला कुलूप. (तोंड दाबून धरते.)

चमेली–(तिच्या तोंडावरला हात काढीत) शर्थ झाली तुझ्या वात्रटपणापुढं. मला वाटतं तुलांच एखाद्या गुलजार षट्पदाची बाधा झाली आहे. वरं तें जाऊं दे (तिच्या खांद्यावर हात टाकून) पण सांग बरं कमले, आज किती दिवसांनीं तुझी नी माझी गांठ पडली ? मी मनांत ह्मटलं होतं कीं, आह्मी आतां आनंदानं बोलूं बसूं ! अग, आज हा योग आला; नाहीं तर कुठं सांपडतं आहे इकडं यायला ?

कमला–खरंच बाई. पण कायग चमेली ? कमलपत्राचा सुद्धां वियोग सहन न होणाऱ्या चक्रवाक पक्षाप्रमाणं कुमारसिंह महाराजांकडून आज तुझ्या बाई साहेबांस परवानगी कशी ग मिळाली, याचंच मला नवल वाटतं.

चमेली–खरंच, पंडितीण बाई बरोबर शोभशील. काय दृष्टांत नी काय दाखले द्यायला शिकली आहेस तूं!

कमला–तें राहूं देग. पण माझ्या प्रश्नाचा जबाब देकीं अगोदर.

चमेली–अग, कुमारसिंह महाराज आज बाहेर गांवीं कामावर गेले; ह्मणून बाईसाहेब एक दोन दिवस रहाण्याच्या हेतूनंच इकड आल्या आहेत, समजलीस ?

कमला–अस्सं कां ?

चमेली–पण आज आपला फेरा ही हातांत फुलाची परडी घेऊन स्वतःच कामाला लागला आहे ?

कमला–अग, त्याचं कारण निराळंच आहे. आज पुष्कळ दिवसांनीं सुठ फुलली हो– (जीभ चावून गप्प रहाते.)

चमेली–कमले, बोलतांना कां थांबलीस. मध्येंच माशी शिंकली वाटतं ?

कमला–अग, भलतंच माझ्या तोंडांतून निघून जात होतं.

चमेली–भलतंच, तें काय ? मला नाहीं कां सांगण्या सारखं ?

कमला– (मनांत) कसं करूं बरं; हिला सांगूं कां नको ? (थांबून) न सांगायला काय झालं. "वेशीवर मारलं नी गांवांत सांगूं नका." केव्हां तरी तें कळणारच. (उघड) गडे, तूं कुठं बोलणार नाहींस तर सांगतें.

चमेली–अहाग वेडे, सांगण्या सारखी गोष्ट असली तर कुणी दुसऱ्यापाशीं बोलेल. भलतीच गोष्ट कुणी सांगेल कां ?

कमला–(इकडे तिकडे पाहून) न जाणो बाई, माझ्या कमनशिबानं या लतांना कान फुटून महाराजांच्या कानावर गेलं तर मला चौदाव्या रत्नाचं बक्षीस मिळेल. हो मग तें असं तसं नाहीं कांहीं, लागलीच प्राणासी गांठ.

चमेली–तुझ्या गळ्या शपथ. मी कानाच्या कोपरास सुद्धां कळूं देणार नाहीं, समजलीस? पण इतकी काय गुह्य गोष्ट आहे ?

कमला–अग, कालिंदी बाईसाहेबांना महाराजांनीं इथं आणून गुप्त रूपानं ठेवल्या आहेत हो.

चमेली–खरंच कां ? आतां मात्र तिची धडगत दिसत नाहीं बाई! परवांच आमच्या बाईसाहेब ह्मणत होत्या, कीं तिला आतां नुकतीच एक मुलगी झाली आहे ह्मणून. सुखांत होती बिचारी. पण पहा, काय तिचं दैव ओढवलं तें.

कमला–ही गोष्ट तूं आपल्या बाईसाहेबापाशीं बोलूं नकोस हो. नाहीं तर " हाईक ह्मणता ब्रह्महत्त्या " घडायची एखादी !

चमेली–नाहीं बरं; तूं त्याची अगदीं कळजी करूं नकोस. पण काय ग ? राणी साहेबांना हें ठाऊक आहे कां ?

कमला–अग हो, त्यांनींच महाराजांना सांगून माझी नेमणूक तिकडं केली आहे.

चमेली–हें तरी एक बरंच झालं.

कमला–मी असून तरी तिथं काय करणार बाई ? मला त्यांची स्थिति पाहून फार वाईट वाटतं. आत्तां तूं सांगितलेली तिची सकुमार मुलगी कितीतरी गोजिरवाणी आहे ह्मणून सांगूं? ठेंगणी, ठुसकी, नाक डोळ्यांनीं सुरेख, गोरीपान, अंगा पिंडानें गोंडस,. तिला पाहिलं कीं मला मोठा आनंद होतो; पण त्या ठिकाणीं आपल्या सारख्यांचा कांहीं इलाज चालतो कां ?

चमेली–कमले, तुझी आतां त्यांच्याकडं नेमणूकच झाली आहे, तर त्यांना तूं ममतेनं वागवून त्यांच्या खाण्या पिण्याची तरी व्यवस्था नीट करीत जा. आणखी त्या बालरत्नाची सध्यां तूंच आई हो. दुसरं तुला काय सांगू ?

कमला–हें मला सांगायला कां पाहिजे ? मी त्यांची कशी व्यवस्था ठेवते, हें त्यांचीन् तुझी कधींकाळीं गांठ पडली तर त्याच तुला सांगतील.

चमेली–पण कायग कमले, राणीसाहेब या बद्दल महाराजांना कांहीं सांगत नाहींत कां ?

कमला–जेव्हां जेव्हां त्या उभयतांची महालांत भेट होते, तेव्हां तेव्हां राणीसाहेब कांहीं गोडीच्या शद्बानं, कांहीं रागाच्या शद्बानं त्यांची कानउघाडणी करीतच असतात. आज महाराजांचं रंगमहालांत येणं हें त्याचंच फळ आहे हो. ह्मणून तर त्यांच्या पुष्पशय्येकरतां मुद्दाम हीं फुलं तोडीत होतें; इतक्यांत

तुझी गांठ पडली. आतां जाऊं दे गडे, त्या मला रागं भरतील नाहीं तर. मला किती तरी हा वेळ झाला आहे!

चमेली–बरं जा. मीही आपल्या बाईसाहेबाकडं जातें.

कमला–(जाऊं लागते. जातांना–) सांगितल्याचं स्मरण ठेव हो. नाहींतर माझ्या गळ्यांत रिकामी घोरपड घालशील.

चमेली–नाहींग, वेडी कां आहे मी. (कमला जाते.) बरं झालं. हिची अनायासें गांठ पडली, ह्मणून तरी ही हकीकत समजली. आतां मी हें सर्व पद्मिनीबाईसाहेबांना जाऊन सांगतें, ह्मणजे त्या तरी सावध राहतील. (जाते.)

प्रवेश ६ वा.

स्थळ–नगर रस्ता.

चतुरसिंह–(प्रवेश करून) राजवाड्यांतून कालिंदी नाहींसी झाली, हें ऐकल्या दिवसापासून तिचा तपास करतां नंदिग्रामास सुखरूप असल्याचें समजलें. ही आनंदकारक वार्ता ऐकून मनाची बरीच समाधान वृत्ती झाली होती. पण हात धुवून पाठीस लागलेलें आमचें दुर्दैव आह्मांस सुखाचा वारा कसा लागूं देईल? पुन्हा त्या पोरीला संकटांत नेऊन त्यानें ढकललेंच. अरे कृतघ्ना, तूं आपली दुष्ट वासना तृप्त करून घेण्याच्या लालसेनें त्या विचारीच्या पाठीस लागला आहेस. पण पठा, त्या सत्य पतिव्रतेच्या कोपानलांतून शापरूपी तीव्र ज्वाला निघाली, कीं तुझी तिच्या भोंवती घिरट्या घालणाऱ्या पतंगा प्रमाणें राख रांगोळीच झाली ह्मणून समज– (दीर्घ श्वास सोडून) हाय हाय!! कालिंदी, तुझ्यावरील

अरिष्टाची वार्ता तप्ततैलाप्रमाणें माझ्या कर्णरंध्रांत शिरून सर्वांगाचा दाह करून सोडीत आहे. मग व्याघ्रदरींत सांपडलेल्या तुझ्या कोमल तनूची काय स्थिति होत असेल ? घातक्या, हा सिंहाचा बच्चा तुझ्या कंठनालाचें रक्त घटघटा प्राशन करून, आपला आत्मा थंडगार करून घेण्या करितां तुला लवकरच भेट देईल. असो. तिला आतां कुठें ठेविली आहे, याचा तपास काढण्या करतां आपला हेर पुढें गेलाच आहे. आतां आपणही मागून जावें आणि तिला संकटमुक्त करण्याचा प्रयत्न करावा. (जातो.)

प्रवेश ७ वा.

स्थळ–किल्याच्या बुरुजांतील खोली.

(पात्रें–राजा, शांतिदुर्ग, क्रूरसिंह, कालिंदी, चतुरसिंह, व हेर.)

[कालिंदी मुलीस मांडीवर घेऊन सचिंत बसली आहे.]

कालिंदी– (मुलीकडे पहात असतां) बाळे, तूं किती ग दुर्दैवी ! किंवा माझ्या सुदैवानं तूं तरी यावेळीं माझ्या जवळ आहेस. (वर पाहून) देवा, तुझी आमच्यावर इतकी कां बरं वक्रदृष्टी. पूर्वजन्मीं तुझ्या पूजेचा अनादर केला, किंवा कुणी महात्मा तुझं देवालय बांधीत असतां त्याला विघ्न आणिलं, अथवा साधुजनांची निंदा केली, त्या पातकाचं हें दुष्फळ मी हल्लीं भोगीत आहे. पण माझ्या तान्हुल्यानं तुझं काय केलं रे ! (थांबून) पतिराज, आपलं गांवाहून येणं झाल्यावर या तान्हुल्यासह मी मंदिरांत नाहीं, असं पाहून आपल्या मनांत किती तरी निरनिराळ्या कल्पना आल्या असतील ! आपण

माझा शोध कुठं कराल ! आपल्यास माझं ठिकाण कोणहो सांगेल ! शिव शिव ! ! ! किती तरी मी हतभागी. बाळपणींच आई आह्मांला सोडून गेली, बाप असून नाहीं सारखा झाला व वडील बंधूचीही तीच अवस्था झाली ! करुणाघना, म्यां अबलेनं या भयंकर कारागृहांत आतां किती दिवस तरी काढावेत! कुमार व मी आह्मी दोघं सख्खीं भावंडं असून आणि इतके दिवस एका ठिकाणीं रहात असूनही, मी पापिणीनं त्या दुष्ट मांगाच्या भीतीनं त्यास खरी हकीकत सांगितली नाहीं. मी त्याची बहीण आहें असं जर त्याला कळतं, तर आजपर्यंत मजवर असे दुःखाचे प्रसंग कधींच आले नसते. माते जगदंबे ! तूं तरी या यातनेंतून मला सोडीव. नको नको ! मला या यातना आतां सोसवत नाहींत. (मुलीचें चुंबन घेऊन) बाळे, सौदामिनी ! तुझी तरी पुण्याई या वेळीं उभी राहून किंचित् सुखाची आशा दाखविलीस तर मी मोठी भाग्यवान समजेन.

राजा–(प्रवेश करून) सुंदरी, (ती चपापून मुलीस कडेवर घेऊन उभी राहते) तुझ्या पुढें उभा असलेला मूर्तिमंत सौख्यनिधि व तुझा दास, तुझी सेवा करण्यास उत्सुक व तत्पर असतां नुसत्या सुखाच्या आशेवरच भाग्याची कल्पना कां करतेस ? तूं हूं म्हण कीं, इंद्राच्या सुखापेक्षां ही ज्यास्त अशा सुखाचा निरंतर आस्वाद घेत बससील, अशी व्यवस्था ठेवतों.

कालिंदी–महाराज, आपल्याला कितीदां तरी सांगितलं असेल, कीं आपण माझा नाद सोडून मला आपल्या घरीं पाठवून द्या. हें पहा, आपण माझ्या बापाप्रमाणं माझं पालन केलं आहेत, तेव्हां मी आपल्याला कन्ये सारखीच नाहीं कां ? आपल्या या कृतीनं आपल्यास आतां महाराज ह्मणण्याची सुद्धां मला लाज वाटूं लागली आहे.

राजा-(किंचित पुढें सरून) प्रथमच तुला लाज वाटणें साहजीक आहे. पण मी कांहीं कोणी परका नाहीं. नेहमींचा तुझ्या परिचयांतला असून, त्याला तूं एकदां आपला ह्मण, ह्मणजे झालें. (आणखी पुढें सरून तिच्या खांद्यावर हात टाकण्याचा प्रयत्न करतो.)

कालिंदी-(मागें सरून) हरामखोरा, चांडाळा, दूर सर. खबरदार पुढं आलास तर. मी आपलं डोकं फोडून तुझ्या पुढं प्राण देईन, समजलास ?

राजा-अबब ! ! केवढा तरी हा राग ! तुला मी लहान-पणापासून ओळखतों. तूं जरी किती रागावलीस, तरी त्याला मी भिणार नाहीं. तुझ्याच सुखाची मी गोष्ट सांगत असतां, त्या भिकारड्या द्युमत्सेनास कां इतकी भाळली आहेस ? माझ्या-पेक्षां तो रूपानें, गुणानें किंवा योग्यतेनें कांहीं अधीक नाहीं.

कालिंदी-आग लाव मेल्या तुझ्या त्या सुंदरपणाला, गुणाला नी योग्यतेला. तूं नशिबानं जरी आज राजा झाला आहेस, तरी फुटक्या कवडीची किंमत मेल्या तुला नाहीं ! कां उगीच लांब जीभ करून बोलतोस ! सत्पुरुषाची निंदा केल्यानं व अबलेचा छल केल्यानं मांगा तुझ्या तोंडाला किडे मात्र पडतील.

राजा-(किंचित हंसल्या सारखें करून) हं: अशी कावळ्या-च्या शापानें जर गुरें मरतीं तर एक शेंपूट सुद्धां आज जगाच्या दृष्टीस पडलें नसतें.

कालिंदी-दुष्टा, परस्त्रियेच्या अभिलाषानं कितीकांचा नाश झाला आहे, हें डोळे उघडून पुराणांतरीं पहा एकदां; ह्मणजे थोडी शरम तरी वाटेल.

राजा–अग, पुराणें हीं भटांची पोट भरण्याची विद्या. त्यांतल्या गोष्टी तूं खऱ्या का मानतेस ? हा तुला व्यर्थ भ्रम आहे. हरिणाक्षी, ऐक. माझें ह्मणणें कबूल कर; त्यांत तुझेंच हित आहे.

कालिंदी–हित व अहित न समजण्याइतकी मी वेडी खुळी झालें नाहीं अझून ! कान, डोळे, वगैरे माझीं सर्व इंद्रियें अझून चांगल्या स्थितींत आहेत. पण मेल्या, तूं मात्र राज्य-मदानं व पोकळ अभिमानानं धुंद होऊन, अंध झाला आहेस. त्यामुळं तुझी विचारशक्ति मंद होऊन, तुझी स्वैर व अनर्गल विषयवासना तुला परस्त्रीचा छंद लावून रसातळास नेण्याकरितां थै थै नाचवीत आहे, समजलास. इतका मत्त होऊं नकोस. कृतघ्ना, पूर्वस्थितीची थोडीतरी आठवण ठेव.

राजा–(मनांत) हिनं तर आपल्या भाषणानें मला कुंठित केलं. तेव्हां सामोपचारानें हें कार्य साधेल असें आतां दिसत नाहीं. नारसिंहस्वरूप धारण केलं पाहिजे. पण तसें करणें मला बरें वाटत नाहीं. आणखी एकवार प्रयत्न करून पहावा, नाहींतर शेवटाचा उपाय आहेच. (उघड) चारुगात्री, तूं सुखानं माझ्या म्हणण्याला कबूल होत नाहींस ना ?

कालिंदी–मेल्या, सुखानं नाहीं आणि दुःखानंही नाहीं. मी आपल्या पवित्र देहाला चांडाळा, तुझा अगदीं स्पर्श होऊं देणार नाहीं, समजलास ?

राजा–(मिशाला पीळ घालीत) हा बहाद्दर तर तुझ्या अधरामृताचें पान केल्याशिवाय आज कधींच राहणार नाहीं. पहा, आज बरेच दिवस एखाद्या दासाप्रमाणें तुझे परोपरीनें आर्जव केलें. परंतु रतिसुख राहिलेंच पण प्रेमाचा एक शब्द-

सुद्धां तूं माझ्याशीं बोलत नाहींस. विचार कर. विचार कर. सुंदरी, कामानें संतप्त व अधीर झालेल्या या देहाला दृढालिंगन देऊन, त्यांस एकवारतरी शांत कर. नाहींतर तुझ्या प्राप्ती-करितां मला कडक उपायाची योजना करावी लागेल. सखे–

कालिंदी–कामांधा, असे शब्द उच्चारतांनाच तुझी जिव्हां कां गळून पडत नाहीं ? मांगा, कडक उपाय तूं कोणता योजणार ? मला मारणार हाच किनै. (मुलीस पोटाशीं धरून खालीं बसते व मान खालीं करून) मार मेल्या, ही मी मरायला तयार आहें. जें जन्मा बरोबरच प्रत्येक प्राण्याच्या मागं लागलं आहे, तें केव्हांतरी येणारच. मग त्याला भिऊन काय होतं आहे. मार. आतां कां उशीर करतोस ?

राजा–(किंचित हंसून) हंः तुला मारून मग मी काय करणार ! पण तूं हो म्हणे पर्यंत तुझें हाल करीन; तुझ्या हृदयांत रात्रं दिवस बाणाप्रमाणें सलत राहील, अशा भयंकर यातनेंत तुला ठेवीन. मग तुझे डोळे उघडून तुझ्या मनाला पश्चात्ताप होईल. म्हणून बजावतों; माझें ऐश्वर्य, माझी सत्ता, व माझी शक्ति तुला कुठें अझून माहीत आहे.

कालिंदी–चुलींत घाल मेल्या तुझं ऐश्वर्य, सत्ता नी शक्ति. पुनःपुन्हा कोडग्यासारखा व निलाजऱ्यासारखा बजावतोस कशाला ? मान काप एकदांची व घे हौस फेडून.

राजा–आणखी एकदां सांगतों, विचार कर बरें.

कालिंदी–केला, पुरता विचार केला. वेळ कशाला घाल-वितोस. एकदा मार ह्मणजे या दुर्धर जाचांतून मुक्त तरी होईन.

राजा–ठीक आहे. पण हे सुंदरी-(ती चटकन उभी राहते व

राजा तिच्या अंगावर हात टाकतो इतक्यांत ती मोठ्यानें ओरडते.)

कालिंदी–अहो, धांवा धांवा. हा मेला मांग–(इतक्यांत शांतिदुर्ग व क्रूरसिंह येतात.)

राजा–(त्यास पाहतांच मागें सरून) बोलाविल्याशिवाय तुह्मीं एकदम कां आंत आलां ?

शांति०–सरकार !—

राजा०–जास्ती बोलण्याचें कारण नाहीं. (थांबून) बरें. आलांत तें एका अर्थीं ठीकच झालें. (कालिंदीस) प्रियतमे, पुन्हा सांगतों, नीट विचार कर बरें !

कालिंदी–बैला, तूंच कर विचार.

राजा०–क्रूरसिंह, पहातोस काय ? ओढ तिच्या त्या कार्टीला.

क्रूर०–(मनांत) इतक्या थराला गोष्ट येईल, असें मला वाटलें नव्हतें. (कालिंदीच्या जवळ जाऊन पोरीला घेण्याचा प्रयत्न करतो.)

कालिंदी–मेल्या चांडाळा, त्या पोरीचें कां हाल करतोस. चटदिशी माझ्या शरिरावर दोन घाव घाल कसे. मी पोरीला सोडीत नाहीं जा. चालता हो माझ्याजवळून. मांगाला जी किंमत आहे, ती मेल्या तुला नाहीं. (तो मागें सरतो.)

राजा–ए षंढा, विचार कसचा करतोस ? ओढ, ओढ.

कालिंदी–(क्रूरसिंह पुन्हा पोरीला घ्यावयास जातो, त्यास) खबरदार मेल्या पुढें पाऊल टाकशील तर. तुझ्यापुढें रक्ताचें शिंपण करीन. चालला मेला पोरीला हात लावायला.

(इतक्यांत राजा पुढें होऊन पोरीला घेतो व क्रूरसिंहा-जवळ देऊन)

राजा–क्रूरसिंह, त्या कारटीला उलटी धर. आणि शांति-दुर्ग, तूं आपल्या तरवारीच्या फटकाऱ्यानें तिचें धडापासून शीर वेगळें कर. (क्रूर० पोरीला उलटी धरतो.)

शांति–(तरवार पुसीत मनाशीं) अशा क्रूर कृत्याशिवाय या चांडाळाच्या पातकाचा घडा भरणार नाहीं. परमेश्वरा, या दुष्ट कृत्याला मी होऊन प्रवृत्त झालों कीं काय, हें तूं जाणतच आहेस.

कालिंदी–(शांतिदुर्ग तरवार उगारतो तो धरून गहिंव-रानें) मामा, तुह्मी सुद्धां इतकें निष्ठुर कसें हो झालांत ! या पोरीनं तुमचा कोणचाहो अपराध केला आहे ? मामा, अहो आपल्या पांढऱ्या केंसांकडे पाहूनतरी माझ्या तान्हुल्याला जीवदान द्या. कुमारसिंहास ही गोष्ट कळल्यावर तो तुह्मांला काय ह्मणेल, याचा तरी विचार करा. पद्मिनी वहिनीलाही बातमी समजल्यावर, खचित तिला अत्यंत वाईट वाटून, तिच्या मनांतील तुमच्याबद्दलचा प्रेमभाव मावळून जाईल, हें तरी मनांत आणा. कां विनाकारण बालहत्येचा दोष तुह्मी आपल्या माथीं घेतां ?

राजा–(तिला मागें सारून) शांतिदुर्ग, तूं काय तिची विनवणी ऐकत उभा राहिला आहेस ? हाण. (इतक्यांत दुसरीकडे नजर जाऊन) थांब, शांतिदुर्ग. कोणीतरी आपलें हें कृत्य त्या झरोक्यांतून पहात आहे. जा, जा, लौकर. कोणी ही असो. ताबडतोब त्याला इकडे घेऊन ये. (शांतिदुर्ग आंत जाऊन कमला व चमेली दासींस घेऊन येतो, त्यांस) काय ग

ए सटवायांनो, सुखाची झोंप घ्यायची टाकून तुम्हांला कोणी हा नसता कारभार सांगितला होता? भोगा त्याचीं फळें आतां शांतिदुर्ग, आत्तांच्या आत्तां यांची गर्दन उडवा. क्रूरसिंहा, ठेव त्या पोरीला खालीं. (तो मुलीला ठेवतो) तूं एकीला मार आणि शांतिदुर्ग, तूं एकीला ठार कर. (क्रूरसिंह कमलेला ओढून घेतो. व शांतिदुर्ग चमेलीला धरतो; दोघीला तरवारीचे वार करणार इतक्यांत-)

कमला—सरकार, यांनीं आम्हांला दोघींना आणलं, पण पद्मिनी बाईसाहेब तिथं होत्या, त्यांना सोडून दिलं तें ?

राजा–(शांतिदुर्गास) कायरे ए थेरड्या, ती तुझी कारटी म्हणून सोडून दिलीस काय ? अरे बेरडा, बराच मान भारी आहेस !

शांति०—महाराज, पोटच्या गोळ्याची ममता फार कठीण आहे, ती सांगून येत नाहीं. किती जरी कठोर हृदयी बाप असला तरी मायाही तात्काळ त्याच्या अंतःकरणांत उभी राहणारच.

राजा—अरे, आग लाव तुझ्या त्या ममतेला. त्या कारटीनं माझ्या सर्वांगाला आग लावून सोडली आहे. जर आजची गोष्ट कोठें बाहेर फुटली, तर हरामखोरा, तुला यमाच्या घरचा रस्ता दाखवीन; शिवाय तुझ्या पोरीचे हाल करीन तें निराळेच. निलाजऱ्या, आतां तुझी ती पोर घरीं गेली असेल. पण आठ दिवसांत जर तुझ्या कारटीला माझ्या स्वाधीन केली नाहींस तर तुझी मी चामडी लोळवीन, हें ध्यानांत ठेव. (मनांत) झालें तें ठीकच झालें. मला तरी पुढें कारण योजावयाचें होतें, तें अनायासेंच आज घडून आलें. (उघड) क्रूरसिंह,

पद्मिनीच्या निकालाशिवाय या दोघींचा निकाल करतां येत नाहीं. तेव्हां यांना आतां तूं वाड्यांतील शेवटच्या अंधारी तळघरांत नेऊन ठेव. जा. (तो त्या दासींना घेऊन जातो.) शांतिदुर्ग, हं, चल घे त्या पोरीला, आणि एक घाव दोन तुकडे कर पाहूं ? आटप, उशीर करूं नकोस.

कालिंदी-(शांतिदुर्ग पोरीला धरून वार करणार इतक्यांत राजास उद्देशून) मेल्या मांगा, आज तूं मूर्तिमंत काळाचाच अवतार घेतला आहेस काय ? पण या बालहत्येबद्दल तुझ्या सर्वांगाला छिद्रें पडून तूं सडून सडून मरशील ! हें ध्यानांत ठेव. हाय गे बाळे सौदामिनी, तूं नाहींना आतां माझ्या दृष्टीस पडणार ! बाळे, अगोदर माझा प्राण जाऊन मग तुला मृत्यु आला असतां तर मला पापिणीला तुझी ही अशी भयंकर दशा पाहण्याची वेळ आली नसती. देवा, या बाल-रत्नाला या अभागिनीच्या पोटीं कशाला जन्म दिलास ? बाळे, मी खचित तुझी आई नाहीं ग ! कुणीतरी पूर्वजन्मींची दावे-दारीण होतें. (रडूं लागते.)

राजा-ए गध्या, आपलें काम करण्याचें सोडून तिच्या रडण्याकडे काय लक्ष देत उभा राहिला आहेस ? तिला अशीच रडूं दे. चल आटप.

कालिंदी-(शांतिदुर्ग, पुन्हां वार करण्याकरितां हात उगारतो तोंच बाळे ! बाळे ! असें ह्मणून मूर्च्छना येऊन धाडदिशी पडते. व लागलीच शांतिदुर्गाच्या हातांतील तल-वारही गळते.)

राजा-(त्याला लाथ मारून) ए नामर्दा, तुझें काम नव्हे

तें. चल, आण त्या कारटीला इकडे. (मुलीला हिसकावून घेतो.)

[इतक्यांत मागें चित्र विचित्र वेष धारण करून तयार असलेले
चसुरसिंह व त्याचा हेर हे एकदम येऊन चतुरसिंह राजास
लाथ मारून खालीं पाडतो व मुलीला घेऊन जातो.
इकडे त्याचा हेर कालिंदीला घेऊन जातो.
राजा उठूं लागतो तोंच,
पडदा पडतो.]

प्रथमांक समाप्त.



द्वितियांक.

प्रवेश पहिला.

स्थळ–राजमहाल (खासगी बैठक.)

पात्रें–राजा, क्रूरसिंह, देवलनाथ, शांतिदुर्ग, गुलाबसिंग, विश्वसेन, कुमारसिंह, व विजयसेन.

[गुलाबसिंग, कुमारसिंह व विजयसेन, यां शिवाय सर्व बसले आहेत.]

राजा–शांतिदुर्ग, परवांचा प्रकार कसा काय झाला असावा ?

शांति०–माझा कांहीं तर्क चालत नाहीं, सरकार.

राजा–बरोबरच आहे; तुझा तर्क कसा चालेल ? तुझ्याच पळून गेलेल्या कारटीचा हा प्रताप आहे, समजलास ? तिनेंच आपल्या एखाद्या गुलजाराकडून हें कृत्य करविलें आहे खास. नाहीं तर ही बातमी लागलीच बाहेर फुटून कालिंदी सुटली कशी?

शांति–महाराज, आपण धनी अहां; आपल्याला काय वाटेल तें आपण म्हणा. पण माझी पद्मिनी तशी नाहीं.

राजा–ती मोठी पतिव्रताच लागून गेली आहे कीं नाहीं. याद राखून ठेव शांतिदुर्ग, माझ्याशीं गांठ आहे. या वेळेस माझा संतापाग्नी इतका भडकला आहे, कीं तूं, तुझी कारटी व तुझा जामात, या तिघांची एकदम आहुतीच घ्यावी. परंतु– (वळून) क्रूरसिंह, त्या दुष्टाच्या तपासाकरितां गुलाबसिंगाला पाठविलें आहे; तो अद्याप आला नाहीं कां ?

क्रूर०--बहुतकरून तो आतां लौकरच येईल. पण सरकार, गांवांत मी बारकाईनें तपास केला, त्यावरून व नुकत्याच खजिना लुटल्याच्या आलेल्या बातमीवरून मला असें वाटतें, कीं आपल्या विरुद्ध कोणीतरी बंड केलें असावें. आणि त्यांनींच आपल्या परवांच्या कृत्याला व्यत्यय आणला असावा.

राजा--तूं म्हणतोस तसेंच मलाही वाटतें, पण याचा तपास कसा लागतो.

क्रूर०--आज आपल्या नगरांत शूर, धाडसी, धूर्त, काल्पनिक एका कुमारसिंहाखेरीज दुसरा कोणी दिसत नाहीं. त्यांनाच या कामगिरीवर पाठवावें ह्मणजे झालें.

राजा--बरोबर कल्पना काढलीस क्रूरसिंह. (इतक्यांत गुलाबसिंग येतो त्यास) काय गुलाब, कांहीं तपास लागला कां ?

गुलाब--नाहीं सरकार. पण इतकें मात्र खरें कीं, कोणी तरी आपल्या विरुद्ध खटपट करीत आहे खास.

राजा--मग यांत तूं अधिक तें काय सांगितलेंस ? आह्मी तर्क केलाच आहे. देवल, कुमारसिंहास घेऊन घेऊन ये जा. (तो जातो.) विश्वसेन, तूं जरा इकडे ये. (तो जवळ आल्यावर) तुझा कान पुढें कर पाहूं. (तो तसें करतो. त्याच्या कानांत कांहीं सांगितल्यासारखें करून) हें ध्यानांत धर, आणखी काम बिनबोभाट कर ऑ. जा. (तो गेल्यावर) शांतिदुर्ग, तूं जाऊन मंत्री विजयसेनास ताबडतोब घेऊन ये. (तो जातो. नंतर) क्रूरसिंह, असा माझ्याजवळ ये पाहूं. (तो जवळ आल्यावर) हें पहा, तुला मी एक कारागिरी सांगणार आहे. ती तूं बजाविलीस कीं, तुला सरदारी मिळेल.

क्रूर--सरकार, सरदारीच कशाला पाहिजे आहे. हा दास

आपल्या पायाचा चाकर आहे. आणि कितीही दुर्घट कामगिरी असली तरी ती करण्यास अगदीं एका पायावर तयार आहे, आज्ञा होण्याचा मात्र अवकाश.

राजा--तुझी इतकी हिंमत असल्यावर मला मग त्याची काळजीच नाहीं. हें पहा, कुमारसिंह आत्तां येईल. त्याला मी आपल्या कार्याला विघ्न करणाऱ्या व सरकारी पैसा लुटून नेणाऱ्या इसमाच्या तपासास पाठविणार आहें. पण तूं व गुलाब त्याच्या पाळतीवर राहून त्याजवर अकस्मात छापा घालून त्यास जगांतून नाहींसा करून टाका. त्याजवर वाढत चाललेली लोकप्रीति रात्रंदिवस माझ्या डोळ्यांत खड्यासारखी खुपत आहे. काय सांगूं क्रूरसिंह ! पूर्व कृतीची स्मृति जाग्रत ठेवणारा हा मूर्तिमंत बाण माझ्या अंतःकरणास एक सारखा सलत आहे. येवढी कामगिरी बजाविलीस कीं, माझा हृद्रोग, नाहींसा होऊन तुला सरदारी मिळालीच समज. इतकेंच नव्हे; पण मी तुला आपला मुख्य दिवाण करीन. माझी खात्री आहे कीं, तूंच हें काम बेमालूम व बिनबोभाट करशील. मग कसें काय ?

क्रूर०--सरकारच्या अन्नानें पोसलेला हा देह सरकारचा आहे. धन्याच्या कामाकरतां प्रसंगविशेषीं प्राण खर्ची पडला तरी हरकत नाहीं.

राजा--शाबास. तुझी हिंमत पाहूनच माझ्या मनाचें समाधान झालें आहे. (इतक्यांत कुमारसिंहासह देवलनाथ येतो.)

कुमार--(बसल्यावर) इतक्या तांतडीनें सरकारचें पाचारण कां झालें !

राजा--कुमारसिंह, राज्याची जितकी मला काळजी आहे

तितकीच तुला आहे, किंबहुना अधिक म्हटली तरी चालेल. तूं आपल्या शुद्ध वर्तनानें, व अमृततुल्य मधुर भाषणानें, लोकप्रीतीच्या प्रवाहाचा ओघ आपल्याकडे इतका कांहीं वळवून घेतला आहेस, कीं त्यांना तूं प्रति राजाच आहेस असें वाटतें.

कुमार०–छे, छे, महाराज, हें काय आपण बोलतां! महाराजांकडून माझी व्यर्थ स्तुती होत आहे. खरोखर मी या योग्यतेला पात्र नाहीं. सरकारनें मला थोर मानलें आहे, यांत सरकारचाच मोठेपणा आहे.

राजा--तुझी मी व्यर्थ स्तुती करतों अशांतला भाग नाहीं. खरोखरच वस्तुस्थिति तशी आहे. परंतु मी कांहीं त्याबद्दल विषाद मानीत नाहीं. उलट मला आनंदच होतो. तुझ्यासारखीं सद्गुणी माणसें माझ्या मंत्रीमंडळांत आहेत, याचें मला भूषणच आहे. असो. तुला जें मी आत्तां बोलावणें पाठविलें होतें, त्याचें कारण–आलिकडे कोणीतरी उपद्रव्यापी मनुष्य बंड करण्यास प्रवृत्त झाला आहे, असें मी ऐकतों. परवां सुवर्णदुर्ग व क्षीरपट्टण, या दोन प्रांतांकडून इकडे येत असलेला खजिना मध्यंतरीं लुटून नेला आहे, याची खबर तुला असेलच.

कुमार०–हो. आहे सरकार. मीही त्या तपासांत आहें.

राजा--पहा, मी उगीच ह्मटलें, राज्यव्यवस्थेची काळजी माझ्यापेक्षां तुला अधिक आहे ह्मणून? आतां जेणेंकरून विशेष प्राणहानी होणार नाहीं व राज्यांत बखेडे माजणार नाहींत अशी व्यवस्था करून या दरबारचा नांवलौकीक वाढविण्याविषयीं प्रयत्न करणें तुझ्यासारख्या शूराचें काम आहे.

कुमार०–कबूल आहे महाराज. मृगनाभींतील कस्तुरीप्रमाणें

भूमंडळावर आपली कीर्ति प्रसृत करणें हें आमच्यासारख्या सेवकांचें आद्यकर्तव्य आहे, व यांतच आह्मांलाही भूषण आहे.

राजा–तर मग आपल्या दरबाराला त्रास देणारा कोण मनुष्य आहे, याच्या तपासाकरितां तूं आत्तांच्या आत्तां गेलें पाहिजे. पहा, काळीज खाऊन टाकणाऱ्या रोगोत्पत्तीचीं चिन्हें दिसूं लागल्याबरोबर लागलीच त्यावर रामबाण उपयाची योजना झाली नाहीं, तर प्राणासी गांठ येईल. कारण या गोष्टी क्षम्य नव्हेत (थांबून) काय ? मी ह्मटल्याप्रमाणें शत्रूवर चाल करून जाण्याचें धैर्य तुझ्या अंगीं आहे कां ? नाहीं तर दुसऱ्या कोणावर सोंपविलें पाहिजे.

कुमार०–मज विषयीं हल्लींचेच प्रसंगीं महाराजास इतकी शंका कां वाटते, हें मला कळत नाहीं. एकदां शस्त्रदेवतेचें आव्हान केलें कीं, रणश्रीचें वारें अंगांत खेळूं लागलेंच ह्मणून समजावें. मग तेथें रात्र नाहीं, बेरात्र नाहीं, एकटा नाहीं, दुकटा नाहीं. सिंहासारखी गर्जना ठोकीत शत्रूच्या अंगावर बेधडक चाल करून जाण्यास हा देह मागें पुढें कधींही पाहणार नाहीं.

राजा–शाबास, वीरा शाबास ! तुझी ही वीरश्रीच तुला यश देईल. जा. (इतक्यांत विजयसेनासह शांतिदुर्ग येतो.)

विजय०–(बसल्या नंतर) काय आज्ञा आहे सरकार !

राजा–कांहीं मोठेंसें काम नव्हतें. प्रस्तुत जो आपल्याला शत्रू उत्पन्न झाला आहे, त्याच्या विषयीं विचार करण्या करितां ह्मणून तुह्माला मुद्दाम बोलावणें पाठविलें होतें. पण ती कामगिरी कुमारसिंहानीं स्वतःच होऊन आपल्या अंगावर घेतली आहे.

आतां त्याच्या बद्दल काळजी राहिली नाहीं. तुह्माला काम असेल तर जावें तुह्मी.

कुमार०—मी रजा घेतों सरकार.

राजा—जा. नीट जपून आणि मोठ्या सावधगिरीनें जा आं. या खेपेला जरी तो मिळाला नाहीं, तरी हरकत नाहीं. पण त्याचा छडा तरी काढून ये. (कुमारसिंह मुजरा करून जातो.)

विजय—मीही आज्ञा घेतों सरकार.

राजा—बरें आहे. (विजयसेन जातो.) क्रूरसिंह, गुलाब तुह्मी आपापल्या कामाला जा. देबल, तूंही त्यांच्याबरोबर जा. (ते जातात.) शांतिदुर्ग, तूं माझ्या बरोबर चल बरें.

(असें ह्मणून राजा शांतिदुर्गासह जातो.)

प्रवेश २ रा.

स्थळ—नगराबाहेरील राजमार्ग.

पात्रें—चतुरसिंह, द्युमत्सेन, क्रूरसिंह, व शांतिदुर्ग.

द्युम०—(प्रवेश करून) कितीतरी आश्चर्य मानण्यासारखी गोष्ट आहे. जिचा माझा जन्माचा संबंध, जी केवळ मला जीव कीं प्राण, जिला जन्मांत कपट कसें तें ठाऊक नाहीं, अशा माझ्या प्रियेनें एवढी हृदयभेदन करणारी गोष्ट माझ्या पासून छपवून ठेवावी, याचें कारण काय असावें बरें ? (थांबून) त्यांत तसेंच कांहींतरी गूढ असेल. इतकी का ती खोल मनाची होती! शाबास सुंदरी, असें हे तुझ्यासारखें दिव्यरत्न माझ्या सुदैवानें मला प्राप्त झालें असून माझ्यानें त्याचें रक्षण करवलें नाहीं. तेव्हां केवढा मी अभागी ! मी आजपर्यंत तिचा शोध करतां करतां

थकलों. शेवटीं तिची सखी कोकिला हिला खोदखोदून विचारलें, तेव्हां तिनें मला सर्व हकीकत सांगितली. ह्मणून पुन्हा तपास करण्यास तरी साधन झालें. पहा, त्या सौभाग्य लक्ष्मी शिवाय माझें सदन किती तरी भयाण दिसत आहे ! ज्या स्थलीं माझी प्रियतमा त्या चिमुकल्या बालचंद्रिकेसह सानंद संचार करीत होती, तेंच सदन आज मला स्मशानवत् भासत आहे. हरिणाक्षी, तुझी काय बरें स्थिति झाली असेल ? कोमल अर्भकासह तुला त्या नराधमानेंच नेलें असेल काय ? खचित त्या दुष्टांनीं जर तुला नेलें असेल, तर तो मांग तुझी नानाप्रकारें विटंबना करील; तूं वश व्हावेंस ह्मणून तुला नानाप्रकारच्या यातना भोगावयास लावील. सुकेशी, अशा प्रसंगीं तुझें संरक्षण तुझ्या बळकट पातिव्रत्याखेरीज दुसरें कोण करणार आहे !

चतुर०– (विचित्र वेष धारण करून प्रवेश केल्या बरोबर) एक परमेश्वर.

शुभ०– (त्याचा शब्द ऐकून त्याजकडे पहात) काय हो, तुह्मी कोण ? अगदीं ओळखीच्या मनुष्यासारखें तुह्मी माझ्या प्रश्नाला उत्तर दिलेंत तें.

चतुर०–मी तुमच्या प्रश्नाला थोडेंच उत्तर दिलें होतें. मी आपल्या प्राक्तनाला दोष देत सहज ह्मटलें; तें तुमच्या प्रश्नाला कदाचित् उत्तर झालें असेल. तुह्मीतरी भलेच गृहस्थ दिसतां बोवा.

शुभ०–मी भला असो कीं बुरा असो. माझ्या प्रश्नाला सहजीं उत्तर मिळालें खरें. पण तुमच्या बोलण्यावरून तुह्मी माझ्यासारखेच दुःखी प्राणी दिसतां. मग तर दोघांची सांगड एके ठिकाणींच झाली ह्मणावयाची.

चतुर०–हो हो. हें काय विचारतां. पण कायहो आपली सांगड नदींत पोहणारांच्या कमरेला एक भोंपळ्याची सांगड असते तशीच नव्हे कां ?

द्युम०–तशीच तर काय ?

चतुर०–चला तर मग आपण ही सांगड आपल्या कमरेला बांधून चिंता समुद्रांत पोंहोण्यास जाऊं, आणि सांगडीस निराशेचें छिद्र पडून जर ती तळाशीं गेली तर आपण चटदिशीं जळसमाध घेऊन निजधामास पाठविलेल्या आमच्या आजोबास भेटून येऊं. कां कसें काय ?

द्युम०–वा. खाशी युक्ति. आपल्या नादी लागल्यावर मुक्ति खास मिळावयाची. पण मी तुह्मांला असें विचारतों, कीं तुह्मी कोणत्या दुःखानें पीडित अहांत ? तें तरी सांगा एकदां.

चतुर०–पण माझा नेम तुह्माला ठाऊक आहे कां ? कीं दुसऱ्यांनीं सांगितल्याशिवाय मी आपली हकीकत त्यांला कळवीत नसतों. समजलें आतां ?

द्युम०–बरें. तसें कां होईना. मीच सांगतों प्रथम. मग तर झालें ?

चतुर०–ठीक आहे, आह्मी ऐकूं. बोला.

द्युम०–मी नंदिग्रामचा राहणारा आहें.

चतुर०–ह्मणजे. शंकराच्या पुढचेच ना ? मग तुह्मांला कोठें शिंगें दिसत नाहींत तीं ? (खदखदां हंसून चमत्कारिक उभा राहतो.)

द्युम०–हें हो काय ? असें काय करतां. आणि वेडेवांकडे काय उभे राहिलांत. तुह्मांला वेडबीड तर नाहीं लागलें ?

चतुर०—वेड वेड. खरेंच वेड. वेड कशाला ह्मणतात हो ?

द्युम०—असे वेडे विद्रे चाळे केले ह्मणजे त्याला वेड ह्मणतात.

चतुर०—असं, असं. सांगा तर मग तुह्मांला शिंगें कां नाहींत तीं ? कां शिंगांशिवाय नुसतेच तुह्मी बैल ? लटपट कशाला, बोला झटपट ! उगीच वटवट करण्याची मला खटपट नको. (उड्या मारूं लागतो.)

द्युम०—(मनांत) कोण चमत्कारिक प्राणी आहे हा ? (उघड) कांहीं पिशाचबाधातर झाली नाहींना आपल्याला ?

चतुर०—पिशाचबाधा; कशी असते ? भुताला पिशाश्च बाधा ? (त्याच्या पुढें तोंड पसरून) खाऊं आं ! !

द्युम०—(किंचित् मागें सरून) कोठून या समंधाच्या हातीं सांपडलों कोणास ठाऊक !

चतुर०—(त्याच्यापुढें उड्या मारीत येतो.) अहो, हा मेलेला समंध नाहीं. जिवंत समंध आहे, जिवंत. (चमत्कारिक तोंड करून) बोला बोला. आतां कां सांगत नाहीं? भागुबाई!(हंसतो.)

द्युम०—जा मूर्खा, मी असल्या वेड्याशीं बोलत नसतों.

चतुर०—(वांकुल्या दाखवीत) अहो राव, सांगा कीं.

द्युम०—काय सांगूं ? आपलें कपाळ ?

चतुर०—तुमचें कपाळ बोलत असतें वाटतें? (हंसून.) मग शिंगें काय करतात सांगा पाहूं. (त्याचें तोंड दाबून धरतो.)

द्युम०—(त्याचे हात सोडवून) अरे, हें काय करतोस ?

चतुर०—तोंड बंद केलें ह्मणजे तुह्मी कपाळानें बोलूं लागाल, शिंगें काढाल, कान झाडाल, डोळे फाडाल, ह्मणून पहात होतों. बरं हं, सांगा पाहूं.

द्युम०–सांगूं काय ? तुझें डोस्कें ? मी आपला जातों.

चतुर०–अहो, डोस्कें कशाला? " वादे वादे जायते तत्व बोधा " (हंसतो.) तोंडानें बोला.

द्युम०–(मनाशीं) कृती तर वेड्यासारखी, पण बोलणें पंडिताप्रमाणें !

चतुर०–(त्याच्या पुढें सरून) अहो राव, सांगा सांगा.

द्युम०–गड्या, तूं जर असा एका जाग्यावर उभा राहून स्वस्थ मनानें ऐकत असलास तर सांगतों. नाहीं तर मी आपला जातों.

चतुर०–(दूर सरून) हा पहा मी एखाद्या निर्जीव लांकडा सारखा व सजीव भूतासारखा मुकस्तंब आगडबंब उभा राहतों. (तसें करून) आतां (चुटक्या वाजवून) हं, चालूं द्या.

द्युम०–अरे चालूं द्या काय ? कांहीं कहाणी बिहिणी कां आहे ?

चतुर०–कसें तुम्हांला कळत नाहीं बुवा ? अहो दुःखाची कथा ह्मणजे कर्माची काहणीच ! (पुन्हां चुटक्या वाजवून) बोला, बोला.

द्युम०–बोलतों बाबा. अरे मी त्या नंदिग्रामचा एक सुख वस्तु प्राणी आहें.

चतुर०–बरें समजलों. तुह्मी बैलोबा अहांत, पुढें.

द्युम०–तेथें मी आपल्या पत्नीसह सुखानें राहत असतां ती एकाएकी नाहींसी झाली.

चतुर०–पाट लावून गेली. पुढें?

द्युम०–असें अभद्र काय बोलता हो !

चतुर०—मग तिला कोणी नेली होय ?

द्युम०—हेंच संभवनीय आहे. मी असें ऐकलें आहे, कीं तिला येथील एका नराधम लांडग्यानें नेली आहे.

चतुर०—लौकर चौकशी करा बरें. नाहीं तर बकरी ह्मणून तो तिला मटकाऊन टाकील. (मनांत) तशीच स्थिति आली असतां सुदैवानें सुटली होती. पण—(उघड) जा. जा. उभें राहूं नका.

द्युम०—अहो, पण मी जाऊं कोठें आणि तपास करूं कसा ?

चतुर०—इकडे या, ह्मणजे सांगतों. (तो जवळ आल्यावर त्याच्या कानांत कांहीं सांगून) हं. जा. जलदी करा.

द्युम०—बरें तर जाऊं मी ?

चतुर०—पुन्हा पुन्हा काय विचारतां हो. चालूं लागा कसे ? (तो गेल्यावर मनाशीं) काय मी या भोळ्या पुरुषासी पठपणा केला ! तेव्हांच समजलों कीं, हा आमच्या कालिंदीचा भ्रतार आहे. ह्मणून तर त्याला मी ही दिशा दाखवून दिली. माझ्यापेक्षां तो मात्र जास्त कळकळीनें त्या बिचारीचा तपास करील, यांत संशय नाहीं. एकदां मी मोठ्या शिताफीनें वाघाच्या जवड्यांतून तिला सोडवून नेली, आणि गुरुजींच्या स्वाधीन केली. पण तिला गंगेवर स्नानास जाण्याची कुठून बुद्धि झाली कोण जाणे, आपली एकाएकीं नाहींशीच झाली ! मग कां नदींत पडून बुडून मेली, कां राजसेवकांनीं पुन्हा तिला धरून नेली, हें कांहींच कळत नाहीं. तिचें तें गुरुजींच्या जवळ असलेलें गोजिरवाणें लहान बालक केविलवाणें रडतांना पाहून पोटांत कसें तटतटां तुटतें; पण काय उपयोग ? (इतक्यांत माणसाची चाहूल लागतांच तिकडे पहात पहात बाजूला

होतो, तोंच विश्वसेन डोकीवर गांठोडें घेऊन प्रवेश करतो.)

विश्वसेन–(डोक्यावरील गांठोंड खालीं ठेवून) हुःश हुःश. (घाम पुशीत) दमला बुवा जीव. या कामीं किती तरी त्रास पडला. रानावनांत एका गोजिरवाण्या पोराचा तपास करीत हिंडत असतां, सूर्याच्या प्रखर तापानें अंगाची लाही लाही होऊन गेली ! घसा अगदीं कोरडा ठणठणीत पडला, म्हणून वाटलें कीं, कोठें तरी थोडें पाणी पिऊन अंमळ विश्रांति घ्यावी. पण रामाचें नांव ! शपथेला कोठें ओंगळ पाण्याचें डबकें तरी दृष्टीस पडावयाचें होतें ! बरें, ज्या कामा करितां निघालों, तेंही साध्य होण्याचा कोठें रंग दिसेना. तेव्हां पुढें काय करावें ? याबद्दलच्या नाना प्रकारच्या कल्पनेंत गर्क झालेला, परंतु तर्क रहित जो मी, त्यानें माध्यानार्कप्रखरतेजानें तप्त झालेल्या या शरीरास, एका शीतल अशा वृक्ष छायेंत लोटांगण घालावयास सांगितलें, आणि हातपाय पसरून तेथेंच क्षणभर पडलों. मग थोडासा विचार करून झटकन् उठून बसतो तों दूर एक सकुमार, गोंडस बांध्याचें, गोरेंगोमटें पोर दुटदुटु चालतांना दिसलें. त्या बरोबर आमच्या आशालतिकेस किंचित् अंकूर फुटले. मग लागलीच त्या पोराजवळ लपत छपत जाऊन तें चटकन् उचलून घेतलें, आणि पटकन् बगलेंत मारून पोबारा केला. पण मग दुसरीच काळजी उत्पन्न झाली. या पोराची पुढील व्यवस्था कशी करावी ! कारण रानांत पहावें तों जिकडे तिकडे गडबड; कोठें शेतकरी नांगराला आपले बैल जुंपून तोंडानें राम्या ओय, गवळ्या ओय, अशी बडबड करीत आहेत; तर कोठें गुराखी पोरें रानांत गुरें चरावयास सोडून एके ठिकाणीं अड्डा करून खेळत बसलीं आहेत. " इकडे आड तिकडे विहीर " अशी मनाची

क्षणभर वृत्ति झाली. तेव्हां एकदां सभोंवार नजर फेंकून पाहिलें तों एक निबिड जाळी दृष्टीस पडतांच वाटलें कीं, आतां आपलें काम झालें. गेलों बोवा तेथें, आणि महाराजांच्या आज्ञेप्रमाणें त्या पोराचें काम तर काढलें. पण एक मोठी चूक झाली. धडाचें मोटकुळें करून मोठ्या लगबगीनें बांधलें, त्या गर्दींत शीर तेथेंच विसरलों. जर कां तें कोणी पाहिलें, आणि बोभाटा केला तर आमची शंभरवर्षें भरलींच म्हणून समजावीं. (थांबून) पण मी असा भितों काय म्हणून ! मला महाराजांचा आश्रय आहेना ? झालें तर मग. आतां हें लचांड एकदां महाराजांच्या स्वाधीन करून टाकावें, म्हणजे आपण सुटलों. (असें म्हणून गांठोडें पुन्हा डोकीवर घेऊन जातो, त्याच्या मागोमाग चतुरसिंह लगबगीनें निघून जातो.)

प्रवेश ३ रा.

स्थळ–जंगल, रस्ता.

पात्रें–क्रूरसिंह, चतुरसिंह, व शांतिदुर्ग.

क्रूरसिंह– (प्रवेश करून) लोक नेहमीं म्हणतात कीं सत्त्यानें चालावें, सत्य बोलावें, सदाचरण ठेवावें, पण सध्यांच्या कालीं सत्य हें नामशेष होऊन असत्त्याचें प्राबल्य माजलें आहे. सत्त्यानें चालेल तो उपाशीं मरेल व असत्त्यानें चालेल तो पोटभर चरेल, अशीच स्थिति आजकाल आहे. लांब कशाला ? माझेंच उदाहरण. एका सकुमार अबलेला राजसेवेंत अर्पण केली तों लागलीच बहादुरी मिळाली. आतां लोकप्रिय कुमारसिंहाला यमसदन दाखविलें, कीं सरदारी नाहीं तर मुख्य मंत्र्याची जागा मिळणार ! किंवा दोन्हीही

मिळतील. या वरून नीचाला सौख्य व सज्जनास यातना, अशीच परमेश्वराची योजना दिसते. मग असत्त्यानीं जर सुख प्राप्ति होत असली तर सत्य मार्गाचें अवलंबन कोण करील ? (थांबून) हो दुसरी एक म्हण आहे. 'राजा कालस्य कारणं ' व तीच सांप्रत प्रसंगीं लागू पडते. सध्यां, वाहत्या गंगेंत हात कां नाहीं धुऊन घेतले ? आपण तर असेंच करणार. कोणी निंदो अथवा वंदो. आजची संधी उद्यां येणार नाहीं. बरें, पण गुलाब व देवल अद्याप कां बरें आले नाहींत ? (थांबून) हो. मीच विसरलों. त्यांना संकेतस्थानीं यायला सांगितलें आहे, तेथेंच ते येतील. महाराजानीं शांतिदुर्गाला कशी पण माझ्या मनासारखी कामगिरी सांगितली. इकडे आह्मांला हें कार्य सांगितलें व तिकडे त्याला प्रत्यक्ष आपल्या पोरीचा प्राण घ्यावयास सांगितलें. एकूण आज तें दंपत्य इहलोकचा आपला प्रवास संपवून स्वर्गलोकचा मार्ग धरणार तर ! असो. आपण तर आपली कामगिरी बजावणारच, पण शांतिदुर्ग कशी काय बजावतो ती पहाणें आहे. (स्वतःस) चला दिवाणजी, चला. आतां येथें काय करतां ? (असें ह्मणून चालूं लागतो.) किती तरी हा काळोख किट्ट पडला आहे. डोळ्यांत बोट घालीन ह्मटलें तर दिसत सुद्धां नाहीं. (वर पाहून) पहा, हें मेघोदकानें भरलेलें अभ्रपटल झपाझप सृष्टिसौंदर्य लपवीत आहे. यावरून आमच्या पापकर्मावर आच्छादन घालण्याचा ईश्वरी संकेतच दिसतो. मग आह्मांस सूर्यप्रभा विषवत् व तिमिरावगुंठित रजनीसमय अमृततुल्य कां वाटूं नये ? तिमिरयामिनी ही चौर्यकर्म करणाराची सखीच आहे. तिचें साह्य मिळाल्यावर कार्य हें हटकून सफल होणारच. (असें ह्मणून जातो. तोंच चतुरसिंह येतो.)

चतुर०—या प्रत्यक्ष कृतांताच्या भाषणावरून आज माझ्या

कुमारावर व त्याच्या प्रियपत्नीवर घाला आहे, यांत संशय नाहीं. आतां तो शूर आहे, एकाएकीं या मांगांना हार जाणार नाहीं. पण त्या अबलेचें या वेळीं रक्षण कोण करणार ? प्रथम तिच्याच साह्याला आपण जावें. मग पुढें कुमाराबद्दल विचार करतां येईल. (जातो, इतक्यांत शांतिदुर्ग दुसऱ्या बाजूनें येतो.)

शांति०–हें जगदोद्धारा नारायणा ! काय मजवर आज हा प्रसंग आणलास ! ज्या कोमल लतिकेचें माझ्याच हातानें रोपण झालें, जिचें प्रेमोदकानें सिंचन करून आज पर्यंत परिवर्धन केलें, व जी आत्तांशीं कोठें पतिरूप वृक्षाधाराचा सुखानुभव घेऊं लागली, तोंच तिला याच माझ्या या निर्दय करानें छेदून टाकण्याचा कठिणतर प्रसंग मजवर यावा काय ? हर हर ! किती नीच कर्म हें ! " जैसा खाटिक पाळिल्या बकरिचा कापी गळा हें तसें " या कव्युक्तींत आणि आजच्या माझ्या कृतींत अंतर आहे काय ? असो. (विचार केल्यासारखें करून) आतां असेंच करावें हें ठीक. जामात कुमारसिंहाचा आज मृत्युलोकचा अवतार संपणारच. मग पोरीला जिवंत ठेवून तरी काय करावयाचें ? तिला यमलोकचा रस्ता दाखवावा आणि आपणही त्याच मार्गानें जावें. म्हणजे मागें कोणी कोणाचें दुःख पाहण्याला जिवंत राह्यला नको. खाशी. नामी युक्ति सुचली:

(जातो.)

प्रवेश ४ था.

स्थळ–कुमारसिंहाचा शहराबाहेरील दुमजली बंगला व पुढें बगीचा.

पात्रें–कुमारसिंह, पद्मिनी, शांतिदुर्ग, व चतुरसिंह, आणि त्याचा हेर, बखतसिंग व मशालवाला शिपाई.

(बंगल्याच्या माडीवर कुमारसिंह लढाईच्या वेषानें उभा असून पद्मिनी त्याच्या कंबरपट्ट्यांतील गोंडा हातीं धरून खिडकींत बोलत उभीं राहिलीं आहेत.)

पद्मिनी–यावेळेस माझं थोडं तरी ऐकायचं होतं, कोण बाहेर हा काळोख पडला आहे, यावेळीं न गेलं तर चालायचं नाहीं कां ?

कुमार०–प्रिये, नाहीं गेलों तर लोक मला भित्रा म्हणतील. तूंच सांग बरें, जो मी महाराजांच्या समोर मोठ्या हिंमतीनें प्रतिज्ञा करून आलों, तो तुझें ऐकून तसाच घरांत स्वस्थ बसूं आणखी मी आपल्या कीर्तीला कलंक लावून घेऊं ! तुला असें करणें बरें दिसतें कां ?

पद्मि०–बरं कसं दिसेल ? इकडल्या उज्वल कीर्तीला कलंक लागावा, असं माझ्या मनांत तरी येईल कां ? उलट आपल्या शौर्याची लोकांनीं केलेली तारीफ मला ऐकायला मिळावी अशीच मी वारंवार इच्छा करते. पण त्या दिवशीं तें राजवाड्यांतलें कृत्य पाहिल्या दिवसापासून, इकडची छाया सोडून क्षणभर सुद्धां दूर रहावेंसें वाटत नाहीं. त्या बिचाऱ्या चमेलीची काय अवस्था झाली असेल ? तिनं जर मला कालिंदी वन्संना

इथं आणल्या आहेत ह्मणून सांगितलं नसतं, तर त्या दिवशीं-चा अघोर प्रकार कशानं मला समजला असता ? (आंगावर शहारे आल्यासारखें दाखवून) नको ग बाई त्या दिवशींचं स्मरण ! मेली आठवण झाली कीं, लागलीच आंगावर थरारून कांटा उभा रहातो, दरदरून घाम सुटून भीतीनं सर्व शरीर लटलटा कांपू लागतं, नी कशी स्थिति होते ती देखील मेली लवकर सांगतां येत नाहीं. (भ्यायल्या सारखें दाखवून त्याच्या कमरेला विळखा घालते.)

कुमार०—चारुगात्री, भिऊं नकोस. मी तुझ्या जवळ आहें ना ? (तिला सोडून) शिव ! शिव ! ! काय त्या बिचारीवर भयंकर प्रसंग ! तिला अत्यंत दुःसह वेदना होत असतां आमच्या पासून तिळभर सुद्धां मदत होऊं नये. केवढ्या शरमे-ची गोष्ट आहे ? खरोखर महाराजांची नीति बिघडत चालली. पण याचा परिणाम चांगला होईल असें मला वाटत नाहीं. त्यांच्या भोंवती नेहमीं दुष्ट लोकांचें जाळें पसरलेलें असतें. तें कोणत्या सत्पुरुषावर आणि कोणा सुशील सतीवर कसा घाला घालतील, याचा कांहीं नेम सांगवत नाहीं. हेंच पहाना ? त्या दिवशीं प्रत्यक्ष तुझ्या बापाकडून त्या सकुमार पोरीची हत्त्या करविली. तो म्हातारा किती सालस, दयाभूत, पापभीरु, पण करतो काय ! तो काय आणि आम्ही काय, एकदां वाघाच्या जबड्यांत सांपडलों म्हणजे सर्व नाड्या एकदम आकर्षण होतात. (तरवार फेंकून देऊन) धिःकार ! धिःकार असो आमच्या पुरुषत्वाला ! ! देवा, आम्हांला शूर कुलांत उत्पन्न केलेंस, त्यापेक्षां हीन कुलांत स्त्रियां-चाच जन्म दिला असतास तर हातांत चुडे भरून चुलीपाशीं तरी बसलों असतों. (तरवार उचलून घेऊन) नाहीं तरी

सध्यां आह्मी पुरुष रूपी स्त्रियाच आहोंत. फक्त स्त्रियांचीं कंकणादि भूषणें मात्र आमच्या हातांत नाहींत, एवढाच कायतो फरक. प्रिये, तुला काय सांगूं ? जर मी या राजाचा मिंदा झालों नसतों तर मानलेल्या भगिनीचा सूड आत्तां घेतला असता ! पण काय करूं ? नाइलाज आहे.

पद्मिनी–आपण असे कष्टी कां होतां ? वन्संच्या दुःखाचा परिहार आपल्या हातूनच व्हावयाचा असल्यास होईल. प्रत्यक्ष नाहींतर अप्रत्यक्ष रीतीनं परमेश्वरावर भरंवसा ठेवून त्या प्रयत्नाला लागणं झालं, तर देव यश कां देणार नाहीं ?

कुमार०–अलबत देईल. आज एकदां बंडखोराचा समाचार घेऊन येतों, आणि मग त्याच प्रयत्नाला लागतों.

पद्मि०–एकूण आपण जाणारच ना ?

कुमार०–गेलें तर पाहिजेच.

पद्मि०–तर मग मला घेऊन जावं.

कुमार०–भलतेंच. असें कोठें झालें आहे कां ? स्त्रियांचें लोढणें गळ्यांत अडकवून आह्मी युद्ध कसें करणार ?

पद्मि०–मग मी नाहीं जाऊं द्यायची.

कुमार०–वेडे, भलत्याच कामीं असा हट्ट धरून कसें बरें चालेल ? आजपर्यंत कितिक वेळां मी बाहेर गेलों असेन, पण असा हट्ट तूं कधींच केला नाहींस. आज इतकी भितेस कां ?

पद्मि०–भिण्याचं कारण मी पूर्वीच कानावर घातलं आहे. आपल्या पश्चात् माझ्या पातिव्रत्याचं रक्षण होणं कठीण दिसतं, ह्मणून या खेपेस मी इतकी भित्री झाले.

कुमार०—मी फारवेळ तिकडे राहणार नाहीं. दोनप्रहर रात्रीच्या आंत परत येतों. मी येईपर्यंत दासीजनांच्या समागमांत व पुराणांतील देवादिकांच्या गोष्टी वाचण्यांत आपला वेळ घालीव; ह्मणजे तुझ्या मनाला करमणूक होईल.

पद्मि०—आपली आज्ञाच होत आहे, ह्मणून इकडलं येणं होईपर्यंत मी तसं करतें. पण लौकर येणं होईल ना ?

कुमार०—मी तुझी काळजी बाळगून लौकर परत येतों. मग तर झालें ?

पद्मि०—आतां मी पुढं काय बोलणार ?

कुमार०—बरं, जाऊं मी आतां ?

प०—बाहेर अंधार आहे. मार्गाला लागेपर्यंत मी दिवा घेऊन येतें.

कुमार०—नको. नको. अग आतां आह्मांला अंधार आणि प्रकाश हा सारखाच. उलटे प्रकाशांतून एकदम बाहेर पडलें ह्मणजे प्रथम अंधार होतो, आणि मग दिसूं लागतें. जों पर्यंत आमचे नेत्रसूर्य मार्गदर्शक आहेत, तों पर्यंत अंधारांतलीं कामें प्रकाशाप्रमाणेंच होतात.

पद्मि०—थोडसं कांहीं बोललं कीं दृष्टांत नी दाखले आपले जवळ उभेच आहेत. खालीं तर उतरणं व्हावं.

(तो खालीं उतरून येतो. व मागाहून पद्मिनी प्रकाश दीपिका घेऊन येते.)

कुमार०—(थोडेंसें चालल्यावर) प्रिये जा तूं आतां.

प०—लौकर येणं व्हावं बरं. घरीं येईपर्यंत माझे डोळे मार्गाकडे कसे अगदीं लागून राहतील.

कुमार०--(तिच्या तोंडावरून हात फिरवून चुंबन घेतल्याचा भास दाखवीत) जा बरं. तूं अगदीं काळजी करूं नकोस. (जातो व ती हळूहळू परत फिरते, इतक्यांत शांतिदुर्ग हळूच मागून येऊन तिच्या हातांतील दिवा फुंकून टाकतो.)

प०--अग बाई, दिवा वाऱ्यानं गेला वाटतं.

शांति०--(मनाशीं) आतां माझें हें हृदय दगडापेक्षांही कठीण केलें पाहिजे. (असें ह्मणून तिला धरून खालीं पाडतो.)

प०--(पडतां पडतां घाबरून) अग बाई, कोण हें !

शांति०--चूप रहा पद्मे, खबरदार पुढें भाषण करशील तर.

प०--काय ! मी आपल्या प्रिय पित्याच्याच मुखांतली ही वाणी ऐकत आहे कां ! कां मला उगीच भास झाला.

शांति०--(मनांत) अखेर कन्यामोह मला पडणार ! (उघड) पद्मे, हा तुझा दुर्दैवी पिता शांतिदुर्ग आहे बरं. (तिला सोडतो, दोघे उठून उभे राहतात.)

प०--बाबा, तुह्मी इतके कठोर हृदयाचे असाल, असं मला वाटलं नव्हतं.

शांति०--पद्मे, जातीनें मी किती कोमल अंतःकरणाचा आहें, हें तुला ठाऊक नाहीं का ? पण काय करूं ! राजाज्ञा मला कठोरहृदयी बनवीत आहे.

प०--काय ? राजानें मला मारण्याची आज्ञा दिली, नी ती तुह्मांला ! त्या मेल्याचं काय मी केलं आहे ?

शांति०--त्या दिवशीं तूं पाहिलेलें कृत्य आज तुला यमसदनास घेऊन जात आहे. (रडूं लागतो.)

प०--(त्याचा हात धरून) असं काय करतां बाबा !

शांति०–(तिचा हात सोडवून गहिंवरानें) बाळे ये, शेवटलें एकदां मला प्रेमालिंगन दे. (तो बाहू पसरतो. उभयतां कडकडून भेटतात. नंतर–)

प०–बाबा, आतां मला वांचण्याची आशा नाहीं ना ?

शांति०–थोडिशी आहे. पण–

प०–ती कोणती बरं !

शांति०–बाळे, त्या आशेंत कांहींच अर्थ नाहीं. तें नीच काम मी तुला सांगू नये, व तूंहि तें ऐकूं नयेस.

प०–(मनांत) बहुतकरून माझ्या पातिव्रत्त्यावरच घाला असावा. (उघड) काय आहे तें सांगा तरी एकदां ?

शांति०–छे. छे. तें मी तुला अमंगल काम सांगून आपली वाणी भ्रष्ट करीत नाहीं. आतां तुला ऐकण्याचीच इच्छा असेल तर कांलिंदीला कां नेली होती, हें लक्षांत आण ह्मणजे झालें.

प०–पापाचरण करून नरकवासाचं साधन करण्यापेक्षां मृत्यु काय वाईट ? पण बाबा, तुमच्या हातांत असलें तर पतिचरणाचें एकवार दर्शन करवा; ह्मणजे माझी आशा नष्ट होईल.

शांति०–वेडे पोरी, तुझा प्रियपति सुद्धां घटका दोन घटकेनीं यमाच्या दरबारीं जाणार आहे. आतां कसली आशा करतेस ? तुझ्या मागोमागच मीही तुझ्या भेटीला येतों.

प०–तर मग बाबा, विलंब करूं नका. प्राणनाथाच्या भेटीला मला अगोदर पाठवा. (खालीं मान करून) हं. आटपा.

शांति०–शाबास पद्मिनी, तूं माझ्या पोटीं जन्म घेऊन आपलें नांव या जगांत चिरस्मरणीय केलेंस. पण बाळे, हा अघोर पातकी तुझा बाप बालहत्त्येच्या पातकाचा बोजा शिरावर घेऊन स्वर्गलोकीं येणार आहे बरें.

प०–स्वर्गी धर्म आहे. मी तिथं अगोदर गेलें ह्मणजे तुमच्या विषयीं यमधर्माची प्रार्थना करीन. चला आटपा. मग आतां उशीर कां करतां ?

शांति०–बाळे, तुझ्या या कोमल तनूवर या तीव्र शस्त्राचा घाव टाकण्याला माझ्या करांत सामर्थ्य नाहीं. पद्मे, तुला मी लहानाची मोठी केली, आंगाखांद्यावर खेळविली, अनेक प्रकारचे तुझे लाड पुरविले, तें अशा करितां कां ग! मला पुत्र संतान नसल्यामुळें तूंच माझ्या वृद्धपणाची आधारयष्टी; ती आधारयष्टी आपल्या हातानें कशी बरी छेदून टाकवेल ? “ विषवृक्षोऽपि संवर्ध्य स्वयंछेत्तुं न आर्हति.” मग तूं तर माझा जीव प्राण, निरपराधी, दीन, तुझ्यावर शस्त्र कसें धरवेल ?

प०–बाबा, तुह्मी यावेळेस मागलं सर्व विसरा. आणखी पुढल्या स्थितीकडं लक्ष देऊन हातीं घेतलेलं कार्य वाटेस लावा. आतां तुह्मी जर उगीच शोकाकुल होऊन वेळ दवडाल तर न जाणो, मला एखाद्या पातक्याचा स्पर्श होऊन सर्व जागचे जागीं राहील, नी मला भयंकर यातना भोगाव्या लागतील.

शांति०–खरी गोष्ट पद्मे, आतां तूं एकाग्र चित्तानें पतिमूर्तीचें ध्यान कर. (पद्मिनी नेत्र मिटून खालीं मान घालून बसते, व शांतिदुर्ग तरवार उपसून) हें निष्ठुर शस्त्रदेवते, रणांगणांत शत्रुकंठाचें रक्तपान करण्याचें विसरून आज या

हतभागी कोमल कन्येचें रक्तपान करण्याची तुला इच्छा झाली आहे. तें प्राशन करून तरी तूं तृप्त हो. (असें ह्मणून घाव घालण्या करितां तरवारीचा हात वर कारतो, इतक्यांत चतुरसिंह पाठीमागून येऊन त्याचा तरवारीचा हात आपल्या एका हातानें बळकट धरून दुसऱ्या हातानें त्याला गच्च धरतो. इकडे त्याचा हेर पद्मिनीस उचलून घेऊन जातो. नंतर चतुरसिंह शांतिदुर्गाच्या हातांतील तरवार हिसकावून घेऊन त्याला धक्का देऊन पळून जातो. व शांतिदुर्ग धडपडत उठून त्याच्या मागोमाग जातो, इतक्यांत कुमारसिंह दुसऱ्या बाजूनें घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करतो.)

कुमार०–तरी मला बाहेर पडतांनाच वाटलें होतें, कीं आज कांहींतरी आपल्यावर भयंकर प्रसंग गुजरणार ? ह्मणून मार्गानें फार सावधगिरीनें चाललों होतों इतक्यांत त्या मांगांनीं मला मोठ्या अडचणीच्या जागेंत घेरलें. पण माझ्या या विजयी भवानीनें त्यावेळीं मला यश दिलें, नाहीं तर या जगाला मी आज मुकलों होतों. राजानीं माझ्याशीं बोलतांना पुष्कळ साखर पेरून मला मोठेपणा दिला व मीही त्या वेळीं मोठ्या हिंमतीनें प्रतिज्ञा करून निघालों, परंतु लोकांत वाढलेला माझा मान त्याला खपत नसावेंसें दिसतें. त्यानींच तर माझ्यावर हे लोक पाठविले नसतील ना ? कारण गांवांतील कोणाही शूर पुरुषाची माझ्या आंगावर एकाएकीं चाल करून येण्याची ताकद नाहीं. राजा जर माझ्या विरुद्ध असेल तर मात्र आपल्याला भयंकर प्रसंगासीं टक्कर देणाची वेळ येणार आहे खास. (थांबून) पण छे. ज्यानीं मला लहानाचें मोठें केलें, मला मोठ्या योग्यतेची जागा देऊन जगांत ज्यांनीं माझा मान वाढविला, व ज्याचा माझा कांहीं संबंध नसतां ज्यांनीं

माझ्या दोन हातांचे चार हात केलें. त्याचें मन माझ्या विषयीं इतकें कलुषित होईल, ही मुळींच असंभवनीय गोष्ट; पित्यानें पुत्राचा घात केला, असें कधीं तरी होईल कां ? माझ्या मनांत उगीच वेडी कल्पना आली आहे. आजपर्यंत महाराजांशीं मी कधीं बेइमानानें वागलों नाहीं. उलट अतिशय कळकळीनें राज्यांत सुधारणा करून, प्रजेस सुखावह होऊन राजाचा जेणें करून संतोष होईल, अशाच गोष्टी मी केल्या. मग तो कां बरें माझ्यावर शस्त्र उचलील ! कदाचित् असें मात्र असेल कीं, माझी मानहानि व्हावी, किंवा माझी हिंमत खचावी, अथवा माझ्या कीर्तीला कलंक लागावा, अशा हेतूनें राजाच्या चांडाळचौकडीपैकीं कोणी तरी हें दुष्ट कृत्य केलें असावें ! काय असेल तें असो. पण माझ्या पश्चात् माझ्या प्रियतमेची तर कांहीं कठीण अवस्था झाली नाहीं ना ? मला संशय येतो. एकदां आंत जाऊन तरी पहावें. (असें ह्मणून आंत जाऊन परत आल्यावर) निःसंशय घात झाला. (किंचित् स्तब्ध राहून खिन्न मुद्रेनें) त्या दुष्टांचेंच हें कृत्य. प्रिये, आतां तुला कोठें पाहूं ? मी बाहेर निघण्यापूर्वींच तूं भीतीनें मला जाण्यास प्रतिबंध करीत होतीस. तेव्हां मी तुझें ऐकलें नाहीं व हट्टानें तसाच निघून गेलों. त्याचाच परिणाम हा झाला काय ? कां तुला पूर्वींच स्वप्न पडलें होतें, म्हणून तूं माझी केविलवाण्या शब्दांनें विनवण्या करीत होतीस ? काय झालें असेल तें ईश्वरास ठाऊक ! (रागानें) अरे मांगानों, यत्किंचित् तरी तुमचा मला सुगावा लागूं द्या, कीं महाराजांच्या समक्ष तुह्माला यमद्वार दाखवितों. इतकें कशाला ? स्वतःच महाराजांना जाऊन मी ही हकीगत सांगतों, ह्मणजे झालें. (जातांना बाजूस पाहिल्यासारखें करून थांबतो) पण हें दीपप्रकाशांत कोण बरें

इकडे येत असावें ? (लक्षपूर्वक पाहून) मला वाटतें राजाचे खानगी कारभारी बखत्सिंगच आहेत. (शिपाई हातांत मशाल घेऊन पुढें चालला आहे व त्याच्या मागें बखत्सिंग, असे प्रवेश करतात.) कायहो बखत्सिंग, इतक्यारात्रीं तुह्मी मजकडेसच काय ह्मणून आलांत ?

बखत्०–महाराजांची आज्ञा झाली ह्मणून.

कुमार०–मी येथें आहे, हें महाराजांना कसें समजलें ?

बखत्०–तें मला सांगतां येणार नाहीं. पण त्यांनीं आपण असाल तसें आपल्यास घेऊन यावयास सांगितलें आहे खरें.

कुमार०–एवढ्या रात्रीं जरूरीचें काम तरी काय आहे ?

बखत्०–आपल्या नगरांतील धनाढ्य सावकार सोमदत्त एक लहान मुलाचें प्रेत आपल्याबरोबर घेऊन आला आहे. तेव्हां त्याच्या चौकशीकरितां कदाचित् महाराजानीं बोलाविलें असेल, असें मला वाटतें.

कुमार०–(मनांत) मला तिकडे बंडखोरावर पाठविलें, तेव्हां यावेळीं मी येथें असण्याचा संभव नसतां ज्याअर्थीं बोलावणें आलें आहे, त्या अर्थीं यांत कांहींतरी कपट आहे. पण याचा उलगडा मी तेथें गेल्याशिवाय होणार नाहीं. (उघड) चला मी येतों.

(दोघेही जातात.)

प्रवेश पांचवा.

स्थळ—राजमार्ग.

पात्रें—क्रूरसिंह, देवलनाथ, व गुलाबसिंग,

(क्रूरसिंह व देवलनाथ बोलत येतात.)

क्रूर०—बरें पण मी ह्मणतों, आपण दहा बारा इसम असून आपल्यापैकीं एकाच्या तरी तो हातीं सांपडावा कीं नाहीं ?

देवल०—अहो शूर तो शूर. सिंहाच्या छाव्याला दहा बारा हत्ती सुद्धां बकऱ्याप्रमाणेंच वाटणार ! एवढ्या काळोखांतसुद्धां त्याची तरवार मेघाच्छादित विद्युलतेप्रमाणें कशी चमकत होती, पाहिलीत ना ?

क्रूर०—त्या वेळीं आपले तर डोळे दिपून गेले बोवा ! तो लौकर हातीं सांपडावा ह्मणून त्याच्या घोड्याच्या पायावर असा एक वार केला कीं तें मटदिशीं खालीं बसलें.

देवल०—तुह्मी एवढी हात चलाखी केली, ह्मणून तो निसटून जायचा राहिला कां ?

क्रूर०—नुसताच गेला नाहीं. जातां जातां त्यानीं पांचसात इसम जमीनीवर लोळविले.

देवल०—आपल्या बायकांचें कुंकूं बळकट ह्मणून त्यावेळीं आपले प्राण वांचले. आतां त्यांत कोण कोण मेले, आणि कोण कोण जखमी झाले हें सूर्योदयाशिवाय कळण्याला मार्ग नाहीं. पण आपल्यापैकीं जे इसम परत गेले आहेत, त्यांतील कोणी तरी ही हकीकत महाराजास सांगतीलच. (इतक्यांत गुलाबसिंग कन्हत कुन्थत " अग आई. आतां काय करूं ! "

असें ह्मणत पडत झडत येतो. त्याचा शब्द ऐकून) अरे गुलाव, असें काय करतोस ?

गुलाब०–अरे देवा, मेलोंरे मेलों. (पडतो.)

क्रूर०–(त्याला धरून) अरे गुलाब गुलाब, (देवलास) देवल, अरे याला वारा घाल रे! (देवल वारा घालतो. हा फार घाबरा झाला आहे. बरें कां! (त्याच्या तोंडाजवळ तोंड नेऊन) गुलाब, सावध हो. असा अगदीं धीर काय सोडतोस ?

गुलाब०–(पाय दाबून) ओय, ओय, ओय! अरे येथें मोठी जखम लागली आहे. (पुन्हा पडतो त्यास सांवरीत.)

क्रूर०–असा घाबरा होऊं नकोस. देवल देवल, त्याला वारा घाल, मी त्याची जखम बांधतों. (तसें करूं लागतांच)

देवल०–नकोरे नको. अग आई. फार दाबूं नकोसरे!

क्रूर०–(त्याचा पाय दाबीत) थोडी कळ सोस, त्यांतून रक्त निघून गेलें ह्मणजे अंमळ तुला बरें वाटेल.

गुलाब०–(इकडे तिकडे कोलमाड्या खात) अरे, मेलों! मेलों! (पडतो, त्याचा प्राण जातो.)

क्रूर०–देवल त्याला नीट धर.

देवल०–नीट काय धर. त्यानें राम ह्मटला.

क्रूर०–(त्याचा पाय सोडून) काय मेला! (सोडून देऊन) अरेरे!! फार वाईट झालें! आपला एक चांगला साथीदार गेला. बेस्याला कोठें पाठवा, आपली तयारी आहेच.

देवल०–चला आतां. बेवारा करून टाकला पाहिजे.

क्रूर०–तसें तर केलेंच पाहिजे. येथें रस्त्यांत टाकून देऊन उपयोग नाहीं. (असें ह्मणून दोघेजण त्याला घेऊन जातात.)

प्रवेश सहावा.

स्थळ-राजमहाल.

पात्रें-राजा, सोमदत्त, विश्वसेन, कुमारसिंह व बखतसिंग.

(राजा व सोमदत्त बसले असून विश्वसेन उभा आहे.)

राजा-सोमदत्त, तो आतां येईल बरें. तो आल्याबरोबर कसा रडण्याचा हुंदका काढतां, कीं त्याला हें सर्व खरेंच आहे असें वाटलें पाहिजे.

सोम०-त्याची महाराजांना काळजी नको. मी बरोबर वठवून देतों.

राजा-विश्वसेन, त्या पोराला मोकळें करून चांगलीं श्रीमंती थाटाचीं वस्त्रें प्रावरणें, दागदागिने वगैरे घालून व्यवस्थेनं ठेव. मी बहुतकरून त्याला बाहेर आणण्याची वेळ येऊं देणार नाहीं. पण न जाणो. त्याचा चोरून आणलेला खंजीर रक्तमिश्रित करून ठेवला आहे ना?

विश्व०-मी सर्व तयारी करून ठेविली आहे सरकार.

राजा०-पण कायरे विश्वसेन, क्रूरसिंह इतके लोक बरोबर घेऊन गेला असतां, तो कोणाच्याच हातीं लागला नाहीं?

विश्व०-हातीं लागला नाहीं इतकेंच नव्हे, पण त्यांनीं दहा पांच लोक मारले, असें त्यांच्या बरोबर गेलेला यदुनाथ परत आला तो सांगत होता.

राजा-(कानोसा घेतल्यासारखें करून) विश्वसेन, कोणी येत आहे वाटतें. पहा बरें.

विश्व०--(तो आंत जाऊन परत आल्यावर) होय, तेच आहेत.

राजा--(मोठ्यानें) सोमदत्तजी, तुह्मी कुमारसिंहाचें नांव घेतां हें मला बरोबर दिसत नाहीं. तुमचा त्याचा कांहीं वाद आहे कां ? (इतक्यांत कुमारसिंह व बखत्‌सिंग येतात.) काय कुमारसिंह ! हें तूं, काय केलेंस ?

सोम०--(उकसा बुकसी रडतो.)

कुमार०--महाराज, आपण हें काय ह्मणतां ? मी असें निंद्य कर्म करीन असें आपल्याला वाटतें काय ?

सोम०--(रडत) महाराज, काय करूं हो ! माझें सोन्यासारखें लेंकरूं यानींच मारलें ! मी आतां कोणाच्या जिवावर दिवस काढूं ? सर्वस्वी माझा आधार गेला.

कुमार०--(रागानें) काय सोमदत्तजी, तुह्मांला वेडतर नाहीं लागलें ? नीट शुद्धीवर या, आणि तुह्मी कोणाचें नांव घेतां याचा विचार करा. तुह्मांला भूल पडली असेल, किंवा तुह्मांला कोणी भलतेंच सांगितलें असेल ? विनाकारण भलत्याचें नांव घेऊन फसूं नका. तुह्मांला कोणी माझेंच नांव घ्यावयास सांगितलें असेल तर त्याचें नांव सांगा, ह्मणजे मी त्याला माझ्या या विजयी भवानीनें मुक्ति देतों. नाहींतर असत्यवाणी उच्चारणाराला नामशेष करतों. (त्याच्या आंगावर धांवून जाऊन तरवारीचा हात वर करतो.) बोला. (सोमदत्त ओरडतो.)

राजा--(उठल्यासारखें दाखवून) हं हं. हें काय कुमारसिंह ? (बखत्‌सिंगास त्याच्या हातांतील तरवार घेण्याची खूण करतो. त्याप्रमाणें तो तरवार काढून घेतो.)

सोम॰–अहो महाराज, याला खून चढला आहे, खून.

कुमार॰–काय करूं रे ! यावेळेस मी निःशस्त्र झालों. नाहींतर तुला—

राजा–अरे कुमारसिंह, असा रागावतोस काय ह्मणून ? तो काय ह्मणतो हें ऐकून तर घे.

कुमार॰–(सोमदत्तास लाथ मारून) त्याचें काय ऐकायचें आहे; तो ह्मणतोच आहे, मी मारलें ह्मणून. पण महाराज, आपली याला फूस असल्याशिवाय हा इतका धीट झाला नाहीं. नाहींतर असें अभद्र बोलण्याची याची काय माय व्याली आहे !

सोम॰–पाहिलेंत महाराज, कसा शिरजोरपणा आहे हा ! " चोर तो चोर आणि बादशहाहून थोर. "

कुमार॰–याला कांहीं तुमच्या जवळ पुरावा आहे ? कां आपली " उचलली जीभ लावली टाळयाला. "

राजा–असा शांतपणानें त्याच्याशीं बोल ह्मणजे तो आपली हकीकत सांगेल.

सोम॰–अरे निर्दया, तूंच मारलेंस, तूंच. मांगा तरवारीनें त्याचा गळा कापून आपला खंजीर त्याच्या उरांत भोंसकलास ? देवा, काय करूं रे ? (रडतो.)

कुमार॰–काय माझा खंजीर ? कोठें आहे, दाखवा बरें पाहूं ?

राजा॰–विश्वसेन, तो खंजीर आण बरें पाहूं ?

विश्वसेन–आज्ञा सरकार.

कुमार॰–तें प्रेतही इकडे आणण्याची आज्ञा व्हावी. तें तरी मला एकदां पाहिलें पाहिजे.

राजा–तूं येण्यापूर्वी तें येथेंच पडलें होतें. पण त्यापासून मला फार त्रास होऊं लागला, ह्मणून तें मी दूर नेऊन ठेवविलें. विश्वसेन, जा तीं दोन्हीं घेऊन ये. (विश्वसेन आंत जाऊन खंजीर व प्रेत घेऊन येतो, प्रेत खालीं ठेवून खंजीर राजाच्या हातांत देतो. कुमारसिंह प्रेत पाहत असतां–)

कुमार॰–आश्चर्य आहे !

राजा–कुमारसिंह, याच्या मुठीवर तुझें नांव दिसत आहे.

कुमार॰–काय ? माझें नांव !

राजा–हें पहा, मी खोटें ह्मणत असलों तर. (खंजीर त्याच्या हातांत देतो.)

कुमार॰–(खंजीर खालीं वर पाहून) महाराज, आत्तां माझ्या लक्षांत आलें. बरेच दिवसांपूर्वी हा खंजीर चोरीस गेला होता, तो आज सांपडला.

सोम॰–कशी बतावणी करतो आहे पहा. (रडत) यांनींच माझ्या बाळाचा घात केला हो !

राजा–पण हा तुझाच आहे ना ?

कुमार॰–माझा आहे, हें मी कबूल करतो. पण मी कांहीं हें दुष्ट कृत्य केलें नाहीं.

राजा॰–तूं केलें नसशील, आणि करणारही नाहींस, अशी माझी खात्री आहे. परंतु या कृत्याचा खंजीर हा बळकट पुरावा आहे, तेव्हां मला सोमदत्त शेटजीचें ह्मणणें खोटें ह्मणतां येत नाहीं.

कुमार॰–काय महाराज, आपण याचें ऐकून माझ्यावर अपराध लागू करतां ?

राजा–हा अपराध तूंच केला आहेस असें माझें ह्मणणें

नाहीं. परंतु हा खंजीर तुझ्यावर अपराध लादूं पहात आहे. ाशिवाय मला दुसरा असा संशय येतो, कीं तुला मी एका जोखमीच्या कामावर पाठविलें असून तिकडे तूं कां गेला नाहींस !

कुमार०–याचें कारण वेगळें आहे. मी गेलेला परत कां आलों, हें कळविण्याकरितां इकडे येणार तोंच आपले खानगी दिवाण मला बोलावूं आले.

राजा–तें कांहीं असो. त्याचा विचार न्याय करतेवेळीं करण्यांत येईल. पण तोंपर्यंत तुला अटकेंत राहिलें पाहिजे. बखत्‌सिंग, याला तूर्त राजकैदी समजून कारागृहांत ठेवा.

कुमार०–महाराज, हा अन्याय होत आहे बरें.

राजा–मला सुद्धां तसेंच वाटतें, पण न्यायापुढें माझा कांहीं इलाज नाहीं. विश्वसेन, बखत्‌सिंग पहातां काय ? चला याला घेऊन जा. (ते दोघे दोहीकडून कुमारसिंहास धरतात.)

कुमार०–महाराज तुमची न्यायदृष्टी अंध झाली काय ?

राजा–तूं भिऊं नकोस. तुझा न्याय दरबारांत सर्वानुमतेंच होईल. (विश्वसेन व बखत्‌सिंग त्यास घेऊन जातात. राजा व सोमदत्त उठूं लागतात, तोंच पडदा पडतो.)

द्वितियांक समाप्त.

तृतियांक.

प्रवेश पहिला.

स्थळ–कांचीपूर, राजमार्ग.

पात्रें–चित्रसेन, विचित्रवीर्य व द्युमत्सेन,

(चित्रसेन व विचित्रवीर्य बोलत येतात.)

चित्र०–काय मग. तुह्माला कसें वाटतें ?

विचित्र०–वाटायचें काय ? जें तुह्मांला तेंच आह्मांला. आज कुमारसिंहावर प्रसंग आला, उद्यां आपल्यावर येणार नाहीं कशावरून ?

चित्र०–मी तरी तेंच ह्मणतों. अहो, जेथें अनीति राज्य करूं लागली, प्रामाणिकपणा बहिष्कृत झाला, अधर्माचें स्तोम माजून राहिलें, त्या ठिकाणीं वास्तव्य काय कामाचें ! लोकांचीं मनें तरी याच कारणाकरितां महाराजांविषयीं कलुषित झालीं आहेत. त्यांच्या दर्शनाविषयीं अनुत्साह, ते दृष्टीस पडल्या बरोबर कपाळास आंठ्या, सहानुभूतिच्या ठिकाणीं तिरस्कार, इतकी स्थिति एका दोन दिवसांत पालटली. यांतही दुसरें एक बीज आहेच. अहो, ज्यानें आपल्या उत्कृष्ट उदार कृत्यांनीं प्रजाजनांचा आयुष्यक्रम सुखावह करून दिला, अशा त्या कुमारसिंहास एकाएकीं उचलून अन्यायानें प्रतिबंधांत ठेवलें. आजकाल सर्व कांचीपूर नगर नुसतें हालून गेलें आहे. लोकांना त्याशिवाय दुसरा विषयच नांहीं सारखा झाला. जिकडे पहावें तिकडे घरोघर याच गोष्टी.

विचित्र०–अर्थात्; कां बरें नाहीं असणार ? ज्यानें आज आपल्या शुद्ध वर्तनानें, कृतीनें, पुत्रवात्सल्य मनांत बाळगून प्रजेवर राजापेक्षांही जास्त प्रेम ठेवलें; त्याविषयीं आश्चर्य-कारक घडलेल्या गोष्टीचा लोकांना विस्मय कां वाटूं नये ! प्रजापालनाविषयीं कुमारसिंहाचें जसें पूर्ण लक्ष असून तो प्रजे-च्या हिताबद्दल जितका दक्ष होता तितकाच किंबहुना त्यांही-पेक्षां जास्त प्रजापक्षही त्याचे ठिकाणीं विपक्ष न होतां, राजा-समक्ष आपल्या वक्षस्थळांतील त्याच्या संबंधाची विलक्षण भक्ति निःसंशय व्यक्त करील, हें ध्यानांत ठेवा.

चित्र०–यांत काय संशय ? प्रजेच्या प्रेमजलप्रवाहाला हा मध्येंच प्रतिबंध आल्यामुळें जरी त्याची गति कांहीं वेळ निरुद्ध झाल्यासारखी दिसली, तरी तो एके जागीं सांचून मग मात्र त्याचा लोट अनावर होईल खरा. (पडद्याचे बाजूस पाहून) पण हें कोण येत असावें बरें ?

विचित्र०–(तिकडे पाहिल्यासारखें करून) आपल्या इथलें दिसत नाहींत. पण अशीं मंद मंद पावलें टाकीत स्वछंद्रपणानें मनाशींच विचार करीत येत असावेतसें दिसतें. नाहीं बरें ?

चित्र०–त्यांच्या उदास वृत्तीवरून ते कांहीं तरी संकटांत आहेत, असें वाटतें. विचारून तरी पाहूं ! (द्युमत्सेन साव-काश पावलें टाकीत व मनाशीं विचार करीत येत आहे, त्याच्याजवळ जाऊन) काय महाराज, आपण कोठें असतां ? या सुवर्णपुरींत आपण आज नवीन आला वाटतें ?

द्युम०–(एकदम चपापल्यासारखें करून) हो. या सुवर्ण-पुरींत आल्याला मला दोनचार दिवस झाले.

विचित्र०–आमच्या या सुवर्णमय कांचनपुरीस तुह्मी कुवर्ण-पुरी ह्मणतां. तेव्हां तुह्मांला भ्रम तर नाहींना झाला ?

द्युम०–भ्रम ? तर मग तुमच्या सुवर्णपुरीचें सुवर्णच अवर्णनीय खरें. जगांतील सुवर्ण आपल्या सुवर्णानें लोकांचे नेत्र दिपवितें. व तुमच्या सुवर्णपुरींतील सुवर्ण आपल्या कुवर्णानें अथवा आपल्या कज्जलप्रभेनें त्यास कायमचेंच धृतराष्ट्र बनवितें, एवढाच फरक.

चित्र०–(विचित्रवीर्याच्या कानाशीं लागून) राजाच्या दुष्ट कृतीची कांहीं तरी छाया या गृहस्थाच्या आंगावर पडली असावी ! ह्मणून हा असें बोलत आहे.

विचित्र०–(हळूच) विचारा तर खरें.

चित्र०–(द्युमत्सेनास) कायहो महाराज, तुह्मी ह्मणतां कीं, येथें आल्याला दोनचार दिवस झाले ह्मणून. मग इतक्यांतच तुह्मांला आमच्या सुवर्णपुरीचा कुवर्ण काय दिसला ?

द्युम०–अहो, त्याचें किती ह्मणून प्रकार सांगूं ? पण नको, तुह्मांला सांगून काय उपयोग ?

चित्र०–नका सांगूं. आमचा कांहीं त्या विषयीं आग्रह नाहीं. पण आमच्या कानावरच असलें तर कांहीं तरी विचार करण्यास बरें पडेल.

द्युम०–(मनांत) काय ? राजगुह्याचा स्फोट करून राजाची कृष्णकृति जगास दाखवूं ? छे. अबला असून जिनें आजपर्यंत तें आपल्या हृदयांत ठेवलें, त्याचा एकदम स्फोट करून मी आत्तांच आपल्या पदरीं मूर्खपणा घेऊं काय ? नाहीं ; कारणपरत्वेंच तें बाहेर काढलें पाहिजे. (उघड) तुह्माला सांगायला कांहीं हरकत आहे असें नाहीं, परंतु तुह्मी कोण, मी

कोण, कशास कांहीं संबंध ? कुमारसिंहाला प्रतिबंधांत ठेव-ल्यापासून लोकांचें दुटप्पी वर्तन माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें. तेव्हां खरा कोण ? खोटा कोण ? प्रामाणिक कोण ? व लुच्चा कोण ? याचा अजमास कसा करावा ! या सहवासाच्या गोष्टी आहेत.

विचित्र०–तुह्मी ह्मणतां तें बरोबर आहे. पण सहवास केल्याशिवाय तो होईल कसा. (चित्रसेनास हळूच) ज्या-बद्दल आपला विचार चालला होता, त्याचपैकीं यांचा बोल-ण्याचा कांहीं भाग असावा. (मोठ्यानें) चित्रसेन, त्यांना आपल्या घरीं नेऊं, आणि मग त्यांची हकीगत ऐकून घेऊन त्या प्रमाणें विचार करूं ! दुसरें, आपल्या इतर मित्रमंडळीस बोला-वून त्यांच्या संमतीनें राजाच्या अप्रतिबंध जुलमास कांहीं तरी आळा घालण्याचा प्रयत्न झाल्यास पाहूं ! या आपल्या सत्कृत्यास प्रजेची अनुकूलता मिळण्यास फारसे प्रयास पडणार नाहींत.

चित्र०–लोकमताचा अंदाज मी काढतों.

विचित्र०–ठीक आहे. (द्युमत्सेनास) महाराज, तुह्मी आमच्या घरीं येतां कां ? ह्मणजे तुमची राहण्याची चांगलीच व्यवस्था राहील, व विचार करण्यासही ठीक पडेल.

द्युम०–आपलें ह्मणणें मला मान्य आहे.

विचित्र०–चला तर मग.

(असें ह्मणून सर्व जातात.)

प्रवेश दुसरा.

स्थळ—कारागृह.

पात्रें—कुमारसिंह, चमेली.

कुमारसिंह०—(मनाशीं) हाय ! हाय ! काय मी संकटांत सांपडलों ! कारागृहांत पडलों ह्मणून मला फारसें वाईट वाटतें, असें नाहीं. पण मी अन्याय केला नसतां मला निरर्थक प्रतिबंधांत पडावें लागलें, याचा मात्र खेद होतो. न्यायी पुरुष तर मला कधींही दूषण देणार नाहींत. पण खरी गोष्ट बाहेर येईल तेव्हां! माझा उत्कर्ष व मजवर असलेली लोकप्रीति, याचा कोणातरी दुष्टाला विषाद वाटून त्यांनीं हें कृत्य केलें असावें ! सोमदत्ताचा मुलगा मारण्याचा कांहीं संबंध आहे कां ? पण सर्व प्रकार बरोबर जुळून असा हा घात झाला. जुळून ह्मणण्यापेक्षां जुळवून ह्मणणेंच अधिक शोभेल. कारण कांहीं कालापूर्वीं माझा नाहींसा झालेला खंजीर ज्यापेक्षां तेथें दृष्टीस पडला, त्यापेक्षां पूर्वींपासूनच याची योजना चालली असावी ! असें आतां माझ्या ध्यानांत येतें. महाराज सुद्धां या वेळीं कसें निष्ठुर झालें पहा ! दुष्ट लोकांनीं बनावट सांगितलेल्या गोष्टीवर त्यांचा भरंवसा तरी कसा बसला ! जगामध्यें खऱ्याचें खोटें व खोट्याचें खरें कसें होतें, याचा हा प्रत्यक्ष दाखला आहे. एखाद्या कार्याला निघालें असतां त्याला जर कोणी मोडा घातला तर आपले लोक अपशकून समजतात, त्याचें हें दुसरें उदाहरण. प्रियसखीनें त्यावेळीं बाहेर न जाण्याविषयीं हट्ट घेतला, पण मी तो ऐकला नाहीं. आणि अशी कांहीं चमत्कारिक वेळ आली कीं, त्या सुंदरीचा शोध करण्याला पुरता वेळ सुद्धां मिळाला नाहीं. काय तिची

स्थिति झाली असेल व ती कोठें असेल ? या स्थलीं तिची मला कोणी बातमी सांगेल काय ? किती दिवस या कारागृहाच्या एकांतवासांत काढावे लागणार आहेत, तें एक परमेश्वर जाणें. हे भक्तवत्सला करुणानिधे, सन्मार्गानें वर्तन करणारा प्राणी खलछलाच्या चरकांत सांपडून त्यास विनाकारण देहदंड प्राप्त व्हावा; असाच तुझ्या दरबारीं न्याय आहे काय ! किंवा तूं तटस्थ वृत्ती धारण केलीस, अथवा आमच्या विषयीं तुझ्या अंत:करणांत दयेचा लेशही राहिला नाहीं ! जन्मापासून पारतंत्र्यांत दिवस काढले, व आत्तांशी कोठें स्वातंत्र्यसुखाचा अनुभव घेत होतों. पण तें सुद्धां तुला खपलें नाहींना ? प्रभो, या जगांत माझी ह्मणून कोणी मनुष्यें आहेत काय ? माझे मातापिता कोण ? मला कोणी बंधुभगिनी आहेत का नाहींत ? बरें, असल्यास त्यांची काय स्थिति झाली आहे ? आज ते जीवमान असून भूपृष्ठभागावर कोठें तरी वास करीत आहेत किंवा गतप्राण झाले आहेत, याची कांहीं सुद्धां मला माहिती नसावी ! हरहर ! ! ! व्यर्थ माझें जीवित्व ! (स्तब्ध रहातो. इतक्यांत चमेली काखेंत एक गांठोडें व हातांत अन्नांनीं भरलेलें ताट असें घेऊन प्रवेश करते.)

चमेली०-(कुमारसिंहाजवळ जातांना तोंडावर बुरखा घेऊन ताट त्याच्यापुढें ठेवते. नंतर उघड) हें महाराजांनीं अन्न पाठविलं आहे. आतां रोजच्यापेक्षां माझ्याकडून आज जरा उशीर झाला खरा. पण—

कुमार०—पण काय ? पुढें तूं जें बोलणार आहेस तें मी जाणून आहें. जा, तुझ्या धन्याला जाऊन सांग कीं, मीं हें अन्न खात नाहीं. ज्या दिवशीं माझा न्याय होईल, त्या

दिवशीं मी अन्न ग्रहण करीन. मी या कारागृहवासांत पडल्यापासून प्रति दिवशीं ताट परत करीत असतां पुन्हा पुन्हा लोचटासारखें पाठवितो कशाला ? मराळ कितीही क्षुधार्त असला अथवा त्याला कितीही संकटें आलीं, तरी तो बिसतंतूवांचून अन्य पदार्थ कधींही भक्षण करणार नाहीं. समजलीस ? अन्न हें परब्रम्ह आहे म्हणून त्याला मी वंदन करतों. जा. तें ताट घेऊन चालती हो येथून.

चमेली०–(मनांत) अहाहा ! पिंजऱ्यांत ठेवलेला सिंहाचा बच्चा खाण्यावांचून कितीही रोड झाला तरी निःसत्व, निर्जीव अन्न कधींही खाणार नाहीं. (उघड) महाराज विनाकारण मजवर रुष्ट होऊन काय उपयोग ?

कुमार०–प्रत्येक दिवशीं पहावें तों दासी वेगळी. नित्य किती वटवट करावी. मला बोवा याचा कंटाळा आला. माझ्यासमोरून जातेस कीं नाहीं ? चालती हो.

चमेली०–जाते. पण थोडंसं तरी खायचं होतं महाराजांनीं. मी हें असेंच घेऊन गेलें तर मला मार खावा लागेल म्हणून म्हणतें.

कुमार०–तूं तरी आपल्या धन्यासारखीच लोचट दिसतेस. जात नाहींस कां ? दम धर. (उठून) तुझा धनी तुला मार देण्यापूर्वीं मीच येथें तुला बक्षीस देतों. (असें म्हणून तिला मारीत असतां " चल जा. चालती हो " असें म्हणून धक्के देतो.)

चमेली०–पण महाराज–

कुमार०–(त्रासानें) ह्मणतेस तरी काय ? जातेस कीं नाहीं ? (तिच्या आंगावर धांवून जातो. पुन्हां उभा राहून मनांत) मला

वाटतें हिला आज पक्की शिकवून पाठविली आहे. (उघड) हें पहा, तें अन्न मी सेवन करावें अशी जरी तुझी पूर्ण इच्छा असली, किंवा महाराजांनीं तुला तसें करण्याविषयीं बजावलें असलें तरी त्यास मी साफ शिवणार नाहीं, समजलीस ? जा आतां. (ती जात नाहीं असें पाहून) कायग ए दांडगे, तुला बक्षीस पाहिजे वाटतें. (तिच्या आंगावर धांवून जातो. ती तोंडावरील बुरखा मागें सारून)

चमेली–महाराज, आपण मला ओळखलं नाहींत कां ? आपल्या चरणाची नित्य सेवा करणारी ही दासी चमेली आहे.

कुमार०–(चकित होऊन) काय तूं चमेली ! मग तूं विनाकारण माझ्या हातचा मार कां खाल्लास ? कायग, तुझी मुक्तता कशी झाली ?

चमेली–तें मी पुढं केव्हां तरी सांगेन. पण मी बाहेर आल्यावर सहजगती मला आपल्या स्थितीची खबर लागली. ह्मणून मी युक्तीनं इथं आलें. (गांठोडें त्याच्यापुढें ठेवून) हा पोषाख आपण आंगावर घाला नी लौकर बाहेर पडा.

कुमार०–चमेली, मी वेष पालटून गुप्त रूपानें येथून बाहेर पडूं ? ह्मणजे मी अपराध करून तो छपविण्याकरतांच पळून गेलों, असें यांत होणार नाहीं काय ?

चमेली–तसं लोकांना वाटेल कदाचित् ; पण महाराज, वारा येईल तशी पाठ दिली पाहिजे.

कुमार०–छे छे, तुझी ही युक्ती मी कधींही पसंत करणार नाहीं. ज्या योगानें माझ्या आजपर्यंतच्या कृत्यांस काळिमा

लागेल, असें कृत्य करून लोकापवादास जागा राहूं देणें मला प्रशस्त दिसत नाहीं. न्यायानें जी गोष्ट होईल ती होईल.

चमेली—महाराज, आजपर्यंतच्या आपल्या वर्तनक्रमावरून आपण हें घाणेरडं कृत्य केलं, असं जग तर कधीं ह्मणणार नाहीं. मग आपल्यालाच इतकं वाईट कां वाटतं ! यावेळीं आपण माझं ह्मणणं कबूल कराच.

कुमार०—तूं सांगतेस, तसें माझेंही मन मला साक्ष देत आहे; परंतु नको.

चमेली—इथं बसून आपल्याला न्याय मिळणार नाहीं. आपण बाहेर पडला तरच त्याची आशा आहे.

कुमार०—[मनांत] हिचें ह्मणणें विचार करण्यासारखें आहे खरें.

चमेली—विचार करण्यांत वेळ घालविण्याचा हा समय नव्हे. कारण मला इथं येऊन पुष्कळ वेळ झाला. पहारेकरी बाहेर उगीच ओरड करील एखादी.

कुमार०—तुझ्या ह्मणण्यास मी कबूल होतों. परंतु दरवाज्यावरील पहारा मला कसा चुकवितां येईल ?

चमेली—हो. बरी आठवण झाली. याला मागच्या बाजूला एक लहानशी खिडकी आहे, त्यांतून बाहेर पडलं ह्मणजे नदी किनाऱ्याजवळ मनुष्य निघतं, असं मी बाबांच्या तोंडून ऐकलं होतं. त्या मार्गानं आपण चालतं व्हावं. नी मी आल्यारस्त्यानं जातें.

कुमार०—तर मग या पोषाखाचें कांहीं कारण नाहीं. हा तूं घेऊन जा.

चमेली—बरं तर जाऊं मी आतां ?

कुमार०—जा. (ती गांठोडें व ताट घेऊन जाते.) ती खिडकी पाहण्याकरितां आपल्याला थोडासा तरी वेळ दवडावा लागेलच. मग उशीर कां करावा ? (मागल्या बाजूनें जातो.)

प्रवेश तिसरा.

स्थळ—जंगल, रस्ता.

पात्रें—शांतिदुर्ग व द्युमत्सेन.

शांतिदुर्ग—(प्रवेश करून) मला वाटलें होतें कीं, वृद्धपणीं आत्महत्त्या करून घेऊन आपण आपला अवतार संपवावा. परंतु नाहीं. या शरिराला दुःख भोगायचें अद्याप शिल्लक राहिलें आहे; तेव्हां तसा योग कसा जुळून येईल बरें ! आतां आपण या शहरांत किती दिवस छपून राहणार ? ज्याची कधीं संवय नाहीं, तें अंमळ जड जातें खरें. परमेश्वरा, या देहाला आतां कष्ट सोसत नाहींतरे ! लौकर एकदां या अभागी प्राण्याला तूं आपल्या पायांजवळ घेऊन जा, ह्मणजे या दुःख भोगांतून तरी सुटेन. सगळा जन्म सौख्यांत गेला, आणि आतां ज्या वयांत हरीहरी ह्मणत स्वस्थ बसायचें, त्या वयांत हा वनवास कपाळीं आला. तेव्हां या कर्माला काय ह्मणावें ? जगांत माझें सर्व सौख्य काय तें जामात आणि कन्या; पण त्यांपैकीं जामातांनीं कारागृहवास पतकरला, व कन्येला अचानक कोणी एका विचित्र प्राण्यानें उचलून नेलें. ह्मणजे या दोघांचाही या जगांतील अवतार संपला ह्मणावयाचा.

(किंचित् विचार केल्यासारखें करून) मला वाटतें, ज्यानें कालिंदीचें हरण केलें, त्यानेंच कदाचित माझ्या प्रिय कन्येचें केलें नसेल कशावरून ? पण यांचा त्याचा संबंध काय ? कोणी या उभयतांच्या कळकळीचा मनुष्य जगांत आहे, असें माझ्या तर आजपर्यंत ऐकिवांत नाहीं. मग हें कसें घडलें ? कदाचित राजाची अनीति, दुष्क्रिया व प्रजेवरील भयंकर जुलूम, यांच्या प्रतिकारार्थ परमेश्वरानें एखादी विभूति तर उत्पन्न केली नसेलना ? अथवा आगींतून निघून फुफाट्यांत पडण्याची तर वेळ त्यांस आली नसेलना ? जर त्यांच्या एकाद्या ममतेच्या माणसानें त्यांस संकटांतून मुक्त करण्याकरितां नेलें, असें ह्मणावें तर मग ते इतके दिवस होते कोठें ? व आजपर्यंत गुप्त कां राहिलें ? याचा तपास लागतो कसा ? (विचार करीत उभा रहातो.)

शुभ०–(प्रवेश करून) इतका वेळ याच्या ऐकलेल्या संदिग्ध भाषणावरून याला माझ्या प्रियसखीबद्दल कांहीं तरी हकीकत माहीत असली पाहिजे. शिवाय हा आपल्या सारखाच दुःखी प्राणी दिसतो; असें असलें तर हल्लीं गांवांत राजाविरुद्ध चालू असलेल्या कटांत याला सामील करून घेतां येईल. (त्याच्या जवळ जाऊन) नमस्कार आजोबा.

शांति०–(चपापून) कोणरे तूं ? या जवळच्या नगरांतच असतोस वाटतें ?

शुभ०–नाहीं. या ठिकाणचा मी रहाणारा नाहीं. मी नंदिग्रामास असतों.

शांति०-(मनांत) हा कालिंदीचा भ्रतार तर नाहीं ? बिचारा बायको करितां शोध करीत फिरत असेल ! (उघड) तुझें

नांव काय ? या नगरांत कोणत्या उद्देशानें आलास ? सांगशील कां तूं आपली सर्व हकीकत ?

द्युम०–आपल्यासारख्या वयोवृद्ध पुरुषापाशीं सांगायला काय हरकत आहे ?

शांति०–सांग तर मग.

द्युम०–माझी प्रिय पत्नी या कांचीपूरच्या राजानें मी घरांत नसतांना चोरून आणली आहे, असा मला शोध लागला, ह्मणून मी येथें आलों. आपल्याला जर कांहीं माहिती असेल तर सांगा.

शांति०–(मनांत) निःसंशय. तोच तोच. आपली कांहीं सर्व हकीकत याला सांगत बसूं नये. नाहीं तर मी या कृत्यांत होतों, हें जर याला समजलें तर न जाणों, सध्यांच पायांत खोडा पडायचा. (उघड) आहे. मला तिची थोडीशी माहिती आहे.

द्युम०–मग सांगाल तर माझ्यावर मोठे उपकार होतील. मलाही किंचित् माहिती लागली आहे.

शांति०–ती कोणती बरें ?

द्युम०–राजानें ती वश व्हावी ह्मणून तिला गुप्त ठिकाणीं ठेवलें, तिला अतिशय छळिलें, तरी ती त्याची गोष्ट मान्य करीना. शेवटीं तिच्या लहान अर्भकास तिच्या समक्ष ठार मारण्याचा त्यानें प्रयत्न केला, येथपर्यंत समजलें. परंतु पुढें तिची काय स्थिति झाली, हें मात्र कांहीं कळलें नाहीं.

शांति०–(किंचित हंसल्यासारखें करून) वाः, मग तर तुला पुष्कळच बातमी लागली. पण तुला हें कोणत्या द्वारानें समजलें ?

द्युम०—मी प्रथम ज्या दिवशीं कांचीपुरांत आलों, तेव्हां मार्गांत मला एक वेडा भेटला. त्यांनीं कांहीं सुगावा सांगित-ल्यावरून त्या धोरणावर मी राजवाड्याच्या मागल्या बाजूस खणून भुयारासारखी जमिनींतून जाण्यास वाट केली, तों एकदम भोंक पडलें. त्या मार्गानें मी एका तळघरांत उतरलों. त्या ठिकाणीं पहातों तों माझी इष्ट वस्तु नसून दोन दासी मात्र सांपडल्या. त्यांना घेऊन मी वरती आलों. त्यांनीं मला ही हकीकत सांगितली.

शांति०—वाः, हें एक मोठेंच कार्य केलेंस. त्या भयंकर रात्रीच त्यांना तेथें नेऊन ठेविलें होतें. पुढें राजसेवक कालिंदीच्या मुलीला मारणार तोंच तेथें दोन पुरुष उत्पन्न होऊन त्यांनीं त्या कोमल बालकाला व कालिंदीला उचलून नेलें. तसेंच पुढें कांहीं दिवसांनीं माझी कन्या व मी बोलत असतां तिलाही नेलें. त्या दुःखानेंच तर मी हा अरण्यवास पतकरला !

द्युम०—काय ? तुमची मुलगीही नाहींशी झाली ? मोठेंच आश्चर्य आहे ! तर मग तुह्मी आह्मी सारखेच दुःखी आहोंत. त्यांत फरक इतकाच कीं, तुह्मी कन्यावियोगानें दुःखी आहां, आणि आह्मीं कुटुंबविरहानें व्याकूळ आहों ! आतां माझी गोष्ट तुह्मी ऐकाल कां ? प्रयत्न करून पाहूं. हितावह झाली तर ठीकच आहे. नाहीं तर त्यांत आपलें कांहीं नुकसान नाहीं.

शांति०—कोणती सांग बरें ?

द्युम०—कुमारसिंह प्रतिबंधांत पडल्यापासून लोकांचीं मनें अतिशय क्षुब्ध झालीं आहेत. जागोजाग लहान लहान मंडळ्या स्थापन होत असून थोडक्याच दिवसांत त्यांची एक

मोठी सभा भरणार आहे. आपण त्यांत जाऊन मिसळूं. जर पक्ष जोरावला तर त्यांत आपलें पुष्कळ हित होणार आहे. पहा बोवा तुमच्या विचारास गोष्ट आली तर.

शांति०–मी त्या मंडळींत येईन, पण दिवसा मला शहरांत कोणाच्या नजरेस पडतां कामा नये! कारण मी राजाश्रित असल्यामुळें राजपक्षाचे लोक मला तेव्हांच धरून नेतील. याला कांहीं युक्ती आहे कां तुझ्याजवळ?

द्युम०–विचित्रवीर्याच्या संमतीनें त्याचाही विचार करतां येईल.

शांति०–ठीक आहे. तूं आतां जा, व मीही आपल्या ठिकाणीं जातो. तूं सांगशील त्याठिकाणीं प्रहररात्रीच्या सुमारास येईन.

द्युम०–तुह्मी या नगरांतलेच राहणारे असाल तर विचित्र-वीर्याचें जलमंदिर तुह्मांला ठाऊक असलेंच पाहिजे.

शांति०–वेड्या, माझा सारा जन्म या नगरांत गेला. मग तें स्थल कां मला ठाऊक नसणार? सांगितल्यावेळीं मी तेथें ठेवलें ह्मणून समज.

द्युम०–झालें तर; त्या जलमंदिरांत या ह्मणजे सर्व विचार होईल. मी तेथेंच आहे.

शांति०–बरें आहे. जातों तर मी आतां.

द्युम०–जा. मीही जातों.

(असें ह्मणून दोघे दोन बाजूनें जातात.)

प्रवेश चवथा.

स्थळ–नदी, किनारा.

पात्रें–कालिंदी, कुमारसिंह, चतुरसिंह,

एक मुलगा व शिपाई.

(कालिंदी नदीकिनाऱ्यावर एक्यास्थलीं बसली आहे.)

कालिंदी–(स्वगत) किती मी दुर्दैवी ! देवा, सुख आह्मांला पारखंच झालं काय ? तुझ्या घरीं न्याय आहे, असं साधुजन ह्मणतात, व योगिराजही वारंवार मला असाच बोध करीत होते. त्यांच्या बोधप्रद वाणीवर विश्वास ठेवून समाधानानें कांहीं काळ कंठीत असतां, पद्मिनीचीही पण अकस्मात तिथंच गांठ पडली. तेव्हां आह्मी एकीला दोघी झाल्यामुळं बराच काळ आनंदांत जाऊं लागला, व पुढील आशेचा अंकुरही उत्पन्न होऊन केवळ मनोराज्यांतच दिवस न काढतां जगांतील सुखाचे बरेचसे वांटेकरी होऊं, या प्रमाणं विचारतरंग वारंवार मनांत येऊन, मन आंदोलना प्रमाणं हेलकावे खावूं लागलं. सत्समागमाच्या योगानं कांहींतरी पुण्याचरण करावं या हेतूनं एके दिवशीं पद्मिनीला विचारून प्रातःस्नानाला ह्मणून गंगेवर आलें; पण पाण्याची माहिती नसल्यामुळें नदींत उतरतें तोंच एकदम खोल पाण्यांत जाऊन गटंकळ्या खात खात वहात आज कडेला लागलें. पण आतां पुढं काय करावं ? जावं तरी कुणीकडं ? (थांबून पड्याच्या बाजूस पहाते.) समोर गांव दिसत आहे खरा. पण तिकडे जाईन ह्मटलं तर मुलगी योगीराजांच्या आश्रमांत राहिली; परत जाईन ह्मटलं तर रस्त्याची माहिती नाहीं.

देवा, ही माझी संकटपरंपरा संपणार तरी कधीं ? बाळे सौदामिनी, तूं आतां कायग करशील ? सारा दिवस रडून पद्मिनीस व गुरुमहाराजांस अगदीं नकोसं करून सोडशील ना? तें तुला खायला प्यायला देतील. पण बाळे, तुझे गुण आठवून मोहानं व्याप्त झालेलं हें माझं अंतःकरण मला तटतटां तोडीत आहेग ? तुझे बोबडे बोल माझ्या कानाला फिरून सुख देतील कां ? (इतक्यांत नदीच्या पात्रांतून नौका, दोन मनुष्यांसह " शिपाई व मुलगा " येत आहे, असें पाहून) ती नौका या कडेला येत आहे, तेव्हां आतां इथं बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. (उठून उभी राहते.) न जाणो, आणखी एखादं संकट आपोआप येऊन आंगावर पडायचं. आश्रमांत जाण्याला रस्ता सांपडला तर पहावा. किंवा एखाद्या गांवाचा तरी आश्रय करावा. (असें ह्मणून जाते, तोंच दुसऱ्या बाजूनें चतुरसिंह व वर्णन केल्याप्रमाणें नौका येते.)

चतुर०—(नदीकडे पाहून) या नौकेंतून कोण चाललें असावें बरें ? कुमारसिंहास कारागृहवासांतून मुक्त करण्याकरितां निघून चाललों होतों, आणि आतां जलप्रवाहांत उडी टाकणार, तोंच ही नौका दृष्टीस पडली. ही या तीराला येत आहे, तेव्हां आंत कोण आहे, हें पाहून नंतर पुढें जावें अशी साहजिक उत्कंठा उत्पन्न झाल्यामुळें या जाग्यावरचें पाऊल हालत नाहींसें झालें. (शिपाई मुलासह किनाऱ्यावर येतो.)

शिपा०—(चतुरसिंहाजवळ येऊन) कायहो महाराज, तुह्माला कांचीपुरास जावयाचें आहे वाटतें ? अनायासेंच नाव या कडेला आली आहे. हात मारतां येत असल्यास, त्या कडेला जा पाहिजे तर घेऊन.

चतु०—तेवढ्याकरतांच तर उभा राहिलों आहें. पण नौकेवर वल्हवणारे नावाडी नसतां तूं स्वत:च ती वल्हवून या लहान मुलास घेऊन कोठें चालला आहेस ? मला तर कांहीं हा तुझ्या जातीचा दिसत नाहीं.

शिपा०—मला आतां तुमच्याशीं बोलावयाला वेळ नाहीं, नाहींतर याची चमत्कारीक हकीकत तुम्हांला सांगितली असती. (असें ह्मणून गडबडीनें जाऊं लागतो.)

चतुर०—(त्यास धरून) काय आहे ती सांग अगोदर ? सांगितल्याशिवाय तुला मी जाऊं देणार नाहीं. (तरवार उपसून) हें पाहिलंस कां काय आहे तें ?

शिपा०—तुमच्या जवळ तें आहे तर माझ्या जवळ हें आहे. (कमरेचा खंजीर काढून दाखवितो.) पाहिलेंत ?

चतु०—पाहिलें, पाहिलें. (त्याचा खंजीर हिसकावून घेतों.) आतां बोल काय तें. नाहीं तर याच्याच फटकाऱ्यानें शीर धडापासून वेगळें करीन.

शिपा०—(मनांत) याला जर मी सांगितलें नाहीं, तर कांहीं हा मला जिवंत सोडणार नाहीं. बरें, याशीं लढूं ह्मटलें तर एक शस्त्र होतें तेंही जवळ राहिलें नाहीं, शिवाय आपल्या आंगांत सामर्थ्य नाहीं हें वेगळेंच. सांगितलें तर आपले प्राणतरी वांचतील. हा परका मनुष्य दिसतो, तेव्हां असलेली गुप्त गोष्ट बाहेर फुटून आपल्याला अपाय होण्याची कांहीं भीति नाहीं. (उघड) मी सांगतों, पण मला या मुलासह लौकर जाऊं द्याल ना ?

चतु०—अगदीं लौकर. तुझा खोळंबा करण्यांत मला

काय फायदा आहे ? बोल झटकन् आणि हो चालता. हं. आटप लौकर.

शिपा०–हें पहा, आमच्या या कांचीपूर नगरचे बडे व्यापारी व धनाढ्य सावकार शेट सोमदत्त ह्मणून आहेत. त्यांचा हा मुलगा.

चतु०–असें काय ? एवढ्या श्रीमान व्यापाऱ्याच्या मुलाला तूं एकटा गुपचिप चोरासारखा घेऊन चाललास, याचें काय कारण ?

शिपा०–सांगतों ऐका. आमच्या महाराजांनीं आणि सोमदत्तशेटनीं खलबत करून कुमारसिंहावर या मुलाचा खून केल्याचा अपराध लागू करावा आणि त्याला सुळीं द्यावा, या हेतूनें माझ्या धन्याकडून खोटीच फिर्याद घेऊन, लागलीच कुमारसिंहास पकडून आणून त्यास कैदेंत ठेवलें. कोणाची तक्रार राहूं नये ह्मणून सर्व लोकांसमक्ष त्याचा न्याय करून मग त्याला सुळीं द्यावा, असा महाराजांचा बेत होता; पण तो सर्व बेत फसला.

चतु०–कशानें बरें ?

शिपा०–कुमारसिंह कैदेंतून पळून गेल्याची शहरांत दाट वदंता पसरली आहे.

चतु०–काय ह्मणतोस ? कुमारसिंह पळून गेला. ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. (मनांत) हें काम कोणी केलें असावें बरें ? (उघड) बरें मग पुढें काय झालें ?

शिपा०–तेव्हां आमच्या शेटजीचें धाबें दणाणलें. मी त्यांचा विश्वासूक चाकर असल्यामुळें त्यांनीं मला जवळ बोलावून चंद्रगिरीस या मुलास पावतें करावयास सांगितलें. तेथें याची

मावशी आहे. ह्मणून याला मी घेऊन जातों.

चतु०—ठीक आहे. आतां तूं आपल्या कुलदेवतेचें स्मरण कर. या वेळेस तुला मुक्ति देणेंच मला भाग पडत आहे. चल आटप. मरण्यास तयार हो.

शिपा०—(घाबरून त्रोटक शद्बानें) का-का-का-कारण! मा-माझा काय अपराध?

चतु०—तें कांहीं नाहीं, तुला मेलेंच पाहिजे. (पडद्याकडे पाहून) तो पहा, तुझा काका समोरून येत आहे. चल आटप. (थांबून) तूं थोडाच सुखानें मरण्यास तयार होणार आहेस ? (असें ह्मणून त्याला घाव मारून मुलास घेऊन पळून जातो. तो ओरडत, ओरडत, कन्हत तडफडून प्राण सोडतो. इतक्यांत दुसऱ्या बाजूनें कुमारसिंह नदींतून पोहत आल्याप्रमाणें प्रवेश करतो.)

कुमार०—परतीरावरून मी हें सर्व कृत्य पाहिलें. हा काय प्रकार असावा ? या मनुष्याला मारून त्या मुलांला तो मनुष्य घेऊन गेला. याचा अर्थ काय ? (प्रेताकडे लक्षपूर्वक पाहून) अरे, हा तर आमच्या नगरांतील नगरशेट सोमदत्ताचा शिपाई, राम्या ! पण याच्या बरोबर जो मुलगा होता तो कोणाचा ? (विचार केल्यासारखें करून) सोमदत्त शेटजीनें माझ्यावर जो खुनाचा आरोप केला आहे, तो छपविण्याकरितां त्यानें आपल्या मुलास या मनुष्याबरोबर बाहेरगांवीं तर पाठवून दिलें नसेल ना ? (थांबून) कदाचित् तसेंही असेल! पण या आपल्या समजाला पुरावा काय ? तसें असेल तर याच्या जवळ चिठ्ठी चपाटी कांहीं तरी मिळाली पाहिजे. (त्याला तपासून त्याच्या खिशांतून एक पत्र काढतो.) सांपडलें तर खरें कांहीं. मग त्यांत काय लिहिलें आहे कोण जाणें ! (पत्र उकलून वाचूं लागतो.)

रा. रा. चंद्रशेखरजी, मु० चंद्रनगर यांसः–

"सोमदत्त पद्माक्ष याचा प्रणिपात. मी सध्यां मोठ्या पेंचांत सांपडलों आहे. येथील सिंधुराज महाराजांच्या नादीं लागून एका सत्वस्थ, पापभीरु व सज्जन, अशा पुरुषावर मी खुनाचा आरोप केला आहे. येथें अत्यंत लोकप्रिय झालेला कुमारसिंह याच्या प्रताप व सौजन्यामुळें राजाचें तेज कमी होत चाललें, ह्मणून हा वाट घातला होता; परंतु तो कारागृहांतून सुटून गेल्या-मुळें माझ्या तोंडचें अगदीं पाणी पळालें, काळजानें ठाव-सोडला. ह्मणून चिरं० मणिभद्र यांस आपल्याकडे पाठविला आहे. त्याचा नीट सांभाळ करावा. व पोंचल्याचें उत्तर यावें. कळावें हे विनंती. मु. कांचीपूर." आपला,

सोमदत्त.

(पत्राची घडी करीत) पहा, दैव अनुकूल झालें ह्मणजे सर्व गोष्टी कशा जुळून येतात त्या. त्याच संधीला चंभेली मुक्त व्हावी आणि तिनें मलाही मुक्त करावें ! केवढें आश्चर्य आहे ! आग्रह धरून तिचें जर मी त्या वेळीं ऐकलें नसतें तर मला आज हा पुरावा खचित मिळाला नसता ! नगरशेट सोमद-त्ताच्या या पत्रावरून राजाच माझ्या विरुद्ध आहे, हें स्पष्ट होतें. पण ज्यांनीं आपल्या हातानें एखाद्या तरूची मोठ्या कळकळीनें जोपासना करावी व तो भरांत येऊन त्यास फळें येऊं लागतांच त्यांनींच त्याचें छेदन करावें ! हा मात्र कल्प-नेच्या बाहेरील हलकटपणा किंवा अविचारीपणा आहे. परंतु राजाच्या मनांत मजविषयीं विरोध कां उत्पन्न झाला असावा, नकळे. मी त्यांचा कधीं उपमर्द केला नाहीं, किंवा त्यांना दूषण येईल असें कृत्यही केलें नाहीं; पण दिवसेंदिवस

चंद्रकलेप्रमाणें वृद्धिंगत होत चाललेली मजवरील लोकप्रीतीच माझ्या घातास कारणीभूत झाली असावी. राजाला ती सहन न होऊन त्यांनींच मला जगांतून नाहींसें करण्याचा घाट घातला यांत संशय नाहीं. आपल्याला पुरावा तर चांगला मिळाला आहे. पण तो आतां जगापुढें मांडून आपण दोष-मुक्त कसें व्हावें ! याचा मात्र मोठा विचार आहे. मंत्री विजयसेन एकेदिवशीं माझ्यापाशीं राजाविरुद्ध कांहीं गोष्टी सांगत होता; पण त्यावेळीं त्या मला खऱ्या वाटल्या नाहींत. मी त्याचा तिरस्कार केला. आतां त्याचा सल्ला घ्यायला नगरांत जावें तरी चांगलें नाहीं. कारण कदाचित राजास माझी बातमी कळली तर मला प्रतिबंधांत ठेवील. तेव्हां तें कांहीं उपयोगी नाहीं. (थांबून) हो. असाच विचार केला पाहिजे. मी सध्यां निष्काळजी झालें आहे. पण माझी प्रियसखी कोठें व कोणत्या स्थितींत असेल. तेव्हां तिला अशीच दुःखांत ठेवून आपण या नादीं लागावें, हें उचित नाहीं. तिचा शोध करून सुरक्षित स्थलीं तिची योजना करावी आणि मग आपण या उद्योगाला लागावें.

(जातो.)

प्रवेश पांचवा.

स्थळ—राजमार्ग.

पात्रें-चतुरसिंह, कमला, चमेली, मदन (हेर) व क्रूरसिंह.

चतुर— (प्रवेश करून) राजवाड्यांत प्रवेश करून अगदीं बिकट प्रसंगांतून कालिंदीला सोडविली आणि गुरुजींच्या स्वाधीन करून ठेविली. पण तिच्या नशिबीं आणखी दुःखाचे फेरे घ्यावयाचे आहेत कीं काय, नकळे. तिला पुन्हा राजसेवकांनीं नेली,

किंवा स्नानास गेली तेथें जलप्रवाहांत पडून कोठें वाहून गेली, हें कळण्याला कांहींच साधन नाहीं. कुमारसिंहाला सोडवून आणण्याच्या हेतूनें बाहेर पडलों तों तोही माझ्या प्रयत्नाच्या अगोदरच सुटून गेला. मग त्याला कोणी सोडवून नेलें अथवा तोच निसटून गेला, हेंही कळत नाहीं. ज्याच्या बद्दल खुनाचा आरोप केला तो मुलगा मात्र हातीं लागला आहे, ही चांगली गोष्ट झाली. आतां त्याची मात्र गांठ पडली पाहिजे. म्हणजे आपलें कारस्थान सुरळीत चालेल. कुमारसिंहावर लोकांचें अवर्णनीय प्रेम बसलें आहे असें ऐकतों. हें जर खरें असेल, तर लोक राजाविरुद्ध असलेच पाहिजेत. त्याचा वारकाईनें नगरांत जाऊन तपास करावा, म्हणजे आपल्या हेतूला जर पुष्टिकरण मिळण्यासारखें असलें तर हां हां म्हणतां त्या दुष्टांनीं कुमारसिंहाकरतां जें जाळें पसरून ठेवलें आहे, त्यांतच त्याला अडकवून टाकतां येईल.

(इतक्यांत कमला येते, हा बाजूस होतो,)

कमला–चमेलीची वाट पाहून थकलें. मला म्हणाली मी आत्तां जाऊन येतें म्हणून, त्याला आज दोन दिवस झाले. लोकाच्या घरीं तुकडे मोडीत किती दिवस तरी रहावं! चांगली मी सुखांत सुग्रास खात होतें, पण तें दैवाला नाहींना आवडलं! त्या वेळीं मी त्या मेल्या चमेलीचं ऐकून तिकडं गेलें नसतें तर मला आज लोकांचीं आर्जवें कां करावीं लागलीं असतीं. कदाचित् आत्तां मी राणी साहेबाकडं गेलें असतें तर त्या कांहीं मला नको म्हणणार नाहींत. पण तो मेला मांग माझा जीव घेईलना! आतां करूं तरी काय? आणि जाऊं तरी कुठं? या नगरांत तर कांहीं कुणाच्या घरीं राहून आपला निभाव लागणार नाहीं. (थांबून) चमेली पद्मिनी बाईसाहेबाकडं

तर गेली नसेलना? बहुत करून तिकडं गेली असावी. आपण तिच्याकडं गेलं तर काय हरकत आहे. (किंचित् विचार करून) हो. तिकडंच जावं. ह्मणजे झालं, (जाऊं लागते, इतक्यांत चतुरसिंह पुढें होतो त्यास पाहून) अग बाई, हा कोण? (भ्यायल्यासारखी करते.)

चतुर०–मुली, भिऊं नकोस. तुला जिकडे जावयाचें आहे, तिकडेच मलाही जावयाचें आहे. पण तूं कोणाची कोण? अशी घाबरलीस कां? तें तर सांगशील!

कमला–मी एक गरीबाची मुलगी आहे. कुठं तरी आश्रय मिळावा ह्मणून जातें.

चतुर०–छे, तूं हें खोटें बोलतेस. राणीसाहेबांच्या जवळ तुला कांहीं दिवस पाहिलेंसें वाटतें. कदाचित् तेथें कांहीं मूर्खपणा करून येथून निघून जात असल्यास न कळे. पण तुझी इच्छा असली तर मी तुला राणीसाहेबाकडे पावती करतों चल. (असें ह्मणून तिचा हात धरतो.)

कमला–(घाबरून रडत रडत) सोडा मला सोडा, (हात सोडविण्याचा प्रयत्न करते)

चतुर०–मी तुला धरून ठेवीत नाहीं. पण तुला राणी साहेबाकडे यायचें आहेना?

कमला–नाहीं यायचं. सोडा मला.

चतुर०–मग तुला कोणीकडे जावयाचें आहे तें तरी सांग.

कमला–मला पद्मिनी बाईसाहेबाकडं जायचं आहे.

चतुर०–पद्मिनी बाईसाहेब कोण?

कमला–कुमारसिंह महाराजांची बायको. (इतक्यांत त्याचा हेर चमेलीस घेऊन येतो, त्यास पाहून)

चतुर०–काय मदन, ही कोण ? (दोघी एकमेकीकडे पाहून साशंक होतात.)

मदन–मी कुमारसिंहाच्या बंगल्यापाशीं टेहळणी करीत होतो. इतक्यांत मला रुदनस्वर ऐकूं आला, ह्मणून मी त्यांच्या बागेंत गेलों. तों तेथें ही रडत बसली होती.

चतुर०–(कमलेचा हात सोडून चमेलीस) कायग, तुझें नांव काय ?

चमेली०–माझं नांव चमेली.

चतुर०–नांव तर खूप सुरेख आहे बुवा. (कमलेस) तुझें नांव काय ग ?

कमला०–माझं नांव कमला.

चतुर०–अरे वा. दोघींचींही नांवें मोठी मजेदार आहेत. (चमेलीस) बरें मग तूं कुमारसिंहाच्या बागेंत बसून कां रडत होतीस ?

चमेली–महाराज, आपण चांगले थोर गृहस्थ दिसतां; आमची गरीब दासींची हकीकत ऐकून घ्याल तर आमची तुह्मांला दया येईल.

चतुर०–सांगशील तर खरी.

चमेली–कुमारसिंह महाराजांच्या पत्नी पद्मिनीबाईसाहेब यांची मी दासी आहे. एके दिवशीं मी आपल्या बाईसाहेबांच्या बरोबर राजवाड्यांत गेलें होतें. त्या दिवशीं आह्मी दोघी तिथंच राहिलों. रात्रीं राणी साहेब, मी, माझ्या

बाईसाहेब व राणीसाहेबांची दासी कमला, अशा चौघीजणी एका दिवाणखान्यांतच निजलों होतों. पुष्कळवेळ गोष्टी सांगतां सांगतां राणीसाहेबांस निद्रा लागली. व आह्मी तिघीजणी जाग्याच होतों. तों एकाएकीं मोठ्यानें रडण्याचा सूर आह्मीं ऐकला, ह्मणून आह्मीं तिघीजणी त्या आवाजाच्या कानोशावर गेलों. आह्मी जिथें उभ्या राहिलों होतों, तिथें दोनचार भोंकें होतीं. त्यांतून आह्मी पहात असतां एक मोठा भयंकर प्रकार आमच्या दृष्टीस पडला.

चतुर॰–तो कोणता बरं ?

चमेली–महाराज तें विचारूं नका. त्याचं स्मरण झालं ह्मणजे अद्याप आंगावर कांटा उभा रहातो. (इकडे तिकडे पाहूं लागते.)

चतुर॰–हं भिऊं नकोस. येथें दुसरें कोणी नाहीं. आणि कदाचित जरी कोणी आलें तरी त्याचा समाचार घेण्यास आमच्या या तरवारी तयार आहेत. हं सांग पुढें.

चमेली–आह्मीं तरी त्या दिवशीं इतक्या जाग्या राहिलों नसतों, पण त्या दिवशीं या कमलेनं मला कांहीं हकीकत सांगितली होती, ती मी लागलीच आपल्या बाईसाहेबांना कळविली. तेव्हां त्या घाबरून आह्मांला झोंप येऊं देईनात.

चतुर॰–(उत्कंठेनें) अशी चिंता उत्पन्न करणारी कोणती बरं हकीकत होती ?

चमेली–महाराजांना कालिंदी बाईसाहेबांनीं इथं गुप्त रुपानं आणून ठेवल्या आहेत, व महाराज आतांशी त्यांच्या नादीं आहेत. असं हिनं सांगितलं. कालिंदी बाईसाहेबांचा व माझ्या बाईसाहेबांचा एकमेकींवर पुष्कळ जीव होता, ह्मणून त्या घाबरून

जाऊन केव्हां सूर्योदय होतो, नी केव्हां ही हकीकत आपण कुमारसिंह महाराजाजवळ सांगू, असं त्यांना झालं होतं. कारण कुमारसिंह महाराज कालिंदी बाईसाहेबांस भगिनी प्रमाणं मानीत असून त्या उभयतांचं एकमेकावरील प्रेमही अप्रतिम होतं. तेव्हां ते त्यांना मुक्त करतील ही आशा त्यांना वाटली.

चतुर०--बरें मग पुढें काय झालें ?

चमेली-आह्मी त्या झरोक्यांतून पाहूं लागलों तो माझ्या बाईसाहेबांचे वडील शांतिदुर्ग व एक राजसेवक यांस महाराज, त्यांच्या मुलीला मारण्यास दरडावून सांगत होते व ते कां कूं करीत होते. तें दुष्ट कृत्य पाहून आमचे तिघींचे हातपाय लटलट कांपूं लागले, कंठ अगदीं दाटून आला, व डोळे पाण्यानं भरून आले. पद्मिनी बाईसाहेबांना तर इतका कांहीं गहिंवर आला, कीं तो त्यांस न आवरतां एकदम रडेंच कोसळलें ! त्यांच्या रडण्याचा हुंदका राजाच्या कानावर गेला कीं काय झालें कुणास ठाऊक ? त्यांनीं तें कृत्य तसेंच ठेवून आमच्या तपासास बाबांना पाठविलें. त्या वेळीं त्यांनीं आपल्या मुलीला सोडून आम्हां दोघींना नेऊन महाराजापुढं उभं केलं.

चतुर०-(रागानें दांत ओंठ चावून मनांत) अरे मांगा निर्दया, त्यावेळेस तूं माझ्या हातून सुटलासरे ! नाहीं तर तुझे राई राई एवढे तुकडे केले असते. (उघड) मग पुढें तुमचें काय झालें ?

चमेली-दुसरा सेवक जो तिथं होता, त्याच्या कडून आम्हांला एका अंधार कोठडींत नेऊन ठेवलं. त्यांत दुःखांत सुख येवढंच होतं कीं, आम्ही दोघी एक्या ठिकाणीं होतों.

चतुर०–मग तुम्ही तेथून सुटलां कशा ?

चमेली–एके दिवशीं आम्ही दोघी जणीं अशाच गोष्टी बोलत असतां एकदम आम्हांला प्रकाश दिसला. व आंत एक मनुष्य येतोसें वाटलें. तेव्हां आम्ही भिऊन जाऊन एकमेकीला अगदीं गच्च धरून बसलों. तों तो आंत आला, नी मग त्यांनीं आमची मोकळीक केली.

चतुर०–शाबास वीरा ! तो कोण होता बरं ?

चमेली–कालिंदी बाईसाहेबांचे यजमान. त्यांनींच हें बाहेरून भोंक पाडलें होतें, असें त्यांच्या बोलण्यावरून मग समजलें.

चतुर०–(मनांत) बराच त्यांनीं शोध चालविला आहे. तो बहुतकरून त्या बिचारीचा तपास लावील. (उघड) मग त्यावेळीं ते अगदीं निराश झाले असतील नाहीं बरें ?

चमेली–हें काय विचारावं महाराज ! आशाभंगासारखं दुसरं दुःख नाहीं. आणि तशांतून कालिंदीबाईसाहेबांसंबंधानं.

चतुर०–याशिवाय आणखी कांहीं तुला माहिती आहे?

चमेली–आह्मी दोघी बाहेर आल्यावर हिला मी एकेठिकाणीं ठेवली नी अंमळ पुढं झटकलें, तोंच मला माझे धनी कुमारसिंह महाराज बंदांत पडल्याची बातमी लागली. मग मी युक्तीनं कारागृहांत प्रवेश करून आपल्या धन्याचे परोपरीनं आर्जव केले, त्यांच्या हातचा मारही खाल्ला, पण एकदांची त्यांची मुक्तता केली. मग मी त्यांच्या बंगल्यांत गेलें, तों तेथें बाईसाहेब नाहींत. मी पुष्कळ शोध केला पण त्या तिथं नाहींतच तर मला कुठून सांपडणार ?

चतुर–(तिच्या पाठीवरून हात फिरवून) शाबास चमेली, तूं अबला असून मोठ्या धैर्याचें काम केलेंस.

चित्र०–तें काय ह्मणतात, तें ऐकून कां घेतलें नाहीं ? बोला शांतिदुर्ग, कसें तुह्मी निर्दोषी होऊं पहातां ?

शांति०–सरदार या नात्यानें राजाचा मी सेवक तर खरा, मग त्यांनीं कितीही दुर्घट कामगिरी सांगितली तरी ती आह्मांला करणें भाग आहे. परंतु अशी कामगिरी करतांना मनुष्यास प्रसंगीं नीच वृत्तीचें अवलंबन करावें लागल्यास तें तो सुखानें करीत असतो कां ? केवळ नाइलाज ह्मणून करतो. कन्येच्या संबंधानें माझें अंत:करण कळवळलें नाहीं, किंवा तिला सोडून द्यावें असें मनांत आलें नाहीं, असें कसें होईल ? परंतु इकडे जामात कुमारसिंहाला स्वर्गलोकास पाठविण्याची पक्की योजना झालेली मला समजली होती. शिवाय माझी प्रिय-कन्या पद्मिनी हिला वश करून दे, असा राजाचा हूकूम; तेव्हां मी स्वत: आपल्या कन्येला निंद्याचरण करण्यास सांगण्यापेक्षां, स्वर्गलोकीं किंचित् मागून जाणाऱ्या तिच्याच प्रियकर भर्त्याच्या अक्षय्य सहवास सुखाची, तिच्या वधानें तिला जोड करून देऊन, आपणही त्यांच्या मागोमाग त्याच मार्गाचें अवलंबन केल्यास काय वाईट ? अशा शुद्धहेतूनें तें अघोर कृत्य करण्यास मी तयार झालों होतो. यांत माझा कोणता दोष बरें ?

विचित्र०–दोष नव्हे तर काय ! अहो, सरदारीला भुलून अशीं नीच कृत्यें करण्यास तुह्मी तयार झालांत, त्यापक्षीं त्या सरदारीला लाथ मारावयाची होती. गांवांत चार शिष्ट लोक होते, त्यांचा या कामीं सल्ला घ्यावयाचा होता, ह्मणजे कदाचित् येवढा घोरतर प्रसंग टळता, आणि त्या बिचाऱ्या कुमारसिंहावर हें विघ्न आलें नसतें.

शांति०—असो. " यद्भवि तद्भवति " त्यापुढें काय इलाज ? पण मला असें वाटतें कीं, ज्याअर्थी कालिंदी व कुमारसिंह हे दोघेही भयंकर संकटांतून मुक्त झाले, अथवा त्यास कोणी मुक्त केलें, त्या अर्थी त्यांचे कोणी तरी ममतेचें मनुष्य त्यांना साह्य करीत असावें !

द्युम०—असें तर खरेंच. मला जो एक वेडा भेटला होता, त्याच्या त्या चाळ्यावरून व शेवटच्या बोलण्यावरून तोच तो मनुष्य असावा, असें मला वाटतें.

चित्र०—पण तो कोण असावा ! राहतो कोठें ? त्याचा व्यवसाय काय ? शहरांत येतो केव्हां ? हें कळण्याला कांहीं मार्ग आहे कां ?

विचित्र०—त्याचा बारकाईनेंच तपास केला पाहिजे. हें काम आपल्या बहादुरसिंगाकडे द्यावें. तो पक्की बातमी काढील. काय हो चित्रसेन, लोकमताचा अंदाज तुह्मी काढलाच असेल ?

चित्र०—आपल्या कृत्याला सर्व लोक अनुकूल आहेत, पण कुमारसिंहाचा मात्र तपास लागला पाहिजे. कारण तो दोषी आहे किंवा निर्दोषी आहे, याचा निर्णय तो समक्ष असल्या शिवाय आपल्याला करतां येणार नाहीं. लोक असें ह्मणत आहेत कीं, त्याला जर राजा करीत असला तर तुह्मी सांगाल तें काम करण्यास आम्ही तयार आहोंत.

शाम०—सोमदत्ताच्या मुलाचा खून केल्या बद्दल त्याच्यावर आरोप आहे. आतां त्याला कोणी सोडवून नेला असला किंवा तो निसटून गेला असला तरी त्याला बळकट पुरावा मिळाल्याशिवाय तो स्वतः हजर होणार नाहीं, किंवा दुसऱ्याला करतां येणार नाहीं.

विचित्र॰–ही गोष्ट खरी आहे. तरी पण आपणही त्याच्या व त्या खऱ्या अपराध्याच्या चौकशींत असलें पाहिजे. चित्रसेन, शत्रुदमनाला सांगून सोमदत्ताच्या घरची खरी हकीकत काय आहे याचा तपास आणवा.

चित्र॰–मंत्री विजयसेन व सेनापति भीमसिंग यांचीं मनें आज बरेच दिवस राजाविरुद्ध असल्याची मला बातमी आहे. तेव्हां त्यांना आपल्या मसलतींत घ्यावें. म्हणजे राजसेनेंत फितूर करावयास सांपडेल.

विचित्र॰–तसें तर केलेंच पाहिजे. इकडे पुराव्याची बाजू व तिकडे ही बाजू, दोन्हीही जय्यत तयार ठेवल्या तरच आपला हेतू सिद्धीस जाईल. (इतक्यांत एक शिपाई येतो, त्यास पाहून) कायरे शाम्या ?

शिपा॰–बाहेर एक मनुष्य आला आहे, तो आपल्या भेटीची इच्छा करीत आहे.

विचित्र॰–कायरे ? तो मनुष्य कसा काय दिसतो.

शिपा॰–रुपानें बरा आहे. पण पोषाख आपला असाच आहे.

विचित्र॰–कोणीही असो. जा, त्याला पाठवून दे. (तो जातो.) आपल्याला सावधच राहिलें पाहिजे. न जाणो कदाचित् राजाचाही हेर आंत घुसावयाचा.

चतुर॰–(प्रवेश करून) मी सर्वत्रांना प्रणाम करतों. (मुजरे देतात व घेतात.)

विचित्र॰–बसा. (तो बसल्यावर) तुह्मी कोठें असतां ?

चतुर॰–मी या नगरांतलाच, प्रजाजनांपैकीं एक आहें. तुम्ही सर्व मंडळी प्रजाजनाचे कनवाळू आहांत, असें ऐकल्या-

वरून मलाही असल्या कामीं यथाशक्ति हातभार लावतां आला तर पहावा, अशा हेतूनें आपल्या सज्जन मंडळींत प्रवेश केला आहे.

विचित्र–ठीक केलेंत. तुह्मांला कांहीं राजाकडून दुःख पोंचलें आहे काय ?

चतुर०–मला जरी स्वतःला कांहीं त्रास पोंचला नाहीं, तरी सर्वांना जो प्रिय अशा सत्यप्रिय कुमारसिंहावर आलेला आरोप खोटा असून तो आरोप नाहींसा करण्याचा पुरावा मला मिळाला आहे.

विचित्र–खरेंच काय ? (सर्व चतुरसिंहाच्या तोंडाकडे पाहतात.)

चतुर०–होय. ज्या मुलाला मारल्याबद्दलचा त्या बिचाऱ्यावर आरोप आहे, तो मुलगाच प्रत्यक्ष माझ्या ताब्यांत आहे.

सर्व–(सानंद) काय ह्मणता ? परमेश्वरच त्या सत्पुरुषाचा वाली !

चतुर०–परंतु तुह्मी आत्तां दाखवा ह्मणाल तर मात्र मी आत्तांच तुमच्या स्वाधीन करणार नाहीं ! पुराव्याच्या दिवशीं हजर करीन.

विचित्र०–कांहीं हरकत नाहीं. पुरावा जवळ आहेना ? झालें तर मग.

चित्र०–मोठी काळजी निवारण झाली. परमेश्वरानेंच आज आह्मांला साह्य केलें, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

विचित्र०–या शिवाय आणखी कांहीं तुह्मांला माहिती आहे कां ?

चतुर्थांक.

प्रवेश पहिला.

स्थळ—अरण्य, चोरवाट.

पात्रें—चमेली, कमला, पद्मिनी, व योगी.

(चमेली व कमला विश्रांतीकरतां बसल्या आहेत.)

कमला—(घाम पुशीत) कायग मेलं, कितीतरी ऊन लागतं आहे हें ?

चमेली—अग, ऊन नी तहान, कुणीकडून तरी पल्ला गाठायचा. आपल्याला कधीं संवय कां आहे ? पहा बरं, तीं गोवाऱ्याचीं मुलं कशीं फिरताहेत तीं. त्यांना कांहीं ऊन आहे कां कधीं थंडी आहे; तसेंच त्यांचे ते आईबाप, पोटाला चिमटा देऊन रात्रंदिवस काबाडकष्ट करीत असतात. आपल्याला काय ? सावलींत केलीं केलीं न न केलीं अशीं उचल कामं करून बाईसाहेबांच्या मागं मागं फिरायचं. तरी सुद्धां जीव अगदीं दमल्यासारखाच होतो.

कमला०—परमेश्वरानं त्यांचीं शरीरं तशींच काटक केलीं आहेत, ह्मणून त्यांना तें सगळं सोसलं जातं हो. आपलीं शरीरं कोमल, नाजुक, चांगलंसं कुठं जिभेला लागलं तर खायचं, नाहीं तर आपली भिकाऱ्याची धन. त्यांचं खाणंही तसंच आणि शरीरंही तशींच. (बाजूस पाहून) आणखी किती तरी

लांब जायचं आहे कुणास ठाऊक ? त्या मनुष्यांला सोड-ल्याला थोडा कां वेळ झाला !

चमेली–चल, आपण चालूं लागूं ह्मणजे हळूंहळूं मजल गांठेल. (दोघी उठून थोड्या चालतात, इतक्यांत पद्मिनी कमरेवर घागर व खांद्यावर लुगड्याचा ओला पिळा टाकलेला अशी प्रवेश करते, तिला पाहून) अग बाई कमले, पद्मिनी-बाईसाहेबच इकडे येत आहेत वाटतं.

कमला-(पाहून) हो. त्याच ग त्याच.

पद्मिनी–(पुढें आल्यावर त्यांना ओळखून) चमेली, कमले ! (घागर व त्यावर पिळा ठेवून उत्कंठेनें धांवून) अग, मला भेटा ग अगोदर. (दोघी जणी भेटल्यावर) तुह्मी सुटून इकडं कशा आलांत ?

चमेली–ती मी सर्व हकीकत आपल्याला मग सांगेन. पण आपलं आतां रहाण्याचं ठिकाण इथून जवळच असेल ना ? तिथं गेल्यावर मग स्वस्थपणीं बोलूं. ही कमला फार दमली आहे, म्हणून म्हणतें.

पद्मिनी–चला तर मग. (असें म्हणून घागर व पिळा घेऊं लागते, तोंच.)

चमेली–हें काय बरं बाईसाहेब, तुम्ही नका गडे घेऊं तें, मग आम्ही जवळ कशाला आहोंत ?

पद्मिनी–अग मी आंग धुतलं आहे, म्हणून मीच घेतें.

(असें म्हणून पूर्ववत् घागर वगैरे घेऊन जातात. तोंच एक योगीवेष धारण केलेला पुरुष प्रवेश करून)

योगी–जय शंकराय ! नमः शिवाय ! हा कृत्रिम वेष सुटण्याचा योग लौकर येईल असें कांहीं दिसत नाहीं. कमल-

नाभ रात्रंदिवस प्रयत्न करीत आहे, परंतु त्याच्या हाताला परमेश्वर यश देईल तेव्हां खरें. कालिंदीच्या तपासाकरितां त्याला कितीतरी कष्ट पडले ! पण तिचें भोक्तृत्व अद्याप संपलें नाहींसें दिसतें. सुस्थळीं आली असून तिला बाहेर जाण्याची बुद्धि कां व्हावी ? कशी बिचारी अगदीं आपल्या आईसारखी निवडली आहे. पोरवयांत तिच्या ठिकाणीं इतका सभ्यपणा भरला असेल, असें मला वाटलें नव्हतें. ती किती तरी ममताळू आहे ! जोंपर्यंत या आश्रमांत होती, तों पर्यंत तिनें माझी एकनिष्ठपणानें सेवा केली. पण काय चमत्कार पहा ! तिची पोर माझ्या जवळ होती, ती सुद्धां थोड्या दिवसांपूर्वीं एकाएकी नाहींशी झाली. (दीर्घ उश्वास सोडून) ईश्वरेच्छा ! बहुत दिवसांचा मनाचा हेतू हा आहे कीं, कमलनाभ व कुमार यांनीं एकत्र व्हावें आणि मग शत्रूंचा नाश करून त्यांच्या मस्तकावर राजछत्र दृष्टीस पडावें. असो, सध्यां कमलनाभाचें वर्तन माझ्याशीं शिष्यत्वाच्या नात्यानें आहे, हें ठीक आहे. तो आज बरेच दिवस कुमाराला कारागृहांतून मुक्त करण्याकरितां गेला आहे पण अद्याप कां आला नाहीं हें कांहीं कळत नाहीं. सध्यां त्याचा जीव चिंतासमुद्राच्या भोंवऱ्यांत पक्का सांपडला आहे. कुमार बंधमुक्त होईल तेव्हां हाही त्रासांतून मुक्त होईल. त्याच्या प्रतिबंधानें माझीं अलिकडे नित्यकृत्येंही सुरळीत चालत नाहींशीं झालीं आहेत. ईश्वरसत्ता ! आतां आपण आश्रमांत जाऊन वेपाप्रमाणें कांहीं तरी करीत बसावें.

(जातो.)

प्रवेश दुसरा.

स्थळ–अरण्य, सिद्धाश्रम.

पात्रें–योगी, चतुरसिंह, पद्मिनी, कमला, चमेली, व मणिभद्र.

(तिघी स्त्रिया बोलत बसल्या आहेत.)

प०–चमेली, तूं आज माझ्या दुःखाचा भार कितीतरी कमी केला आहेस, ह्मणून सांगूं? माझ्याच्यानें कांहीं तुझे उपकार फिटावयाचे नाहींत बाई!

चमेली–बाईसाहेब, तुह्मी अशा कष्टी कां होतां? त्यांत उपकार कसले! माझं कर्तव्य मी केलं. पण कालिंदीबाईसाहेब इथं किती दिवस होत्या हो?

प०–अग, बऱ्याच दिवस होत्या. मी प्रथम जेव्हां इथं आलें, तेव्हां त्यांना पाहिल्याबरोबर आम्हां दोघींना त्यावेळीं जो कांहीं आनंद झाला, तो कांहीं सांगतां येत नाहीं. पुष्कळ दिवसांनीं आम्हां दोघींना एकमेकींचा सहवास झाला. इथं आम्हीं सुखासमाधानानं राहून सत्पुरुषाच्या सेवेंत आमचा काळ चांगला जात असे. पण एके दिवशीं त्या सकाळींच उठून प्रातःस्नानाला ह्मणून गेल्या, त्या आपल्या पुन्हा परत आल्याच नाहींत. मग त्यांची काय दशा झाली ती एक देवास ठाऊक!

कमला–पुन्हा नाहींना त्या भेल्याच्या तावडींत सांपडल्या?

चमेली–तें तरी आतां कसं कळणार?

प०–हें पहा चमेली, त्या जेव्हां नाहींशा झाल्या, तेव्हां त्या महात्म्याला सुद्धां फार वाईट वाटलं हो. त्यांच्या डोळ्यांतून चटदिशी लागलीच पाणी आलं.

चमेली–सर्वसंग परित्याग केलल्या प्राण्याला इतकी कां बरं ममता उत्पन्न व्हावी ? साधुमहाराजांच्या पूर्वाश्रमींची कांहीं माहिती लागते कां ? त्यांच्या बोलण्याचालण्यावरून तर्क करण्याचा तुह्मी कधीं प्रयत्नच केला नाहींत वाटतं ?

प०–नाहीं गडे; पण किनै त्यांचा चेहरा पाहिला कीं, पूज्यबुद्धि उत्पन्न होते नी खरोखर कुणी तरी योगी असावे असा भास होतो. परंतु पहावं तो ते गृहस्थाश्रमी मनुष्याप्रमाणं सदां चिंतेंत असतात.

चमेली--मग तर त्यांनीं कांहीं तरी कारणाकरतांच हा वेष घेतला आहे खास.

प०–ते येतील तेव्हां तूंच पाहून त्याचा तर्क कर. तूं आहेस "सुतानं स्वर्गाला जाणारी." हें बघ चमेली तुह्माला ज्यांनीं इकडं पाठवून दिलं ते चतुरसिंहजी इथं आले ह्मणजे दोघांच्या राजकारस्थानाविषयीं गोष्टी चालत असतात, यावरून मलाही संशय येतो.

चमेली–बाईसाहेब, तो कोण बरं असावा !

प०–ते काय उद्योग करतात, राहतात कुठें, त्यांना कुणी आहे कां नाहीं, हें कांहींच कळत नाहीं. मग योगिराजांना ठाऊक असलं तर कोण जाणे ! पण त्यांची खटपट आपल्या राजेसाहेबाविरुद्ध चाललेली असते. मग त्या उभतांचं कां इतकं हाडवैर आहे कुणास ठाऊक ! इकडील सुद्धां त्यांना विशेष कळकळ दिसते, व आतांशी ते कधीं कधीं इथंच भोजनाला सुद्धां राहतात. (इतक्यांत पडद्यांतील ' नमः शंकराय ' शब्द ऐकून) कमले, आंतून आसन आणून इथं मांडून ठेव. (कमला त्याप्रमाणें करते.)

योगी–(पूर्वोक्त ' नमः शिवाय ' ह्मणत प्रवेश करतो. त्यास पाहून तिघी जणी उठून उभ्या रहातात.) नमः शिवाय ! नमः कालाय ! नमः कालाग्निरुद्राय ! (आसनावर बसतो.)

प०–(हळूच) चमेली, तुह्मी त्यांना नमस्कार करा जा. (त्या त्याप्रमाणें करतात.)

योगी–(त्यांना आशिर्वाद वगैरे देऊन) बसा, मुलींनो. पद्मिनी, आज तुझें मुखकमल प्रफुल्लित दिसतें तेव्हां कांहीं आनंदकारक बातमी आहे काय ? या मुली कोण आहेत ?

पद्मिनी–ही आमच्या राणीसाहेबांची दासी व ही माझी.

योगी–असें काय ? पण त्या इकडे कशा आल्या ?

प०–त्या आजपर्यंत प्रतिबंधांतच होत्या, पण त्यांना कालिंदी बाईसाहेबांच्या पतिराजांनीं नुकत्याच मुक्त केल्या. मधींच चतुरसिंह महाराजांची गाठ पडली, तेव्हां त्यांनीं इकडे पाठवून दिल्या आहेत.

योगी–मग यांना कुमारसिंहाबद्दल माहिती असेल तर ? (पद्मिनी लाजते व कमला सांगते.)

कमला–ते आजपर्यंत प्रतिबंधांत होते. त्यांना या चमेलीनं मुक्त केलंन्.

योगी–(हर्षानें) वाः, फार नामी काम केलें. पण तो आतां कुठें आहे ?

चमेली–तें मात्र मला माहीत नाहीं.

योगी–(इतक्यांत चतुरसिंह येतो) मुलींनो, तुम्ही आतां आश्रमांत जा. (त्या जातात) काय बेटा, आज कांहीं खबर आहे कां ! कुमारसिंह मुक्त झाला म्हणून मी नुकतेंच ऐकलें, खरें काय ?

चतुर०–(बसल्यावर) हो, ही बातमी खरी आहे. परंतु तो कुठें आहे, याचा मात्र पत्ता लागत नाहीं. दुसरी एक समाधानकारक बातमी आपल्या चरणांजवळ निवेदन करण्यासारखी आहे.

योगी– ती कोणती बरं ?

चतुर०–कुमारसिंहाला कारागृहांत टाकल्यापासून कांचीपुरांतील लोक अगदीं खवळून गेले आहेत. त्यांचा जनसंघ एकवटून तेथें एक श्रेष्ठ लोकांची सभा स्थापन झाली आहे.

योगी–मग तेथें तुझा प्रवेश झाला वाटतें ?

चतुर०–युक्तीनें मी तेथें प्रवेश केला. त्या सभेंतच कालिंदीच्या पतीची व पद्मिनीच्या पित्याची भेट झाली. मी त्या सर्व सभासदांचे कान राजाविरुद्ध बरेच भरवून ठेवले आहेत. त्यांचें मत आपल्याला अनुकूल असून त्या सर्वांची इच्छा कुमारसिंहास गादीवर बसवावा, अशी आहे. तेथें मी आपली परिस्फुटता न होऊं देतां त्यांना अनुमोदन दिलें.

योगी–ठीक केलेंस. पण त्या सभेंत नक्की विचार काय ठरला ?

चतुर०–कुमारसिंह निर्दोषी आहे या बद्दल मी त्यांची खात्री केल्यावर त्यांचा माझ्यावर पूर्ण विश्वास बसला. राजाला कैद करण्याची मी त्यांना मसलत दिली, व ती सर्वांना पटलीही. आतां कुमारसिंह मात्र सांपडला पाहिजे. मी तर तपास करीत आहेच, शिवाय त्या मंडळींनेही तपास चालविला आहे. येथपर्यंत सर्व तजाविजी ठीक झाल्या. असें शेवटपर्यंत आपल्या कृपाप्रसादानें यश येवो ह्मणजे केल्या श्रमाचें चीज झालें.

योगी–परमेश्वर तुला सिद्धि देईल, तूं कांहीं काळजी करूं

नकोस. त्या एकेश्वरावर मात्र पूर्ण भरंवसा असू दे. पण बेटा, एक गोष्ट फार वाईट झाली.

चतुर०–(घाबरून) काय काय ?

योगी–आठ दिवसांपूर्वी कालिंदीची मुलगी एके रात्रीस नाहींशी झाली. मग तिच्या आंगावरील दागिन्याच्या लोभानें तिला कोणी नेलें किंवा काय झालें तें कांहीं कळत नाहीं.

चतुर०–(कांहीं वेळ स्तब्ध राहून) आश्चर्य आहे. पण चोरट्यांना येथें सुगावा लागला कसा ?

योगी–परमेश्वर जाणें !

चतुर०–असें होऊं लागलें तर त्याचा वेळींच बंदोबस्त केला पाहिजे.

योगी–तुझ्या कानावर गोष्ट घालून ठेविली आहे, आतां तुला वाटेल तें कर.

चतुर०–(दीर्घ श्वास सोडून) येईल त्या प्रसंगाला पाठ दिली पाहिजे खरी. पण मणिभद्र कोठें दिसत नाहीं ?

योगी–हा वेळपर्यंत मींही पण तपास केला नाहीं. (इतक्यांत तो धांवत येतो त्यास पाहून) हा आला पहा.

चतुर०–(त्याजकडे वळून) ये बाळ ये ! (तो जवळ येऊन बसतो.) किती घामाघूम झाला आहेस ! उन्हांत खेळत होतास वाटतें ?

मणि०–त्या तिकडे मोलाची मौज पहात होतों. कते तांगले तांगले मोल आहेत !

चतुर०–तुला खेळायला हवेत कां ते ?

मणि०–हो. मी त्यांच्या बरोबर साला दिवस खेलत जाईन, त्यांला खाऊं घालीन, काय गंमत गंमत करीन.

चतुर०–देईन बरें तुला खेळायाला आणून. पण तूं जेव-लास कां ?

मणि०–हो दूध भात येवला येवला (हातांनीं दाखवितो) खाल्ला.

चतुर०–तुला कोणीरे भात कालवून दिला?

मणि०–त्या, आज आल्या आहेत त्यांनीं.

चतुर०–तुला आहे कां त्यांचें नांव ठाऊक ?

मणि०–मला नाहीं थाऊक. तुमी थांगाना बरं ?

चतुर०–अरे एकीचें नांव चमेली व एकीचें नांव कमला.

मणि०–तमेली, कमला; तमेली कमला. (असें ह्मणत उड्या मारीत जातो.)

चतुर०–पोर मोठें चंचल, हुषार व मनमिळाऊ आहे. मग बापालाच कशी दुर्बुद्धि सुचली कोणजाणें !

योगी–या कामीं त्यानें आपली बुद्धि खर्च केलेली दिसत नाहीं. त्या दुष्टानींच त्याच्यावर फांसा टाकला असावा.

(इतक्यांत आश्रमाच्या तोंडांशीं येऊन)

कमला–आश्रमांत भोजनाची सिद्धता झाली आहे.

योगी–बरें येतों आं. (कमला जाते. चतुरसिंहास–) बेटा, तूं येथेंच आज प्रसाद घे.

चतुर०–गुरुजींची आज्ञा कोण मोडील ?

योगी–चला तर. (उठून) नमः शिवाय ! नमःशंकराय !

(दोघे जातात.)

प्रवेश तिसरा.

स्थळ—कांचीपुरांतील राजमार्ग.

पात्रें—द्युमत्सेन व शामसुंदर.

शाम०—(प्रवेश करून) चित्रसेनानें सेनापति भीमसिंग यांची मदत घेऊन फौजेंत आपला शिरकाव केला. सैन्यांतील मुख्य मुख्य सरदारांची पूर्वींपासूनच कुमारसिंहावर भक्ति होती. त्यांत आणखी राजाच्या दुष्कृत्यांनीं भक्तीला दयेची जोड मिळाली. त्यामुळें सैन्यांतील लोक फितुर होण्यास विशेष प्रयत्नच करावा लागला नाहीं. परमेश्वर अनुकूल झाला, म्हणजे दुःसाध्य गोष्टी सहज सुसाध्य होतात. आतां एकदां कुमारसिंह मिळाला म्हणजे लोकांच्या प्रेमाला इतकी कांहीं भरती येईल कीं, त्यांत राजा, कुटिल मंत्री व विश्वासू राजसेवक भराभर गडप होऊं लागतील. प्रजाजन विथरले आहेतच, परंतु या योगानें उघड उघड लोक राजद्वेष्टे बनतील. नगरशेट सोमदत्त सचोटीनें वर्तन करणारा मनुष्य, पण राजाच्या मोहक भाषणास भुलून कसा फसला पहा ! मुलगा नाहींसा झाल्याचें कळल्यापासून तोंड धरून बुक्याच्या माराप्रमाणें कृतकर्माचा पश्चात्ताप करीत मनांतल्या मनांत तळमळत पडला आहे. पण त्याचा आतां काय उपयोग; शोकानें वेडा न बनो म्हणजे झालें. (इतक्यांत द्युमत्सेन प्रवेश करतो. त्यास पाहून) या द्युमत्सेनराव, कितीतरी उशीर हा ! संकेताप्रमाणें मी तुमची कितीवेळ वाट पहात उभा राहिलों आहे. चांगला एक प्रहर झाला म्हणानात !

द्युम०—अहो, “ परस्वाधीन जिणें आणि पुस्तकी विद्या ”

आमच्या सुग्रणी बाईकडून आम्हाला अन्नदान होईल तेव्हां आमची मोकळीक. ह्मटलें, आतां एकदां प्रवासास निघालों ह्मणजे बहुधा जलपान करूनच क्षुधा शमवावी लागेल. तेव्हां आजचा दिवस तरी पदरांत पाडून घ्यावा.

शाम०–मग तुह्मी पोटपूजेवरच लक्ष दिलें होतें ह्मणायचें !

द्युम०–असा विचार केला, कीं सुयोग जुळून आला आहे. मग तो तरी व्यर्थ कां दवडा ! आत्मा थंड झाला, ह्मणजे मनाला शांतता मिळेल व मनोत्साहानें प्रसंगानुसार लाभही होईल.

शाम०–बरें, हा विनोद पुरे झाला. आतां आपण कोणचा मार्ग स्वीकारावा तें ठरवा अगोदर.

द्युम०–तुमची मनोदेवता प्रथम कोणीकडे जावें ह्मणून सांगतें?

शाम०–मला वाटतें, प्रथम कुमारसिंहाच्या शोधास जावें, आणि नंतर तुमच्या पत्नीच्या शोधाकडे मोर्चा फिरवावा.

द्युम०–पण एके ठिकाणीं दोघेजण गुंतून राहून दुसरें कार्य दीनावधीवर टाकण्यापेक्षां, दोघांनीं निरनिराळ्या मार्गांचें अवलंबन केलें तर विलंब न लागतां दोघांचा संगम झाल्याबरोबर भाऊबिजेची तयारी!

शाम०–वा ! नामी युक्ती !

द्युम०–पण त्यांत एवढें मात्र उभयतांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं "एक पंथ दो काज" तुह्मीही दोघांवर लक्ष ठेवा, व मीही ठेवतों.

शाम०–ठीक आहे. घ्या देवाचें नांव.

दोघे०–श्री अंबा भवानीकी जय !

(दोघे दोन बाजूंनीं जातात.)

प्रवेश चवथा.

स्थळ–राजमहाल.

पात्रें–राजा, बखत्सिंग, क्रूरसिंह, विश्वसेन, भीमसिंग व सोमदत्त.

(भीमसिंग व सोमदत्त यांशिवाय सर्व बसले आहेत.)

राजा–बखत्सिंग, जों जों मी चिंता शमविण्याचा प्रयत्न करायला जातों, तों तों तिची ज्वाला अधिकाधिक भडकत आहे. याला काय उपाय करावा ? पहा. कालिंदीची ती अवस्था झाली, कुमारसिंह पळून गेला, आणि दासींना ज्या गुप्त ठिकाणीं ठेवल्या होत्या, त्यांनाही कोणी विक्षिप्तानें बाहेरून विवर पाडून सोडवून नेल्या; हें गुह्य बाहेर फुटलें कसें, आणि इतका हा प्रयत्न अगदीं बिनचूक केला कोणी ! याची कांहीं कल्पना करतां येत नाहीं.

बख०–शांतिदुर्गाला सांगितलेली भयंकर कामगिरी त्यानें न बजावितां कन्यामोहास वश होऊन तिला कोठें तरी गुप्तस्थलीं ठेवून आपण यःपलाय केलें. त्या दिवसापासून तो पुन्हा आपल्या नोकरीवर हजर झाला नाहीं. या वरून मला वाटतें कीं, त्यानेंच हें गुह्य बाहेर फोडलें असावें ! नाहीं तर दासींना कोठें ठेवल्या आहेत, हें तो आणि क्रूरसिंह या दोघांशिवाय इतरांना माहीत कसें व्हावें ? तेव्हां शांतिदुर्गाच्या नाहींसें होण्यावरून याचा महाराजांनीं तर्क करावा.

राजा–हें तर खरेंच. पण याशिवाय आणखी कांहींतरी मंडळी असावीत. कायरे क्रूरसिंह, तो तुला कोण भेटला होता ?

क्रूर०-त्याचें नांव कांहीं मला माहीत नाहीं. परंतु तो असे शब्द बोलतांना मात्र मी ऐकलें कीं, " जों पर्यंत चतुरसिंह व कुमारसिंह जिवंत आहेत, तोंपर्यंत तुला कधींही चैन पडूं देणार नाहीं " मग त्या उभयतांचा काय संबंध आहे, हें कांहीं कळत नाहीं.

राजा-(विचार केल्यासारखें करून) समजलों, समजलों. आत्तां सर्व माझ्या लक्षांत आलें. अरेरे ! ! त्या वेळीं केवढी भयंकर चूक माझ्या कडून झाली. जसें त्याच्या बापाला गर्तेंत गाडून टाकलें, तीच गती याची जर केली असती तर आज माझ्या आंगाला हा वणवा कां लागतां ! बखत् सिंग, हें सर्व त्याचेंच कृत्य आहे. मोहपाशावांचून सर्प-शिरावर पाय ठेवण्यास कोण तयार होईल. विश्वसेन, जा. सेनापति भीमसिंगाला लौकर घेऊन ये. (तो जातो) क्रूरसिंह, तूं बारीक चौकशीनें त्या घातकी शांतिदुर्गाला एकदां माझ्याकडे पकडून आण. ह्मणजे तो मागील स्नेह विसरून या माझ्या क्रोधाग्नीज्वालेंत स्नेह ओतण्यास कसा प्रवृत्त झाला तें पाहातों.

क्रूर०-आपली आज्ञा नसतांना सुद्धां मी त्याचा पुष्कळ तपास केला व अद्यापही त्याच्या शोधांत आहें. मी आप-ल्याकडून सरकारच्या सेवेंत तिळमात्र आळस करणार नाहीं.

राजा-तुझी मला खात्री आहे, पण उगीच स्मृति देऊन ठेवली. बखत्सिंग, मंत्री विजयसेनाला तूं स्वतः जाऊन माझा हुकूम सांग, कीं शांतिदुर्गाचे सर्व हक्क काढून घेऊन त्याच्या मंदिरांतील सर्व चीजवस्त जप्त करून

आणा, आणि त्याच्या बायकापोरांस बंदिखान्यांत ठेवा.

बखत्०—आज्ञा महाराज. (असें ह्मणून जातो.)

राजा—क्रूरसिंह, अद्याप भीमसिंग आला नाहींरे ?

क्रूर०—त्याची वेळ झाली आहे. (इतक्यांत भीमसिंग मुजरा करून उभा रहातो.)

राजा—भीमसिंग, तुमचा सुस्तपणा आतांशा फार वाढत चालला आहे !

भीम०—काय झालें सरकार ?

राजा—प्रजाजनांचीं घरें दारें लुटलीं गेलीं तरी त्याची अद्याप तुह्माला बातमी नाहीं, आणि सेनापतीचा अधिकार चालवितां ? वरचेवर सरकारी खजिना लुटला जात आहे, याची तुह्माला दाद तरी आहे काय ?

भीम०—होय महाराज, स्वार पाठवून त्याचा तपास चालविला आहे.

राजा—तुह्मांला त्याची खबर कोणीकडून मिळाली ?

भीम०—मंत्री विजयसेनाकडून.

राजा—तरी अद्याप तुह्माला त्याचा तपास लागला नाहीं ? जा. आत्तां ताबडतोब स्वारांच्या अनेक टोळ्या करून जिकडे तिकडे रवाना करा, आणि तो जेथें सांपडेल तेथून त्याला पकडून आणा. असल्या जोखमीच्या कामाला इतकी दिरंगाई काय उपयोगी ? चला जा. नुसता कोरडा निरोप सांगायला माझ्याकडे येऊं नका. (मुजरा करून जातो. इतक्यांत दुसऱ्या बाजूनें सोमदत्त रडत येतो, त्यास) सोमदत्त हें काय ? तुह्मांला हें असें काय झालें ?

सोम०–(रडत रडत) महाराज ! घात झाला हो घात ! आतां मी काय करूं ? (मोठ्यानें हुंदके टाकतो.)

राजा–विश्वसेन, त्यांना नीट सांवरून धर. (तो तसें करतो.) सोमदत्त, असें रडूं नका. काय झालें तें स्पष्ट सांगा.

सोम०–आतां रडूं नको तर काय करूं ? कर्मानें मला रडायला लावलें हो ! महाराज, पुत्रमोह मोठा कठीण आहे.

विश्व०–काय झालें तें नीटपणें महाराजांस सांगा, ह्मणजे ते कांहीं तरी उपाय सांगतील.

सोम०–आतां कशाचा उपाय ! माझा बाळ गेला हो !

राजा०–(घाबरून) ह्मणजे ! काय ह्मणतां सोमदत्त ?

सोम०–महाराज, तुमचें ऐकून ज्या मुलाबद्दल मी त्या दयाघन सत्पुरुषावर खुनाचा आरोप केला तो–तो–त्याचा शाप मला लागला हो ! देवा ! देवा ! (मोठा हुंदका काढतो.)

राजा०–सोमदत्त, कसें काय झालें तें नीट सांगा ! उगीच रडूं नका बोवा.

सोम०–(डोळे पुसून) कुमारसिंह कैदेंतून पळून गेल्याचें जेव्हां मी ऐकलें, तेव्हां मला मोठा विचार पडला. तें खेळकर झालेलें पोर नुसतें घरांत दडून बैस ह्मटलें तर बसणार आहे कां ? तेव्हां मी त्याला चंद्रगिरीस त्याची मावशी आहे, तिकडे एका शिपायाबरोबर रवाना करून दिलें.

राजा–विचार योग्य काढला. बरें मग पुढें काय झालें ?

सोम०–पुढें काय महाराज, माझें कर्म ! (रडतो.)

राजा–(दरडावून) नीट सांगा ! असें बायकासारखे रडता

काय ? तुमच्या मनाला कांहीं वाटत नाहीं ? कोठें आहांत ? कोणापुढें बोलतां ? याचा कांहीं विचार ?

सोम०–(मनांत) वेळेस राजा सापासारखा उलटणार बरें. (उघड) महाराज, पुत्राच्या निरंतरच्या वियोगजन्य दुःखाचें भरतें माझ्या डोळ्यावाटे पाणी काढतें. हें ढोंग नव्हे बरें. (गहिंवर येतो.)

राजा–बरें, बरें, डोळेबिळे पुसून नीट बोला. नाहींतर येथून चालते व्हा.

सोम०–तेव्हां त्याच्या कडील वर्तमान बरेच दिवसांत कळलें नाहीं, ह्मणून मुद्दाम मनुष्य पाठविला. तो तिकडून निरोप घेऊन आला कीं, मुलगा येथें आला नाहीं. महाराज, तुमच्यामुळें मला हें दुःख भोगावें लागलें हो !

राजा–खबरदार अधिक बोलसील तर.

सोम०–(त्याजकडे रागानें पहात) चांगलें महाराज. आपण सांगितलें ह्मणूनना मी या भानगडींत पडलों ? नाहींतर मला कांहीं या गोष्टीची जरूर होती कां ?

राजा—तुला एकदां सांगितलें ना, बोलूं नकोस ह्मणून. क्रूरसिंह, याला घालवून दे येथून.

क्रूर०–(त्याच्या हाताला धरून) चला. आतां येथें बसूं नका. सध्यां सरकार रागावले आहेत. चला चला.

सोम०–तुह्मी कशाला जा ह्मणून सांगता. मला माझ्या कर्मानेंच जावयास सांगितलें. (जाऊं लागतो, जात असतां मनाशीं) पहा, कसा मांग उलट्या काळजाचा आहे तो.(जातो)

राजा–अरे क्रूरसिंह, त्याला थोडासा परत बोलाव. (तो जातो व सोमदत्तास घेऊन येतो.)

सोम०–काय महाराज, कशाला मला परत बोलावलेंत ?

राजा–माझ्या बोलण्याचा तुह्मांला राग आला असेल, पण दुसऱ्या कांहीं कारणानें माझें मस्तक फार तापलें होतें, ह्मणून दोन रागाचे शब्द बोललों. तें खरें मानूं नका. तुह्मी स्वस्थ असा. आह्मीं त्या गोष्टीचा काळजीपूर्वक तपास करतों. पण कोठें याची परिस्फुटता होऊं देऊं नका. जा तुह्मी आतां.

सोम०–बरें महाराज, सध्यां मुलगा नाहींसा झाला आहे खरा ! (जातो.)

राजा–क्रूरसिंह, कशी प्रत्येक गोष्ट आपल्या विरुद्ध घडून येत आहे पहा ! मी भीमसिंगाला हुकूम दिलाच आहे; पण तूंही काळजीपूर्वक त्या छलकाचा तपास ठेव. सोमदत्ताच्या मुलाचें वर्तमान ऐकल्यापासून मला फार चिंता उत्पन्न झाली. कारण जरी कुमारसिंह आज पळून गेला आहे, तरी तो केव्हांना केव्हां तरी आपल्या हातीं सांपडेल. युक्तिप्रयुक्तीनें त्याला आपण पकडून आणूं. पण आपल्या हातचा पुरावा जर शत्रूच्या हातीं सांपडला असेल, तर मात्र गोष्ट फार अवघड आहे. मुलाचा लौकर तपास लागला नाहीं तर खात्रीनें सोमदत्त पुत्र-शोकानें ही वार्ता जनांत प्रकट करील. व तसें झालें ह्मणजे प्रजेचा आपल्यावरील विश्वास उडेल व सर्वत्र मजविषयीं असंतोष उत्पन्न होईल.

क्रूर०–खरें आहे महाराज. तरी आपणांस इतकें भिण्याचें कारण नाहीं. सोमदत्ताचें तोंड मी आत्तां बंद करतों. आपण चिंतारहित असावें !

राजा–बरें आहे. मीही त्याचा विचार करतोंच.

(राजासह सर्व जातात.)

प्रवेश पांचवा.

स्थळ–अरण्य, मार्ग.

पात्रें–कुमारसिंह, क्रूरसिंह व द्युमत्सेन.

कुमार०–(बैराग्याचा वेष घेतलेला) सध्यां मी निःशस्त्र असल्यामुळें अपराध करून पळून जाणाऱ्या एखाद्या खऱ्या अपराध्याप्रमाणें मला वेषांतर करून अरण्यवास पत्करावा लागला आहे. जरी मी खून केला नाहीं व त्याबद्दल माझ्या जवळ बळकट पुरावा आहे, तरीपण मोठमोठे लोक अनुकूल झाल्याशिवाय त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. जातीचा क्षत्रिय असून, मंत्रौषधीनें हतवीर्य करून सोडलेल्या सर्पाप्रमाणें माझी मति कुंठित झाली आहे. प्रपंचरूपी यात्रेंत एखाद्या मुत्सद्याप्रमाणें सर्व प्रकारांनीं साह्य करणारी केवळ पुरुषाची शक्तिच अशी माझी सहचारिणी प्रियतमा, तीही अशा प्रसंगीं मजबरोबर नाहीं. तेव्हां आपण हल्लीं जो वानप्रस्थाश्रम स्वीकारला आहे तोच उत्तम आहे. यांतच आतां प्रयत्न करून जंगली लोकांच्या साह्यानें स्वतःचा पराक्रम जगास दाखवावा. त्या करतां असाच कांहीं काळ कंठला आहे. आज बरेच दिवस प्राणप्रियेचा शोध करून दमलों. मग कां कालिंदीप्रमाणें त्या दुष्टानें तिला नेली, मारली, किंवा वेषांतर करून माझ्या शोधास बाहेर पडली, अथवा तिनें आत्महत्त्या केली, हें कळण्याला कांहीं मार्ग नाहीं. (विचार करीत जाऊं लागतो इतक्यांत क्रूरसिंह येतो.)

क्रूर०–(त्याजकडे पहात हळूं हळूं पाउलें टाकीत मनासीं)

यानें जरी वेष बदलला आहे तरी याच्या मुखश्रीवरून मला कुमारसिंहाचाच संशय येतो. खडा टाकून कां नाहीं पाहिला ! (एकदम पुढें सरून) ए मानभाव्या, चाललास कोठें ? कोण आहेस तूं. उघड बोल. नाहींतर आत्तां तुझी गर्दन उडवितों पहा.

कुमार–आह्मी सर्वसंग परित्याग करणारे तीर्थवासी लोक, देहाचें सार्थक करण्याकरितां निःशंकमनानें व स्वच्छंदवृत्तीनें, भगवन्नामाचें शस्त्र हातीं घेऊन बैरागी बनलों. आणि अयोध्या मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका, रामेश्वर, द्वारका, बद्रिनारायण आदिकरून तीर्थांचें दर्शन घेण्या करितां राना-वनांतून भटकत असतों. आह्माला तुमचा मानभावीपंथ, कां नानकपंथ हा काय ठाऊक ?

क्रूर०–सोंगतर खूप बहारीचें घेतलें आणि बतावणी ही फक्कड केली; पण माझ्या हांतून सुटणार नाहींस आं; विचार कर.

कुमार०–काय बाबा, आह्मी तुझें काय केलें ?

क्रूर०–काय केलें. समजेल आतां काय केलें तें, बोल. तुझें खरें नांव सांग.

कुमार०–नाव आहे जलार्णवांत, (हळू हळू पुढें सरून) मी आहे दुःखार्णवांत आणि तुह्मी आहां आनंदार्णवांत. (हातावर झटका मारून तरवार काढून घेतो.) पण आतां कुठें आहांत बोला ? (त्याला लाथ मारून खालीं पाडतो.) हाच कुमारसिंह, बरें कां ! (हातांनीं धरून त्याला उठवून) जा. राजापाशीं जाऊन शंखनाद कर जा. हरामखोरा, कृतघ्ना, तुला मी जीवदान देतों जा. (त्याला एक धक्का मारून) जा. राजाला माझा निरोप

सांग कीं, सोमदत्ताच्या मुलाला नीट जपून ठेव. (क्रूरसिंह त्याजकडे रागानें पहातो.) पहातोस काय ? चालता हो माझ्या समोरून ! निलाजऱ्या, तूं त्या मांगापाशींच वल्गना कराव्यास! (त्याला लाथ मारून पळून जातो. क्रूरसिंह त्याच्या मागोमाग जाऊं लागतो, इतक्यांत द्युमत्सेन दुसऱ्या बाजूनें येऊन त्याला धरतो.)

द्युम०–कायरे ए, काय दंगा आहे ? त्या निरुपद्रवी व निरपराधी आनंदमूर्तीला तूं कां विनाकारण त्रास देत होतास ?

क्रूर०–कोण तो निरुपद्रवी ? असेल बोवा ! अहो तो एकटा सर्व जगाला आग लावून सोडील, अशी ती परमानंद मूर्ति आहे.

द्युम०–तूं कोण ? आहेस बोल.

क्रूर०–तुम्हांला विचारण्याची जरूर ?

द्युम०–(तरवार उगारून) बोलतोस कीं नाहीं ? तो कोण गेला सांग ?

क्रूर०–तो आमचा शत्रू.

द्युम०–शत्रू खरा, पण त्याचें नांव काय.

क्रूर०–सोमदत्ताच्या मुलाचा ज्यानें खून केला तो कुमारसिंह.

द्युम०–(मनांत) ज्याच्या तपासाकरितां आम्ही दोघे फिरत आहोंत तो अनायासेंच हातीं लागून त्याला सोडून दिलें. रत्न टाकून दिलें आणि ही गारगोटी हातांत धरली. (उघड) कायरे ए, तूं त्याला काय करणार होतास ?

क्रूर०–मारणार होतों.

द्युम०–(रागानें) अरे मांगा, तर मग तूं आतां मरण्यास

तयार हो. (त्याला हिसका देऊन) बोल तुझें नांव काय ?

क्रूर०–माझें नांव क्रूरसिंह.

द्युम०– (मनांत) याचें नांव शांतिदुर्गाच्या तोंडून ऐकलें होतें. (उघड) कालिंदीला आणण्याच्या कामांत तूं होतास कीं नाहीं ?

क्रूर०–होतों. बरें मग ?

द्युम०–मग काय ? तुला आत्तां मी यमपुरीला पाठविणार होतों. परंतु नको. तुला एकदम ठार मारण्यापासून तुझ्या दुष्ट कृतीचें स्मरण तुला राहणार नाहीं. हाल हाल करूनच तुला मारलें पाहिजे. चल–(धक्के मारीत घेऊन जातो.)

प्रवेश सहावा.

स्थळ– अरण्य, डोंगराचे तुटलेले कडे.

पात्रें–कुमारसिंह व कालिंदी.

कुमार०–(प्रवेश केल्यावर इकडे, तिकडे, वर, खालीं, पाहून) काय भयानक स्थान हें. हे गगनचुंबित वृक्ष जणूं काय नभोमंडलाजवळ कानगोष्टीच करीत आहेत. तसेंच हें भीमरूपी कडे निशाचराच्या विशाल मुखद्वाराप्रमाणें आ पसरून येईल त्याचा स्वाहा करण्याकरितांच बसले आहेत. काय ! (खालीं पाहून) उंच सखल जागेवरून सरित्प्रवाह मोठ्या उत्कंठेनें, धो धो अशा गर्जना करीत या कड्यावरून त्या कड्यावर उड्या टाकीत जणुंकाय समुद्ररूपी पतीस आलिंगन देण्याकरितां मनोवेगानें गमन करीत आहे. खरोखर, घनदाट किर्र अशा या घोर वनराजींतून सूर्य किरणाचा

प्रवेश कचित स्थलींच होत असेल. समीरगतीनें हालणारी वृक्षपल्लवी पांथिकजनांस त्यांचें आदरातिथ्य करण्याकरितां पाचारणच करीत आहे कीं काय ? असा भास होतो. पक्षिगण आपल्या मधुर व सुस्वर रवानें आलेल्या पाहुण्यांच्या मनरंजनार्थ मनोहर गायनच करीत आहेत कीं काय ? असें वाटतें. वनपशु आपल्या भयसूचक व कर्णकठोर गर्जनेनें पाहुण्यास त्रास देणाऱ्या इतर प्राण्यांस दटावीत असावेत, पहा त्यांचा हा भयंकर गंभीर शब्द ऐकून इतर निर्बल श्वापदें इतस्ततः भ्रमण करीत आहेत. हा नैसर्गिक देखावा पाहून आनंद व भीति या दोन्ही विकारांनीं अंतः-करणांत प्रवेश केल्यामुळें देहभान जाग्यावर न रहातां एखाद्या प्रस्तर मूर्तीप्रमाणें तटस्थ वृत्ति झाली. मी मार्ग चुकून ह्मणा किंवा भूमिगत असलेल्या लोहचुंबकाच्या आकर्षणशक्तीनें म्हणा–या भयानक गिरिकंदरांत आलों. मग एखाद्या भयंकर श्वापदाच्या भक्ष्यस्थानीं पडणार आहे, किंवा पूर्व सुकृतानें एखाद्या साधूचा दर्शन लाभ होणार आहे ! हें कांहींच कळत नाहीं. असें ऐकलें आहे कीं, तपस्वीजनांचा वास गिरिकंदरांतून असतो. अशा सत्पुरुषाच्या दर्शन लाभाकरतांच माझ्या मनानें अतिशय ओढ घेऊन या स्थलीं आणलें नसेलना ? काय असेल तें असो. सध्यां आपण एका दुर्गम मार्गाचें आक्र-मण करीत आहों खरें. यांतून पार पडूं तोच सुदीन. (विचार करीत असतां सहज वर पहातो. तों शुभ्र वस्त्र धारण करून केशविमुक्ता असलेली कालिंदी मागल्या बाजूनें कड्यावर चढत आहे असें पाहून) हें इतक्या उंच टेकडीवर काय दिसत आहे बरें ? साधुमूर्ति तर नसेल ! कां मला उगीच भास झाला ? (लक्ष पूर्वक पाहिल्यासारखें करून) छे. मनुष्य तर

आहे खचित. मंदगतीनें वरवर चढत आहे. तेव्हां माझ्या सारखाच कोणी दुःखी प्राणी जिवावर उदार होऊन अघोर कृत्य करण्याच्या हेतूनें तर इतक्या भयंकर ठिकाणीं जात नसेलना ? या निर्जन भव्याटवींत कोठें मनुष्याची वस्ती असेल असें मला वाटलें नव्हतें. पण यावरून संशय उत्पन्न होतो कीं, जवळपास कोठें तरी मनुष्य वस्ती असावी. कांहीं असो, प्रत्यक्ष पाहिल्यां शिवाय मनाची खात्री होणार नाहीं. वेळींच गेलों तर कोणी बिचारा संकटांत सांपडला असला तर त्याला आपल्यापासून साह्य तरी होईल. (असें ह्मणून किंचित चालूं लागतो, इतक्यांत थबकून) काय ? येथें एक चमत्कारिक सूर ऐकायला येत आहे. (कानोसा घेऊन) पण मला भास तर झाला नाहींना ? (थांबून) छे, भास नव्हे. रुदनासारखा खरोखरच ध्वनी येत आहे. पण तो कोणाचा आहे, हें मात्र अद्यापि लक्षांत येत नाहीं. (इकडे तिकडे पाहून) ती समोर जाळी दिसत आहे, त्यांतूनच तो ध्वनी येत असावा ! जाऊन तर पहावें. मग मनुष्य असो वा श्वापद असो. (असें ह्मणून जातो.)

कालिं०–(चढत येऊन एके ठिकाणीं बसते.) दमला मेला जीव. केवढी मोठी ही चढण! मात्र त्यांत सुख एवढंच की, वृक्षाच्या दाट छायेनं सूर्याचा ताप सहन करावा लागला नाहीं. देवा, किती मी सुखांत होतें ? पतिसहवासांत दुःखाचा एकही दिवस मला प्राप्त झाला नाहीं. पण दुर्दैवानं त्यांची सगंति सुटल्यापासून संकटांवर संकटं येऊन जसा कांहीं त्यांचा वर्षावच होऊं लागला. त्या कृतघ्न मांगाच्या घरीं होतें तेव्हां पातिव्रत्य रक्षणाकरतां प्रत्यक्ष पोटच्या गोळ्यावरचीही ममता नाहींशी केली;

जल प्रवाहांत बुडत होतें त्यातून ही वांचलें; नदीकिनाऱ्यावर नौका दृष्टीस पडतांच आणखी अधिक संकटांत पडावें लागेल, या भीतीनें गांवाच्या आश्रयाकरितां ह्मणून निघालें तों गांवाचा आश्रय मिळणें तर लांबच राहिलें, पण या भयंकर कड्याचा मात्र आश्रय मिळाला; त्यांतही दुःखांत सुख एवढंच, कीं आजपर्यंत एखाद्या श्वापदाचे भक्ष्यस्थानीं पडलें नाहीं, हें एक भाग्यच समजतें. (थांबून) पण हें कसलं मेलं भाग्य, दुर्भाग्यच तें. रानावनांत हिंडून कधीं जलाहार तर कधीं कंद मूळ खाऊनच क्षुधा शमवावयाची. याला कोण ह्मणेल भाग्य ! साधुजनांना मात्र यांत सौख्य खरं. (थांबून) देवा, अझून माझं नष्टचर्य संपलं नाहीं ना ? नेहमीं मनांत येत असे कीं, माझा शोध करीत करीत प्राणनाथ मला येऊन भेटतील, नी मग आह्मी आपला काळ साधूंची पादसेवा करूनच सुखानं घालवूं. पण तें सर्व मनोराज्य फुकटच गेलं ना ? नारायणा, आतां मी या निर्जन वनांत काळ कसा घालवूं ! गोजिरवाणी पोर, देवा मला आतां मुकलीच ह्मणायची ? आईवांचून तें लहानसं लेंकरूं काय करीत असेल बरं ! योगिराज तिला अंतर देणार नाहींत. व पद्मिनी तर आईप्रमाणं तिचा संभाळ करील. पण माझा मेला वेडा जीव रात्रंदिवस तळमळत आहे. पतिराज, आतां तुह्मी मला अंतरलांत ना हो ! देवा, आतां काय करूं मी ! (स्तब्ध होते. तोंच कुमारसिंह एका मुलासह दुसऱ्या टेकडीवर चढून पहातो.)

कुमार०—छे. मी मार्ग चुकलों. ज्या टेंकडीवर तो आहे, ती टेंकडी ही नव्हे. पहा मला आतां तो येथून जवळ दिसत आहे. पण काय उपयोग ! मला त्याच्या पासून उपयोग नाहीं. अद्याप पर्यंत तर तो तेथें आहे. खरोखर पक्ष्याप्रमाणें जर

मला पंख असते तर आत्तां तेथें जाऊन त्याला संकटांतून मुक्त केलें असतें, किंवा परस्परांच्या भेटीपासून परस्परांना लाभही झाला असता ! (थांबून) नाहीं. अशी हिंमत खचूं देऊन उपयोग नाहीं. पुन्हां प्रयत्न करूं ! (असें ह्मणून खालीं उतरतो.)

कालिंदी–(कड्याखालीं दोन्ही पाय सोडून) या पुढं मला आतां सौख्यलाभ होईल, असं चिन्ह तर मुळींच दिसत नाहीं; उलट हाल अपेष्टांचे डोंगर मात्र पुढं दिसताहेत. मग हा जीव ठेवून तरी काय करायचा ? या वनांत माझे प्राण स्वस्थानीं गेले तर एक दिवस श्वापदाचें तरी भोजन होईल. नारायणा, मी आत्महत्त्या करतें, ह्मणून मला दुर्गती देऊं नकोस बरें. माझें जीवितनाथ व बंधु कुमार कुठं असतील त्यास्थलीं त्यांना सुखी ठेव. प्रियकन्ये सौदामिनी, ज्या वयांत माझी जन्मदात्री आई मला सोडून गेली, त्यापेक्षांही कमी वयांत मी तुला सोडून जात आहें; परमेश्वर तुला सुखी ठेवो. योगिराज, मजसारख्या अभागिनीला आपल्या सारख्या सत्संगतीचा दुर्मिळ लाभ झाला असून तो करून घेणें माझ्या दैवीं नव्हतें. माझा आपल्या चरणीं नमस्कार असो. स्वर्गवासी मातापितरांसही मी मोठ्या प्रेमभावानं वंदन करतें. पतिराज, मरणकालीं आपल्या चरणांचं दर्शन व्हावं अशी मानापासून इच्छा होती, पण आतां तरी आपलं ध्यान माझ्या हृदयांत पूर्ण राहून मला सुखानं मरण येवो, ह्मणजे सद्गति तरी मिळेल. (कांहीं वेळ स्तब्ध राहून एकदम) काय पण हा मी दुष्ट विचार मनांत आणला ? आजपर्यंत इतक्या संकटांतून मी वांचलें, ती पुढें सौख्याचे दिवस दृष्टीस पडण्याकरतांच नसेल ह्मणून कशा वरून ? असाच ईश्वरीसंकेत दिसतो.

"सुखा अंतीं दुःख नी दुःखा अंतीं सुख" अशीच मालिका जगांत नेहमीं दृष्टीस पडते. तसें नसतें तर यापूर्वीच एखाद्या संकटांत कां माझा अंत झाला नसतां ! तेव्हां खचित मला सुखाचे दिवस प्राप्त होतील. (इकडे तिकडे निरीक्षण करून) हा येथून जवळच खालीं उतरण्याला रस्ता दिसत आहे, त्याच्यावरून आपण खालीं तर उतरून जावं, मग पुढें जें होणं असेल तें होवो. (असें ह्मणून उठून दुसऱ्या रस्त्यानें खालीं उतरते. इतक्यांत कुमारसिंह त्या टेंकडीवर येतो.)

कुमार०–(इकडे तिकडे पाहून) अरे, आत्तां मला याच टेंकडीवर तो मनुष्य दिसत होता, मग इतक्यांत तो कोणीकडे गेला ? मी रस्ता चुकून पूर्वस्थळावर तर आलों नाहीं ? (पुन्हा पाहून) छे. बरोबर याच कड्यावर मी आलों. मग त्याची गति काय झाली. खालीं तर पडला नाहीं. (खालीं पाहून) तो पाहिला खालीं उतरत आहे. आपणही त्याच मार्गानें जावें. (असें ह्मणून आल्यामार्गानें खालीं उतरतो.)

कालिंदी–(प्रवेश करून) वरखालीं चढतां उतरतां किती तरी मेला त्रास झाला. पण एक बरं झालं; इतकें दिवस मी डोंगरावर होतें ती आतां मात्र खालीं आलें. इथंच आतां क्षणभर विश्रांती घेऊन नंतर मार्ग शोधावा ! (असें ह्मणून खालीं बसते, तोंच वाघाची आरोळी ऐकूं येते.) (इकडे तिकडे पहात घाबरून) अगबाई, हें काय ! आतां कसं करूं ! जाऊंतरी कुणीकडं ? चहुंकडे ही किर्रझाडी ! देवा, अझून नाहींना तुला माझी दया येत ? (दुसरी आरोळी) देवा, धांव आतां ! (वाघ जवळ येतोसें पाहून भयानें) देवा,

मेलें! मेलें!! (असें ह्मणून मूर्च्छीत पडते. इतक्यांत कुमारसिंह कडेवर घेतलेल्या लहान मुलासह प्रवेश करतांच तो प्रकार पाहून--)

कुमार०--अरे बापरे! काय हा भयंकर प्रसंग!! आतां इकडे मुलाला संभाळूं कां तिकडे त्या बिचारीचा प्राण वांचवूं? दोन्ही प्राण तर वांचले पाहिजेत. परमेश्वरा! यावेळेस तूंच साह्य करशील तर या दोन अनाथ प्राण्यांचे प्राण वांचतील. (इतक्यांत वाघ कालिंदीच्या आंगावर जातोसें पाहून) अरे तूं पंचानन, आपल्याला शूर ह्मणवितोस! आणि अबलेवर धांवून जातोस! धिःकार असो तुला. चल इकडे ये; हा तुझ्यापुढें एक वीर उभा आहे, त्याच्या आंगावर धांव मार! (असें म्हणून त्याजकडे पहात मूल खालीं ठेवून उभा राहतो इतक्यांत, वाघ त्याच्या आंगावर उडी टाकीत आहे. तोंच त्याचे मानेवर जोरानें वार करतो, तो मोठी आरोळी ठोकून मृत होतो.)

कुमार०--(मुलीस उचलून घेऊन कालिंदीजवळ आल्यावर) बिचारी भीतीनें अर्धमेली झाली असेल. लवकर सावध होतें कीं काय हें तरी पहावें! बाई; आपण सावध व्हा, सावध व्हा, वाघ मेला आहे, आपण भिऊं नका!!

कालिं०--(पडल्या पडल्याच) काय ? अशा या भयाण अरण्यांत मनुष्यवाणी! डोळे उघडून (उठत उठत) वाघ खरोखरच मेला आहे ना ?

कुमार०--हो. त्याला मी केव्हांच स्वर्गास पाठविला.

कालिंदी०--(उठल्यावर एकदां वाघाकडे व एकदां कुमार

सिंहाकडे पाहून) हें माझं बाळ यांच्या जवळ कुठून आलं ? (त्यांजकडे टक लावून पहात असतां) हा कुमार तर नसेल ? (आश्चर्यानें) पण हा इकडं कसा आला ? त्याच्या कडेवरील मुलगी तर माझीच दिसते, व मुद्रेवरून हा कुमारच आहे खचित. काय तरी चमत्कार हा! हें सर्व खरं असेल कां ? कां मी स्वप्नांत आहे ! मला भूल तर पडली नाहींना ?

कुमार०–बाई, माझ्याकडे असें टक लावून काय पहातां ?

कालिंदी–मला कांहीं संशय येतो ह्मणून पहातें. (मनांत) निःसंशय कुमारच. (उभी राहून उघड) कोणरे कुमार ?

कुमार०–काय, कालिंदीताई ! (दोघे परस्परास प्रेमानं भेटतात.)

कालिंदी–कुमार, हें तुला माझं सोनं कुठं सांपडलं ? दे दे इकडं. (तिला घेतल्यावर हर्षानें) बाळे सौदामिनी ! (तिचें चुंबन घेते.)

कुमार०–(आश्चर्यानें) ही तुझी मुलगी कां ? काय चमत्कार आहे पहा. (थांबून) ही मला येथेंच एका जाळींत सांपडली.

कालिंदी–कोणी मेल्यानं तिला साधूच्या आश्रमांतून इकडं आणली कोण जाणे ! (तिच्या हाता–पायांत, गळ्यांत पाहून) हिच्या आंगावर एकही दागीना दिसत नाहीं, तेव्हां दागिन्याच्या लोभास्तव कोणी दुष्टानं हिला उचलून आणली असावी. बरं तर बरं, नाहींतर ते धनलोभी या बिचारीचा प्राण घेते तर काय केलं असतं. जावोत मेले दागिने. माझं सोनकुलं मला जिवंत सांपडलं ? त्यांनंच मी मोठी धन्य झालें, (पुन्हां

चुंबन घेऊन) बाळे, योगीराजांना चटका लावून इकडं आलीसना ?

कुमार०–योगीराज कोण ? आणि तूं त्यांच्याकडे कशी गेलीस ? राजाच्या प्रतिबंधांतून तूं सुटलीस केव्हां ? ही सर्व हकीकत मला एकदां सांग.

कालिंदी–तुला मी ती सर्व हकीकत सांगतें, पण इथं अशा या भयंकर अरण्यांत उभं राहण्यापेक्षां आपण एकादें आश्रयाला स्थल शोधूं चल. कदाचित् सुदैवानं योगीराजांचा आश्रम सांपडला तर फारच चांगलं झालं. वाटेनं तुला मी आपली सर्व कथा सांगेन.

कुमार०–बरें तर चल.

(जातात, तोंच पडदा पडतो.)

चतुर्थांक समाप्त.

पंचमांक.

प्रवेश पहिला.

स्थळ–अरण्य, शिवालय.

पात्रें–कुमारसिंह, पद्मिनी, चमेली, व कमला,

(पद्मिनी, चमेली, व कमला, शिवदर्शनाला येतात)

चमेली–बाईसाहेब, तुम्हाला राणीपदाचा मान मिळाल्यावर तुमचं प्रेम आमच्यावर असंच अढळ राहील का ?

कमला–(मध्येंच) अग, प्रेमाशिवाय प्रेम बसत नाहीं.

चमेली–असं जर तूं ह्मणतेस तर राणीसाहेबांचं महाराजांवर अकृत्रिम प्रेम आहे, पण महाराजांचं त्यांच्यावर तसं कुठं आहे ग ?

कमला–त्याचं कारण निराळंच आहे.

चमेली–तें कोणतं ?

कमला–हें पहा, सर्वांगसुंदर, सुवासिक, पण कंटकयुक्त अशा केतकीपासून अपाय होईल, असं ठाऊक असतां सुद्धां भुजंग नागिणीस सोडून तिच्यावरच लुब्ध होतो. त्याप्रमाणें महाराज, अतिशय मोहक पण प्रखर अग्नीज्योती प्रमाणं तीव्र असणाऱ्या कालिंदी बाईसाहेबांकडून क्षणोक्षणीं होणारा अपमान सहन करूनही पतंगाप्रमाणें झडप घालीत असत !

चमेली–झालं तर मग. तुझ्याच तोंडानं न्याय झाला, कीं

प्रीतीपासून प्रीति वाढतेच्च असें कांहीं नाहीं. म्हणूनच मी पद्मिनी बाईसाहेबांस विचारलं हो. (पद्मिनीस) कायहो बाईसाहेब, यमुना नदीला तरी कालिंदीच ह्मणतातना ? तिच्या पाण्याप्रमाणं कालिंदी बाईसाहेबांचं रूप मनोहर, आणि डोहा प्रमाणं अंतःकरण खोल नी भयंकर, असंच किनै ?

पद्मिनी–अग हो. नाहीं कोण ह्मणेल ! जितकी वरून शांत, गंभीर, व मनोहर, तितकीच आंतून तीव्र, उग्र, व खोल. पण हें तीव्रपण तरी कारणानंच उत्पन्न होत असतं. साधु जनांचीं मनं जसीं कोमल नी कठोर असतात, तशींच पतिव्रता स्त्रियांचीं हृदयं असतात ! पण चमेली, आपला त्रिवेणी संगम झाला आहे, ह्मणून आपण परस्पर विनोदानं बोलतों, बसतों, हंसतों, खेळतों; पण तिकडलं स्मरणं झालं ह्मणजे उन्हाच्या प्रखर तापानं कोमल व नाजुक वेली जशी करपते, तसंच विरहज्वालेनं माझं हें अंतःकरण अगदीं होरपळून जातं. कधीं स्वारीचं दर्शन होईल असं मला झालं आहे.

चमेली–चला आपण त्या भोळ्या शंकराचें दर्शन घेऊं. तोच्च दुःखी जनांचा ताप हरण करणारा आहे. त्यास शरण गेल्यानं व त्यावर भरंवसा ठेवल्यानं आपल्यास तोच सुखाचे दिवस दाखवील.

कमला–खरंच बाई, आपण किती तरी वेड्या ! ज्याकरितां आपण योगिराजांची आज्ञा घेऊन आलों, त्याला विसरून उगीच आपल्या कर्मकथा बोलत उभ्या राहिलों आहोंत. (नंतर तिघीही शंकरास नमस्कार व प्रदक्षणा करून त्याच्या समोर येऊन बसतात.)

चमेली–बाईसाहेब एखादं गोडसं गाणं ह्मणा गडे. ह्मणजे त्यांत ईश्वराची स्तुति केल्यासारखीही होईल.

पद्मिनी–ह्मणते बरं–

पद.

(चा०–कधिं करिती लग्न माझें.)

पतितांना तूंचि थारा असली श्री शंकरा ॥ धृ० ॥ पूजिती योगि धूर्जटी। हृदय संपुटीं। येत ना दिठीं। रूप, फणिहारा। असली० ॥ १ ॥ शेष तो वर्णितां तुला। बहुत भागला। शक्ति नच मला। तशी गुणसारा ॥ असली० ॥ २ ॥ राहसी प्रेत भूवरी। धरिशि सुंदरी। अंकिं शिरिं तरी। गणप-सकुमारा ॥ असली० ॥ ३ ॥ पतिविना विफ-लता भुवि। कांत भेटवी। त्वरित वर्षवी। मोद जलधारा ॥ असली० ॥ ४ ॥

चमेली–रात्रंदिवस सेवा करणाऱ्या भक्ताच्या ठिकाणीं देखील इतकं प्रेम असणार नाहीं. अगोदरच सोन्याचं नी त्यांत जडावाचं! बाईसाहेचा कंठ मधुर आणखी त्यांत गान लुब्ध नीलकंठा पुढं अंतःकरणपूर्वक प्रेमाचं गायन; तेव्हां तो भोलानाथ कां बरं नाहीं लौकर प्रसन्न होणार ! आमच्या बाईसाहेबांच्या करुण स्वरानं एखाद्या पाषाणाला सुद्धां द्रव उत्पन्न होईल, मग हा तर ईश्वर आहे.

पद्मिनी–पुरे बाई. एखाद्याची तूं स्तुति करायला लागलीस ह्मणजे त्याला एकदम हरबऱ्याच्या झाडावर नेऊन बसवितेस.

चमेली–मी व्यर्थ कां स्तुति करतें. पहा बरं, आपल्या या

सुधातुल्यमधुर गायनाला भुलून आपल्याला पतिभेटींत दंग करून कधींही भंग न होणाऱ्या सुस्थितींत देव लौकरच ठेवील किनै !

प०–बाई, बाई, बाई, तूं अगदीं बोलण्याची शर्थच केलीस. पण तुझी वाणी सत्य होवो अशीच मी मनापासून या उमारमणाची प्रार्थना करतें. (शंकरास भक्तिपुरःसर नमन करते.)

चमेली–तुमचा हेतू परमेश्वरानं आतांच पूर्ण केला तर मला बक्षीस काय द्याल ?

प०–तुला दासीपणांतून मुक्त करून संसारसुखांत घालीन, मग तर झालं ना ?

कमला–पण मला हो बाईसाहेब ?

प०–तुला ही मुक्त करीन.

कमला–ईशकृपेनं तसाच प्रकार घडून आला तर राणीसाहेबांस अंतर देऊं नका बरं. येवढीच माझी विनंति आहे.

प०–कमले, तुला माझा अनुभव आहेना ? शिवाय राणीसाहेबानीं माझं काय केलं आहे ? महाराजांच्या कृति त्यांना आवडत कां होत्या ? पण करतात काय ! बायका पडल्या परस्वाधीन, त्यांनीं पुरुषांच्या मर्जीप्रमाणं राहिलं नाहीं तर त्यांना सुख कुठून मिळणार ?

चमेली–(देवाकडे तोंड करून) पार्वतीरमणा, चातक पक्ष्याप्रमाणं मार्गप्रतीक्षा करीत असलेली माझी धनीन व धनी यांचा योग सरित्सागरसंगमाप्रमाणं लवकरच होऊं दे, नी माझ्या वाणीलाही यश दे.

कमला–खचित चमेले, तूं जर ही मनोभावापासून प्रार्थना केली असलीस तर खरोखरच तो भक्तकैवारी प्रभु आतांच चमत्कार दाखवील. (इतक्यांत पडद्यांत " जगदीश ! जगदीश ! असा शब्द होतो. " तो ऐकून) अगबाई, हा शब्द कुणाचा !

चमेली–योगिराजांची स्वारी तर दर्शनाला आली नसेल ?

पद्मिनी–छे. त्यांची तर ही वेळच नाहीं. मग काय असेल ते असो. (कुमारसिंह पूर्वोक्त " जगदीश " ह्मणत येतो. त्यास पाहून तिघी चपापून उठून बाजूला होतात.)

कुमार०–(त्यांजकडे पाहून मनांत) अहाहा ! काय आश्चर्य हें ! ! या निबिडारण्यांत एकांत स्थलीं भयाण अशा या शिवमंदिरांत विद्युल्लतेप्रमाणें चमकणाऱ्या या देवांगना कोण असाव्या बरें ? (थांबून) यांतील एकीचें लावण्य तर मला मोहूनच टाकीत आहे. (किंचित् विचारांत पडतो, त्या आपसांत कुजबुजतात.) माझें आराध्यदैवत तर नसेल ! विचारून कां पाहिलें नाहीं ? (थांबून) निःसंशय माझी प्रियतमाच. दुसरी मला कारागृहांतून मुक्त करणारी दासी चमेली. पण तिसरी कोण बरें ? हो समजलों. राणीची दासी कमला. परंतु यांचा संयोग येथें झाला कसा ! आतां मी वेषांतर केल्यामुळें ह्या मला एकाएकीं ओळखूं शकणार नाहींत. व आपणही इतक्यांत ओळख देऊं नये. काय मौज होते ती तर पहावी ! (उघड) बायांनो, तुम्ही नागकन्या, किंवा देवकन्या आहांत ?

चमेली–इतकं आमचं दैव चांगलं कुठं आहे ? आह्मी अरण्यवासी एका तापशाच्या सहवासांत काळ कंठणाऱ्या अभा-

गिर्नीच आहोंत. पण महाराज, आपलं आगमन या अशा भयानकस्थलीं कसं झालं ?

कुमार०—मीही तुमच्या सारखाच अरण्यवासी आहें. पण सत्समागमाचा लाभ मात्र अद्याप झाला नाहीं. तो कदाचित् तुमच्यामुळें होईल असें दिसतें.

प०—सत्समागमानें शांति मिळते ह्मणतात, पण तिचा आमच्या ठिकाणीं अभावच आहे.

कुमार०—तर मग तो सत्संग नव्हे.

प०—कसा बरं ?

कुमार०—समाधान नाहीं ह्मणून.

प०—प्रियवस्तु मिळाल्यावांचून नुसत्या सत्समागमानं मनाचं समाधान कसं होईल ?

कुमार०—पण प्रियवस्तु मिळाली तर होईल ना ?

प०—(स्मित मुखानें) हें काय विचारावं ? मग समाधान झालंच पाहिजे.

कुमार०—मग प्रिय वस्तु मूर्तिमंत पुढें उभी असूनही मन अझून कां बरं समाधान पावत नाहीं ?

प०—(ओळखून हर्षानें) काय प्राणवल्लभा ! (धांवून परस्पर दृढालिंगन देतात.)

चमेली०—(मिठी सुटल्यानंतर) सत्संगतीचं व ईशभक्तीचं तात्काळ फळ मिळालेल्या बाईसाहेबांस व महाराजांस मी वंदन करतें.

कुमार०—चमेली, तुझ्यामुळें मी आज हा सोन्याचा दिवस

पाहिला. शाबास तुझ्या एकनिष्ठतेची व अकृत्रिम प्रेमाची !

चमेली–महाराज, आपल्या कृतीला परमेश्वर यश देवो. (पद्मिनीस) बाईसाहेब, आतां बक्षीस पाहिजे हो.

प०–तें तर देवानंच सांगितलं. (कुमारसिंहास) प्रियकरा, हा वेष टाकून द्यावा आतां.

कुमार०–सखे, इष्ट हेतूशिवाय त्याचा त्याग करावयाचा नाहीं, असा मी निश्चय केला आहे.

चमेली–परमेश्वर लवकर हेतू पूर्ण करील. वेळ जवळच आली आहे.

कुमार०–(पद्मिनीस) प्रिये, ही काय ह्मणते ?

पद्मिनी–योगिराजांच्या दर्शनाला गेलं ह्मणजे तिथंच सर्व हकीकत कळेल.

कुमार०–त्यांचें स्थान येथून किती लांब आहे ?

प०–जवळच आहे. चलावं आपण.

कुमार०–बरें तर चला.

(सर्व जातात.)

प्रवेश दुसरा.

स्थळ–अरण्य, रस्ता.

पात्रें–द्युमत्सेन, कालिंदी, शामसुंदर, व चतुरसिंह.

कालिंदी–(प्रवेश करून) कशी मेली दुर्दैवानं पाठ पुरविली आहे. कुमाराची चांगली गांठ पडून लागलीच कसा वियोग

झाला! आनंद नी खेद बरोबरच! आम्ही उभयतां योगिराजांच्या आश्रमस्थानाकडं जात असतां मार्गांत श्वापदांच्या भयंकर आरोळ्यांनीं आमची अगदीं गाळण उडाली. त्या गडबडींत दोघे दोन दिशेला गेलों; त्याची खबर मला नाहीं, व माझी बातमी त्याला नाहीं. मी इकडं फिरतें आहें, तो दुसरीकडं कुठं तरी फिरत असेल. संकटांवर संकटं आलेलीं सोसतां सोसतां आतां जीव अगदीं नकोसा झाला आहे. (मुलीस मांडीवर घेऊन खालीं बसते.) (गहिंवरून) देवा–

पद.

(चा०–अजि शेवटचा लाभचि हा.)

हत भागिनिही संकटिं कितितरि पडली ॥ तुज नच कां अझुनी दिसली ॥ तुज कृष्णेनें स्मरतां आपत्कालीं । राखिलीस तूं लाज त्यावेळीं ॥ चा० ॥ गजराज विमोचन केलें रे ॥ सुरपथीं अजामिळ चाले रे ॥ ध्रुवबाळ अढळपदिं नेलें रे ॥ (थांबते)

द्युमत्सेन–(प्रवेश करून) मघांपासून हृदयद्रावक वाणी ऐकायला येत आहे, ह्मणून त्या धोरणावर मी या ठिकाणापर्यंत आलों. पण ती वाणी एकदम बंदच झाली. काय चमत्कार आहे? येथें भूतचेष्टा तर नाहीं! (विचारांत उभा रहातो.)

कालिंदी– (शेवटचा चरण ह्मणते.)

अजि करुणेशा धांव सख्या वनमाली ॥
तुजविण ना दुसरा वाली ॥ १ ॥

(खालीं मान घालून विचारांत बसते.)

द्युम०–अरे वा. शद्ब तर अगदीं जवळ ऐकायला येतो.

(पाहून) याच स्त्रीचा तो शब्द असावा ? (जवळ जाऊन) सुंदरी–

कालिंदी–(दचकून वर पहात) दुसऱ्याच्या स्त्रीला सुंदरी ह्मणतांना तुह्मांला शरम कशी वाटली नाहीं? (उठून उभी राहते.)

द्युम०–(मनांत) वेष पहावा तो अगदीं मलिन, प्रकृति पहावी ती अशक्त पण स्वभाव कितीतरी कडक आहे. (निरखून पाहून) अहाहा !! ही तर माझी प्रियतमाच. (उघड) हे चारुगात्री, काय तुझी ही दशा ?

कालिंदी–(ओळखून) प्राणनाथ ! (परस्परास आलिंगन देतात) मला क्षमा करा. मी आपल्यास न ओळखतां भलतेच शब्द बोललें, माझ्या हातून प्रमाद घडला, त्याची क्षमा करावी. (पाया पडूं लागते.)

द्युम०–(तिला उठवीत) छे. छे. हें काय ? अशी चूक होणें साहजिक आहे, यांत अपराध कसला ? (तिच्या पासून मुलीस घेऊन) ये बाळे सौदामिनी, कायग तुझे हाल झाले हे! असो, पण माझ्या श्रमाचें आज खरें सार्थक झालें; आतां एकदां कुमारसिंहाची गांठ पडली ह्मणजे सोन्याहून पिंवळें होईल.

कालिंदी–त्याची व माझी गांठ थोड्या दिवसांपूर्वीच पडली होती.

द्युम०–खरेंच कीं काय ! मग तो आतां कुठें आहे ?

कालिंदी–आह्मी उभयतां एका किर्र झाडींतून जात असतां अकस्मात दोघांची चुकामूक झाली.

द्युम०–असें काय ? पण आतां तो कुठं सांपडेल ?

कालिंदी–येथून जवळच योगिराजांचा आश्रम असेल असं वाटतं. आपण तिथं गेलों तर कदाचित त्याची गांठ पडेल. पण कुमारसिंहाचा व आपला काय संबंध आहे, हें इकडं माहीत नसलच ना अझून ?

द्युम०–काय! त्याचा आपला संबंध? तूं सांगितलेंच नाहींस तर मला कळणार कसें ?

कालिंदी–तो माझा सख्खा धाकटा भाऊ आहे.

द्युम०–(विस्मयानें) काय ह्मणतेस! तुझा धाकटा भाऊ ? मग इतक्या दिवस तूं कोठें मजजवळ बोलली नाहींस ती !

कालिंदी–त्या मांगाच्या भीतीमुळं आह्मीं दोघं एके जागीं राहून त्या मेल्याच्या भयानं कुमाराला सुद्धां मी त्याची बहीण आहे, असं सांगितलं नाहीं.

द्युम०–पण तुला आजपर्यंत राहवलें तरी कसें ? तूं हा मोठाच वेडेपणा केलास. असो, झालें तें झालें. पण तूं आतां कांचीपुरास येतेस ना ?

कालिंदी–त्या मेल्याचं कांहीं बरं वाईट झाल्याशिवाय मी तिकडं तोंड सुद्धां करणार नाहीं !

द्युम०–मग कुठं जायचें; आपल्या नंदिग्रामास ?

कालिंदी–तिकडं जाण्यापेक्षां सध्यां योगिराजांच्या दर्शनास चलावं, नी त्यांची आज्ञा होईल तसं करावं, असं मला वाटतं.

द्युम०–बरें तर चल; तुझ्या योगानें तरी त्या पुण्यपुरुषाचें दर्शन होईल. (असें ह्मणून जातात, तों दुसऱ्या बाजूनें शामसुंदर येतो.)

शामसुंदर—आपण तर फिरून फिरून दमलों बोवा. मार्गांत आजपर्यंत एखादी तरी सोबत भेटवयाची होती! इतके दिवस मी खेडे गांवातून, मोठ मोठ्या शहरांतून, आणि देवालयांतून त्या दोघांचा तपास करीत फिरलों, परंतु अद्याप एकाचा तरी तपास लागावयाचा होता! शेवटीं मग अपयशच येतें कीं काय कुणास ठाऊक! आशेचें निर्मूलन होईना म्हणून आज दोन दिवस अरण्यांतून भटकत आहें, कीं न जाणो—वैराग्याच्या, फकिराच्या, किंवा अन्य प्रकारच्या वेषांतरांत तरी ते मला भेटतील, व माझ्या श्रमाचें सार्थक होईल. आतां पुढें जावें कां मागें परतावें? हा मोठा गूढ प्रश्नच माझ्या पुढें येऊन पडला आहे. (इतक्यांत चतुरसिंह प्रवेश करतो, त्यास पाहून) वाहवा! आपण इकडे कोणीकडे? आपल्या भेटीचा हा आकल्पितच योगायोग आला! नगरांतील हकीगत ठीक आहेना?

चतुर॰—आपल्याला इष्ट अशीच आहे. पण तुह्मी ज्या कार्याकरितां ह्मणून बाहेर पडलां, त्याची कांहीं सफलता झाली कां?

शाम॰—कांहीं नाहीं बोवा. शेवटीं आमच्या पदरीं अपयशाचाच वाटा दिसतो!

चतुर॰—असें खिन्न होऊं नका. योगायोग आला ह्मणजे सर्व कांहीं ठीक होईल. सध्यां तुमचे महाराज येथून जवळच पलीकडच्या अरण्यांत शिकारीकरितां आले आहेत. त्यांच्या शिकारींत मीही आपली शिकार साधून घेणार आहे.

शाम॰—ह्मणजे ती कशी काय?

चतुर—वेळेस जमेल तशी. तो वनपशूची शिकार करील आणि मी नरपशूची शिकार करीन.

शाम॰—ह्मणजे, तुह्मी राजाला धरणार कीं काय?

चतुर०–नुसता धरणारच नाहीं कांहीं, चतुर्भुज करून त्याची नगरांत मिरवणूक काढणार आहे.

शाम०–शाबास तुमची! खरे धैर्यवान आहांत बोवा!

चतुर०–तूर्त माझी स्तुति राहूं द्या. तुह्मी आतां इकडे तिकडे न भटकतां थेट कांचीपुरास जा. आणि विचित्रवीर्य वगैरे मंडळीस कडेकोट तयारीनिशी असायला सांगा. मी या शिकारींत राजाला कैद करून आणणार आहे, हें खास समजा. या रानांत मी शंभर भिल्ल दबा धरून ठेवलें आहेत. त्यांकरवीं हें काम करणार! आतां तुह्मी लवकर जा, आणि पुढील तजविजीला लागा कसे!

शाम०–बरें तर, मी जाऊं आतां?

चतुर०–निःसंशय जा.

(दोघे दोन बाजूनें जातात.)

प्रवेश तिसरा.

स्थळ–मृगारण्य.

पात्रें–राजा, चतुरसिंह, राजसेवक, व चार भिल्ल.

(दोन भिल्ल तिरकमठे घेऊन प्रवेश करतात.)

नाईक–क्यंर झिल्या, सोन्या, चकल्या, झिम्या, क्यं आलं नईत रं?

झिम्या–(व दोन इसम प्रवेश करून) हामी हाओंकीं हथं; शिकार क्वाठं हाय शिकार?

झिल्या–क्यं नाईक, (तिरकमठ्याचा नेम धरून) असा धरूं क तथंच त्येला उताना पाडूं.

नाईक–नईरं, तसं नई.

झिल्या–तर मंग !

नाईक–अरं, त्येला जीत धरायचा हाय.

झिल्या–(तिरकमठा मागें घेऊन) ऊं. मंग काय ?

नाईक–क्यंर, त्वांड वोखाटसं केलंस ?

झिल्या–मी ह्मतूलं त्येला मारून त्येची सागोती त्वांडाला ग्वाड ग्वाड लागतीया क मिठावानी खाराट लागतीया, तिची चऊ तरी बघातली असती.

नाईक–अरं, त्यो मानूस हाय, मानूस.

झिल्या–मंग आपुन जातो बा (जाऊं लागतो)

नाईक–(त्याला धरून) असं क करतयरं.

झिल्या–नग बा. (इतक्यांत चतुरसिंह येतो, त्यास पाहून चपापतात.)

चतुर०–कायरे, काय दंगा आहे ?

नाईक–कई नई सरकार.

चतुर०–नाईक, आतां सावध रहा बरें. नाहींतर जर आपल्या हातची ही शिकार चुकली तर मात्र जन्माची भाकरी जाऊन पोटा करितां दुसऱ्याची चाकरी करावी लागेल.

नाईक–नई गा, तसं क करूं ?

[इतक्यांत पडद्यांत गलबला होतो, तोंच चतुरसिंह शिटी वाजवितांच सर्व पडद्यांत जातात. व दुसऱ्या बाजूनें

राजा आपल्या लोकांसह " धरा, धरा, मारा " वगैरे ह्मणत येऊन पडद्यांत जातात. व पुन्हां दोन्ही बाजूनें दोघे आपापल्या लोकांसह प्रवेश करतात. त्यांचा मिलाप झाल्यावर, राजा–अरे, गेली, गेली, वगैरे ह्मणत आहे, तोंच चतुरसिंहाच्या लोकांपैकीं एकजण त्यास धक्का देऊन खालीं पाडतो, व दुसरा त्याच्या हातांतील तरवार काढून घेतो. राजाच्या लोकांपैकीं कांहीं पळून जातात. बाकीच्यांस धरून भिल्ल आवळीत आहेत; चतुरसिंह राजाला लाथ मारून आपल्या लोकांस त्यास आंवळण्याची खूण करतो, तें तसें करतात. तोंच]

राजा०–अरे मेलों, मेलों.

चतुर०–(आवळणें पुरें झाल्यावर त्याला पुन्हा लाथ मारून) ही चतुरसिंह बंडखोराची शिकार आहे बरें कां ?

राजा--(मनांत) आतां मात्र आमची शंभर वर्षें पूर्ण भरलीं ! (उघड) अरे, तुला मी ओळखला. सोड सोड आतां तुझ्या शौर्याबद्दल तुला मी एक गांव बक्षीस देतों.

चतुर०–तुह्मी आह्माला बक्षीस देतां कां आह्मी तु-म्हाला बक्षिसी देतों, तें कळेल आतां. (आपल्या लोकांस) झिल्या, उचल या राजश्रीना. (उचलूं लागतो, तोंच पडदा पडतो.)

प्रवेश चौथा.

स्थळ–नगर, मार्ग.

पात्रें–शांतिदुर्ग, द्युमत्सेन, व शामसुंदर.

शांतिदु०–(प्रवेश करून) प्रजापक्षाला बराच जोर

आला आहे, व राजपक्षाचे लोकही आह्मांला येऊन मिळत आहेत. यावरून त्या दुष्ट राजाची कारकीर्द लवकरच संपेल असें वाटतें. परमेश्वर करो आणि चतुरसिंहाच्या प्रयत्नाला पूर्ण यश येवो. पण अद्याप कुमारसिंहजीचा ठिकाण लागत नाहीं, याला काय करावें ! द्युमत्सेन व शामसुदंर त्यांच्या शोधास गेल्याला आज बरेच दिवस झालें; परंतु अद्याप त्यांचाही ठिकाण नाहीं. (इतक्यांत शामसुंदर येतो.)

शाम०–काय शांतिदुर्ग महाराज, बरें खुशाल ना ?

शांति०–अहो, आतां आमची खुशाली कसली आणि बिन-खुशाली कसली. आह्मी काय पिकल्या पानाप्रमाणें एखादे दिवशीं गळून पडणार ! पण तुमच्या सारखीं तरुण, होतकरू, धीरवान माणसेंच आजकाल पाहिजे आहेत. आह्मी काय आज आहों न उद्यां नाहीं !

शाम०–असें कां ह्मणतां ! आपल्या सारख्या वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध माणसांच्या कल्पनाशक्तीवर तर आमची सर्व मदार ! तें असो. पण आपण येथेंच वेळ घालविणें बरें नाहीं. अतिशय तांतडीचा चतुरसिंहजीचा निरोप विचित्रवीर्यांनां सांगावयाचा आहे. चला तर अगोदर तिकडे गेलें पाहिजे ?

शांति०–असा काय निकडीचा निरोप आहे ?

शाम०–विचित्रवीर्यासमोरच सांगतों ह्मणजे सर्वांना कळेल. अशा प्रसंगीं उगीच कालक्षेप करून उपयोग नाहीं.

(जातात.)

प्रवेश पांचवा.

स्थळ–दिवाणखाना.

पात्रें–विचित्रवीर्य, चित्रसेन, शामसुंदर, सोमदत्त व शांतिदुर्ग.

(विचित्रवीर्य, चित्रसेन व सोमदत्त बसले आहेत.)

विचित्र०–सोमदत्तजी, तुह्मी चांगले थोर, अब्रुदार, सभ्य गृहस्थ असून त्या दुष्टाच्या मोहजालास भुलून जाऊन एका सत्यप्रिय, उदारधी राजबिंड्यावर विनाकारण आरोप घेतलांत आणि त्या बिचाऱ्याला दुःखगर्तेंत लोटलेंत. बरें, त्यापासून तुह्मांला तरी कांहीं सुख झालें कां ! उलट एकुलत्या एक मुलास मात्र अतंरलांत. अशी कशी तुह्माला भुरळ पडली ?

सोमद०–तें आतां मला कांहीं विचारूं नका. झाली खरी माझ्या हातून गोष्ट. मला त्याची क्षमा करा.

विचि०–पुराव्याची वेळ आली तर तुम्ही सर्वांसमक्ष दरबारांत ही गोष्ट कबूल कराल ना ?

सोमद०–यांत काय संशय ! इतकेंच काय, पण कुमारसिंहजीस या गोष्टीचा खरेपणा यावा, ह्मणून निर्दयानें दुसऱ्या एका गोजिरवाण्या मुलाची बालहत्त्या केली, आणि तें शिराविरहीत धड त्यांना दाखविलें हेंही सांगण्यास कमी करणार नाहीं.

विचि० व चित्र०–(विस्मयानें) काय ह्मणतां सोमदत्तजी !

सोमद०–असें झालें खरें–

विचित्र–(थांबून) काय दुष्टाची अघोर कृति ही ?

चित्र०–बरें. हें कृत्य कोणी केलें असावें ! याची कांहीं तुह्माला माहिती आहे कां ?

सोम०-त्या दिवशीं राजाचा विश्वासू सेवक विश्वसेन, तेथें लुडबुड करीत होता. तेव्हां बहुतकरून त्याचेंच हें कृत्य असावें!

विचित्र०-ठीक आहे. तुह्मी आमच्या कानावर गोष्ट घालून ठेवलीत येवढ्यानें बरें झालें. आह्मी याचा विचार करूं आणि तुमच्या मुलाचाही तपास ठेवूं. जा तुह्मी आतां. (तो जातो शाम० व शांति० येतात. त्यांस पाहून) काय शामसुंदर, यशस्वी होऊन आलांत वाटतें ?

शाम०-यश येथेंच ठेवून गेलों होतों मग कार्य कसें होणार ! गेलों तसा हात हालवीत परत आलों. पण महाराज आताशीं येथें नाहींत काय ?

चित्र०-नाहीं. का बरं ?

शाम०-एका निबिडारण्यांत चतुरसिंहजीची व माझी गांठ पडली होती. त्यांनीं सांगितल्यावरून मी ताबडतोब इकडे निघून आलों. त्यांनीं आपल्यास कडेकोट बंदोबस्तानिशीं रहावयास सांगितलें आहे.

विचित्र०-असें काय ! एकूण त्यांची व राजाची मुलाखत होऊन कार्य सिद्धीस जाणार तर ?

शाम०-असें वाटतें खरें.

विचित्र०-चित्रसेनजी, तुम्ही स्वतः भीमसिंगाकडे जाऊन निराळ्या वेषानें शंभर लोक किल्ल्याच्या पायथ्याशीं जमा करून गुप्त रीतीनें ठेवण्यास सांगा, पण किल्लेदार वश आहे ना ?

चित्र०-त्याची तुम्हाला काळजी नको. राजपक्षास मिळतील असे थोडेच लोक या कांचीपुरांत सांपडतील.

विचित्र–ठीक आहे. पण या शिवाय आणखी कांहीं लोकांनीं जागोजाग मार्ग रोंखून तिकडील खबर त्वरित येथें येऊन पोंचेल असें करा, म्हणजे आपल्यास सावध राहवयास सांपडेल. एकदां तो दुष्ट शृंखलाबंधन होऊन किल्ल्यांत पडला म्हणजे मग आपण निर्भय झालों. व पुढील व्यवस्था राजरोसपणें करण्यास हरकत राहिली नाहीं.

(उठूं लागतात तोंच पडदा पडतो.)

पंचमांक समाप्त.



षष्ठांक.

प्रवेश पहिला.

स्थळ–अरण्य, सिद्धाश्रम.

पात्रें–योगी, कुमारसिंह, द्युमत्सेन, कालिंदी, चतुरसिंह, पद्मिनी वगैरे.

(योगी व कुमारसिंह बोलत बसले आहेत.)

योगी–कुमार, होणारापुढें इलाज नाहीं. परंतु त्या दुष्ट राजानें तुझ्यासारख्या वीराला प्रतिबंधांत ठेवलें, हें फार वाईट कृत्य केलें.

कुमार०–चांगलें कोणतें केलें आहे ! पण एकप्रकारें त्याचे मी उपकारच मानतों, कीं त्यामुळें या चरणांचें दर्शन तरी घडलें.

योगी–त्यांत मोठें अशक्य नाहीं. पण कालिंदीचा व तुझा पुष्कळ दिवस एके ठिकाणीं सहवास असून व तुमचें दोघांचें प्रेमही एकमेकांवर अप्रतिम असून तुह्मां दोघांच्या जनकजननीबद्दल तुह्मांस कांहींच हकीकत ठाऊक नाहीं, हें मोठें आश्चर्य आहे.

कुमार०–आह्मी लहान असल्यामुळें आह्मांला तें कळण्याला काय मार्ग होता ?

योगी–तरी पण तें समजण्याची तुह्माला उच्छुकता नको होती कां ? तुह्मी कधीं त्याची चौकशी केलीच नाहीं वाटतें ?

कुमार०–या बाबतींत तिनंही कधीं माझ्यापाशीं अक्षर काढलं नाहीं व मीही चौकशी केली नाहीं. जनवार्ता व

राजाच्या तोंडून समजलेल्या हकीकतीवरून आह्मी त्याच्या मित्राचीं मुलें आहोंत, इतकेंच काय तें मला माहीत.

योगी–तिला कांहीं तरी जास्त माहिती असली पाहिजे.

कुमार०–परमेश्वर जाणें !

योगी–असो. कांहीं दिवस माझ्या आश्रमांत होती ह्मणून आपलं वाईट वाटतं. कुठं बिचारी मुलीसह रानावनांत फिरत असेल, हरी जाणें ! कुठें ही असो, बिचारी सुखी असो ह्मणजे झालें. (इतक्यांत द्युमत्सेन कालिंदीसह येतात, त्यांस पाहून) कुमार, तीं कोण इकडं येत आहेत बरें ? (कुमारसिंह तिकडे पहातो.)

कालिंदी–मोठ्या प्रयासानं एकदाचा आश्रम सांपडला.

द्युम०–हाच कां तो ?

कुमार०–(उठून त्यांजकडे जातांच त्यांस ओळखून) शाबास द्युमत्सेनजी, तुम्ही यश मिळविलेंत खरें !

द्युम०–परमेश्वर तुह्माला ही असेंच देवो. (योग्याजवळ येतांच–)

योगी–कुमार; कोण आहे रे ?

कुमार०–कालिंदी आपल्या यजमानासह आली आहे.

योगी–असें काय ? बरं बरं. (ते दोघे येऊन नमस्कार करतात, त्यास आशिर्वाद देऊन) बिचारी सुखरूप येऊन भेटली. मोठा आनंद झाला. (द्युमत्सेनास) बसा, (कालिंदी शिवाय सर्व बसतात.) बाई पद्मिनी, (हांक मारल्याबरोबर त्या तिघी येतात.)

चमेली–(कालिंदीस पाहून) अगबाई, कालिंदी बाई-साहेब आल्या. (आनंदीत होतात.)

योगी–कालिंदी, आपल्या मैत्रिणीला भेट जा. (ती जाते. त्या भेटतात व तिला आश्रमांत घेऊन जातात) कुमार, यांचें नांव काय ?

द्युम०–मला द्युमत्सेन ह्मणतात.

योगी०–तुमची व कालिंदीची गांठ कोठें पडली ?

द्युम०–रानांतच पडली. मी या दोघांच्याही शोधाकरितां बाहेर पडलों होतों.

योगी–असें काय ? बरें झालें. आलांत, भेटलांत, संतोष झाला. चतुरसिंहाकडून तुमची अप्रत्यक्ष माहिती मिळत होतीच, परंतु आज सर्वांच्या भेटीचा योग आला. आनंद आहे.

कुमार०–महाराज, थोडीसी विनंती कराविशी वाटते.

योगी–कशाची ?

कुमार०–चतुरसिंहाचा व आपला कांहीं संबंध आहे कां ?

योगी–कुमार, वेडाच आहेस तूं. अरे संबंध कसला ? तुझा माझा कांहीं संबंध आहे कां ? जसा तुझा तसाच त्याचा. शिष्यत्वाच्या नात्यानें तो मला पूज्य मानतो, व निष्प्रांजल बुद्धीनें सर्व हकीगत सांगतो, ह्मणून त्याच्यावर लोभ. दुसरें काय ? या समयाला आतां तो जर असता तर त्याला तुमच्या सर्वांच्या भेटीमुळं किती तरी आनंद झाला असता ! आज पुष्कळ दिवसांत तो इकडे आला नाहीं. मग काय उद्योगांत आहे, हरि जाणें. (इतक्यांत चतुरसिंह येतो, त्यास पाहून)

नांव काढण्याबरोबर दत्त ह्मणून उभा. शतायुषी असो विचारा. (सर्व त्याजकडे पहातात, तो जवळ येतो, त्यास) बेटा, आज परमेश्वरानें तुझी इष्ट मंडळी येथें आणली आहेत. अपूर्व योगायोग !

चतुर०–(योग्यास नमस्कार करून बसतो.) महाराजांच्या कृपेचा प्रसाद. (द्युमत्सेनास पाहून) वा द्युमत्सेनजी, या स्थलीं तुमच्या दर्शनाचा अपूर्व योगायोग ! पण सकुटुंब आलांत ना ?

द्युम०–होय, आणि हे कुमारसिंहही पण आले आहेत.

चतुर०–असें काय ? (त्यांजकडे पाहून) खरोखरच अपूर्व योगायोग ! परमेश्वर साह्यकर्ता झाला ह्मणजे प्रयत्न करून ज्या गोष्टी साध्य होत नाहींत त्या सहज प्राप्त होतात.

योगी–राजाकडची काय हकीकत आहे ?

चतुर०–राजा शृखंलाबंधन होऊन बंदिवासाचें सौख्य उपभोगीत आहे.

सर्व–(आनंदानें) काय, काय ?

द्युम०–कोणी हें अघटीत कृत्य केलें ?

चतुर०–गुरु महाराजांची कृपा.

योगी–ठीक झालें, शंकरानें तुझ्यावर पूर्ण कृपा केली. पण आतां पुढील बेत कसा काय आहे ?

चतुर–कुमारसिंह सांपडेपर्यंत राज्य मंत्रीमंडळीनीं चालवावें, आणि तो सांपडला ह्मणजे योग्य दिवस पाहून दरबार भरवून पूर्वी आपल्याचरणीं निवेदन केल्याप्रमाणें व्यवस्था करावी असें ठरलें आहे.

योगी–कधींचा बेत ठरला ?

चतुर०–आपण जाऊं तो दिवस; कारण आतां कोणतीच हरकत राहिली नाहीं.

योगी–"शुभस्य शीघ्रं" उद्या तिकडे जाण्याचा दिवस ठरवा. पण बेटा, तुमच्या दरबाराला माझी येण्याची इच्छा आहे. कांहीं हरकत नाहींना ?

चतुर०–आपल्या योगानं दरबाराला अतिशय शोभा येईल. मी तरी आपल्या चरणीं ही प्रार्थना करणारच होतों.

योगी–असो. तुझ्या कृतीला प्रभुकृपेचें पूर्ण पाठबळ मिळालेलें पाहून मला फार समाधान झालें. आतां सर्वजण त्या एकेश्वराची एक निष्ठेनें प्रार्थना करा जा. मीहि आतां सायंसंध्येकरितां गंगेवर जातों. (असें ह्मणून योगी उठतांच सर्व उठतात व पडदा पडतो.)

प्रवेश दुसरा.

स्थळ–अरण्य, रस्ता.

पात्रें–दोन गुराख्याचीं मुलें व एक वृद्ध मनुष्य.

१ ला गु०–गवळी वयं, तानी वयं, (असा गाईला हांक मारित इकडे तिकडे फिरतो तोंच दुसरा येतो.)

२ रा गु०–(प्रवेश करून) अरं असा वरडतोयस काय ?

१ ला गु०–(उभा राहून) अर माझी गई चुकली गई. धांव उडी घालसी.

२ रा–कशा पाई धावाया व्हवं.

१ ला–अरं, मंग कशी धावल.

२ रा–धावल तर कुठं जातीया ?

१ ला--नगबा. माझा धनी लई वंगाळ हाय. कोनी तिला कोंडवडया विंडवड्यामंधीं घातली तर मंग त्येचा पैक कुठून द्यावा. घरीं आयबी मारील आन बाबी मारील. मंग कसं करूं ?

२ रा–जाऊं देरं. मी आनून देईन. पन तुला मी इचारतूं, हतंच या रानामंधी माग योक आपल्यासनी ह्मातारा भेटला व्हता. त्यो, ज्याला आपुन मुंडक दावलं आन त्येनींबी आपल्यास काई द्येतो म्हून ह्मटलं, त्यो हकडं आला बि नाय.

१ ला–समदच कुठं तुझ्यावानी भोळं हायती !

२ रा–त्यो नव्हतारं तसा दिसत. ह्मनून ह्मनतुया.

१ ला–अर गरज झाल्यावर कुनीबी इचारीत नाय.

(इतक्यांत एक वृद्ध गृहस्थ येतो.)

वृद्ध–राजापर्यंत दाद न्यावी, ह्मणून घरून निघालें. पण पुराव्याशिवाय तेथें जाऊन मी काय करणार ? ज्यांनीं मला ती हकीगत सांगितली, आणि बाळाचं शीर माझ्या हवालीं केलं, तीं मुलं जर भेटतीं तर फार नामी गोष्ट झाली असती. त्यांना मी तुह्माला कांहीं तरी देईन असें ह्मटलें होतें; पुन्हा मी इकडे आलों नाहीं व त्यांनाही कांहीं दिलें नाहीं. तेव्हां तीं जरी आतां मला भेटली, तरी माझें कसें ऐकणार ?

(थांबून) करूं कांहीं तरी मुलांची समजूत. (चालूं लागतो इतक्यांत तीं मुलं त्याच्याजवळ येतात.)

दोघे–म्हातार बा, म्हातार बा, इचे भन. इसरलात का आमची वळख ?

वृद्ध–कसा विसरेन बरं. माझ्या ध्यानांत आहे ती गोष्ट.

दोघे–द्या तर मंग. (त्याच्या पुढें हात पसरतात.)

वृद्ध–(खिशांतून कांहीं काढून त्यांना देतो.) आतां झालें ना ? (त्यांच्या पाठीवरून हात फिरवून) पण बाळांनो, आणखी एक तुम्ही माझें काम केलें पाहिजे.

दोघे–कोनतं कोनतं ?

वृद्ध–तुह्मी जी मला हकीकत सांगितली, ती राजाच्या कानावर घालावी असा माझा विचार आहे.

१ ला–राजा हायेच कुठं मुळीं ?

वृद्ध–तर मग मेला कीं काय ?

१ ला–मेला नाय, पन मेल्यावानीच कोठडींत पडला हाय.

वृद्ध–(विस्मयानें) अरे हें कसें झालें ?

दोघे–हामाला काय ठावं ?

वृद्ध–आतां कसची माझी दाद लागते ? (खालीं बसून) मी इतकी पायपिटी केली ती व्यर्थच झाली ना ?

१ ला–(त्याला हालवीत) म्हतारबा, असं व काय बसलांत !

वृद्ध–मग काय करूं तर पोरांनो ?

१ ला–आमच्या बाकडं चला, म्हंजे ते कायबी युगत सांगतील.

वृद्ध–(मनांत) हीं पोरं ह्मणतात तें पण ठीक आहे. यांच्या बापाला सर्व माहीत असेल (उघड) पोरांनो, गांव येथून किती लांब आहे ?

१ ला–ह्यो योक धांवभर हाय.

वृद्ध–चला तर मी तुमच्या गांवीं येतों. आज तेथेंच मुक्काम करूं !

१ ला–चला.

प्रवेश तिसरा.

स्थळ–नगर, रस्ता.

पात्रें–विश्वसेन व देवलनाथ.

(दोघे बोलत येतात.)

विश्वसेन–काय देवल, फार अघटीत गोष्ट झाली बोवा !

देवल०–अघटीत तर खरीच. परंतु तुला मी सांगून ठेवतों कीं, वाइट्याचा परिणाम वाईटच होणार. चांगला कधीं होणार नाहीं.

विश्वसेन–ज्याच्या जिवावर आजपर्यंत उड्या मारल्यास, चैन भोगलीस, अंमल गाजविलास, तो संकटांत पडतांच सापासारखा उलटलासना ? शाबास !

देवल०–तर मग काय, त्याच्याबरोबर आपण कैदेंत जावें ?

विश्व०–नको कां जायला ! प्रसंगीं जीवसुद्धां दिला पाहिजे.

देवल०–बरोबर आहे. पण तूंच सांग कीं राजाचें वर्तन लोकांशीं किती प्रेमाचें, व इमानाचें होतें तें ? कृतकर्माचा

मोबदला असाच मिळावयाचा. दुसऱ्या करितां लावून ठेवलेल्या सांपळ्यांत आपलीच मान अडकली तर त्यांत दोष कोणाचा ? कुलहीनाची चाकरी करण्यापेक्षां मरण बरें, परंतु आपण सर्वच प्रसंगीं जिवावर उदार होऊन जी कामगिरी करीत होतो, ती कशा करतां ? पोटाची खांच भरण्या करताच ना ! ह्मणून चांगलें किंवा वाईट हें न समजण्या इतकी कांहीं आपली बुद्धि नष्ट झाली नव्हती, हें खचित.

विश्व०–तसें जरी असलें तरी एकानें इमान सोडलें ह्मणून दुसऱ्यानें सोडावें कीं काय ? तशांतून त्यानें आपल्याशीं काय बेइमानीपणा केला होता !

देवल०–काय हो, येवढा जर तुमचा इमानीपणा जाग्रत होता, तर मग शिकारीच्या त्या धांदलींत पळून कां आलांत ? सांगा बरें. (तो कांहीं बोलत नाहीं असें पाहून) बोला बोला. आतां कां गप्प बसलांत ?

विश्व०–त्या वेळेस शत्रूचे लोक पुष्कळ आणि आपले लोक थोडे होते, ह्मणून तसें करावें लागलें.

देवल०–अहो, जीव द्यावयाचा होता ! मघा पासून जो दुसऱ्याला बोध चालला होता, कीं " प्रसंगीं जीव ही दिला पाहिजे. " तें आपणच कां ! आपल्या इमानाची व उपदेशाची तारीफ करावी तितकी थोडीच आहे.

विश्व०–खरें सांगू देवलनाथ, इतका वेळ माझें सगळें बोलणें तुझें मत पाहण्याकरितांच होतें. आतां मला दुसरें कांहीं दुःख वाटत नाहीं, पण पूर्वीप्रमाणें अंमल आणि चैन हीं मात्र चालणार नाहींत.

देवल०–हें मात्र बरोबर आहे. (इतक्यांत पडद्यांत

" आज राजवाड्यांत मोठा दरबार भरणार आहे. तेथें सर्वांनीं येऊन आपापलीं काय असतील तीं गाऱ्हाणीं सांगावीं हो. ")

विश्व०–(दंवडी ऐकून) देवल, येतोस कां ? आपण जाऊं.

देवल०–कशाला तें ? तेथें सर्व आपल्या विरुद्धच चालणार ? आलीच वेळ तर आपण आयतेच धरलें जाऊं, ह्मणजे झालें !

विश्व०–काय न्याय होतो, गादीवर कोणाला बसवितात, तक्रारीला कोण उभा राहतो, हें तर कळेल. आपण आपले वेष बदलून जाऊं ह्मणजे मग आपल्यास एवढ्या गर्दीत कोण ओळखणार ?

देवल०–आपण नाहीं बोवा येत, तुला जावयाचें असले तर तूं जा.

विश्व०– (त्याला ओढून,) चलेर, असा भागुबाईसारखा भितोस काय ? (ते जातात, तोंच वृद्ध व दोन गुराख्याचीं मुलें प्रवेश करतात.)

वृद्ध–कायरे पोरानों, आज दरबार आहे ह्मणून तुमच्या बापांनीं सांगितलें ना ?

१ ला–व्हय (इतक्यांत पडद्यांत दौंडी होते.)

वृद्ध–(दौंडी ऐकून) दरबारांत जाण्याला सर्वांना मोकळीक आहे, असें या दौंडीवरून होतें. मग आपली दाद कशी लागेल या विषयीं कांहीं काळजी राहिली नाहीं. (मुलांस) चलारे, आपण आतां दरबाराला जाऊं, पण तुह्मी भिणार नाहींना?

१ ला–भेऊं कशापाई ?

वृद्ध–चला तर. (जातात)

प्रवेश चौथा.

स्थळ–राजवाडा, दरबार.

पात्रें–विचित्रवीर्य, चित्रसेन, शामसुंदर, द्युमत्सेन, विजयसेन, भीमसिंग, राजा, सोमदत्त, मणिभद्र, विश्वसेन, चतुरसिंह, मदन, कुमारसिंह, योगी, वृद्ध, मुलें, (गुराख्यांचीं) शिपाई, व इतर.

[मध्यंतरीं सिंहासन मांडलें असून त्याच्या दोन्ही बाजूंनें वृद्ध व मुलें, खेरीज करून सर्व बसले आहेत. पिंजऱ्यांत कैद केलेला राजा असून दुसरा एक रिकामा पिंजरा ठेवला आहे. दरबारच्या रितीप्रमाणें शिपाई प्यादे उभे आहेत.]

विचित्र०–(उभा राहून) प्रजाजनहो ! आज दरबार भरविण्याचें कारण सर्वांस विदित झालेंच आहे. मीही एक आपल्या पैकींच आहें. आजच्यासारखा दरबार आजपर्यंत या कांचीपूर नगरांत कधींच भरला नव्हता. आजच्या या अपूर्व योगाचें श्रेय सर्वस्वी हें अधिष्ठित असलेले गुरुमहाराज महान् तपस्वी योगिराज, आणि हे महाप्रतापी चतुरसिंहजी, यांजकडे आहे. या दरबारांत पदभ्रष्ट राजाच्या अन्यायाचा निकाल करून राजपद पूर्ववत यांचे यांसच द्यावयाचें, किंवा सर्वानुमतें या गादीला दुसरा मालक करावयाचा, हा मुख्यत्वें विचार व्हावयाचा आहे. तरी यांजकडून कोणावर जुलूम झाला असेल, अन्यायानें यानें कोणाची संपत्ति हरण केली असेल, किंवा एखाद्या कुलीन, सत्वस्थ पुरुषाचा अथवा स्त्रीचा छल केला असेल, त्यांनीं आज या दरबारांत उठून आपली तक्रार निवेदन करावी, ह्मणजे योग्य तो विचार करण्यास ठीक पडेल. (खालीं बसतो.)

सोम०--(उठून) लोक आह्माला नगरशेट ह्मणतात, परंतु वास्तविक तशी माझी किंमत नाहीं. आम्ही व्यापारी लोक पैशाचे अत्यंत लोभी; तरी वाईट मार्गानें आजपर्यंत मी कधीं पैसा संपादन केला नाहीं. व त्या करितां कधीं वाईट कर्म ही केलें नाहीं. पण (राजाकडे बोट करून) या चांडाळानें कुमारसिंहजीवर खुनाचा आरोप मजकडून करविला. त्या कामीं मी पुष्कळ आढेवेढे घेऊन पाहिले, पण राजश्रीनीं आपल्या अधिकाराचा दाब मजवर बसवून तसें कृत्य करण्यास मला भाग पाडलें. ही अति निंद्य गोष्ट केल्यानें मी मोटा अपराध केला, असें खरें; परंतु या मांगहृदयानें अपराधाच्या पुष्टीकरणार्थ खरोखरच एका अर्भकाचा खून करविला !

राजा–(मध्येंच)ए शतमूर्खा, तूं हें माझ्यावर थोतांड रचून वाटेल तशा वाक्पांडित्यानें लोकांस भाळीत आहेस काय ?

विचित्र०–महाराज, (जीभ चावून) आतां आपल्याला महाराज ह्मणतां येत नाहीं. परंतु आपल्यास निक्षून सांगणें या वेळीं मला भाग पडत आहे, आपण मध्येंच विनाकारण अगदीं भाषण करूं नये.

सोम०–मी हें थोतांड मुळींच रचलें नाहीं. सत्य गोष्ट आहे ती सांगितली.

चित्र०–(इतक्यांत पडद्यांत गलबला होतो, तो ऐकून) जमादार, काय गडबड आहे ?

जमा०–बाहेर एक वृद्ध मनुष्य व दोन मुलें आंत येण्या करितां गडबड करीत आहेत.

चित्र० –मग त्यांना आंत सोडा. (वृद्ध व मुलें येतात)

विचित्र०–(वृद्धास) काय गडबड आहे हो ?

वृद्ध०--महाराज, मुलाच्या खुना विषयीं गोष्ट निघाली म्हणून आंत येण्याविषयीं धडपड करीत होतों,

विचि०–बरें तुमची काय हकिकत आहे ? सांगा पाहूं. असें इकडे या.

वृद्ध–(पुढें जाऊन) ही गोंवारी मुलेंच सांगतील.

विचित्र०–कायरे मुलांनों, तुम्हाला याविषयीं काय हकीकत माहीत आहे ?

१ ला–हामी रानामंधीं ढोरें चारीत व्हतों, तवा एका मनुक्षानं याक पोर तथं आनलं, आन गळा कापूनशान डोस्कं तथंच टाकलं, मंग बेगीबेगी बाकीचं धड येका गंठुड्यांत बांधून-शान घेऊन पळून गेला. हामी तथं येका जाळीमंधी बसून ह्ये समदं हेरलं. त्यो गेल्यावर हामी तथं जातों त्यो ह्यो ह्मातारबाही तथंच आला; त्येनी त्ये मुडंक बघूनशान आक्सी वरडूं लागला, आन काय !

वृद्ध–(गहिंवरून) महाराज तो माझ्या मुलाचा मुलगा होता हो ! माझ्या वंशाचा आधार काय तो तेवढाच. तो कोणी चांडाळानं नाहींसा केला, हरी जाणे ! देव त्याचें कधीं कल्याण करणार नाहीं.

विचित्र०–(मुलांस) मग, इथें तुझांला कोठें तो मनुष्य दिसतो का ?

दोघे०–(मुलें इकडे तिकडे पाहूं लागतात, इतक्यांत विश्वसेन उठून जाऊं लागतो त्यास पाहतांच) ह्योच ह्योच !

विचित्र०–जमादार, त्याला पकडून आणवा. (दोन शि·

पाई जाऊन त्याला धरून आणतात.) पिंजऱ्यांत त्याला उभा करा. (तसें केल्यावर विश्वसेनास) कां विश्वसेनराव ! हीं मुलें काय सांगतात ? (राजा व विश्वसेन आपसांत खुणा करतात.) मुलांचा तुमचा कांहीं वाद नाहीं. त्यांनीं सांगितलेली हकीगत खरी आहे काय ? (तो कांहीं न बोलतां खालीं मान घालतो. वृद्धास व मुलांस) बसा, तुह्मी खालीं बसा (ते बसतात, तोंच कुमारसिंह उठतो.) काय, विश्वसेन सांगतां कां ?

कुमार०—तो काय सांगतो ! त्याच्या मुद्रेवरून त्यांनीं सांगितल्या सारखेंच आहे. त्या दिवशीं तेथें त्याच्याशिवाय दुसरा कोणी नव्हता व हल्लींच्या त्याच्या मुग्ध स्थितीवरून त्यानींच हें अघोर कृत्य केलें असें सिद्ध होत नाहीं काय ? ज्या दिवशीं राजांनीं मला बडंखोरावर जाण्याचा हुकूम दिला, त्याच दिवशीं त्यांनीं बोलण्यांत पुष्कळ साखर पेरून, मला मोठेपणा देऊन, माझी स्तुति करून रवानगी केली, तेव्हांच मला संशय आला. हुकुमाप्रमाणें मी कामगिरीवर वेळेवर जाण्याकरितां निघालों असतां माझी प्रियपत्नी या नीचानें कालिंदीताईच्या केलेल्या छलाबद्दल पाहिलेल्या कृतिवरून भीतीनें मला जाण्याचा प्रतिकार करूं लागली. त्यावेळीं कशीतरी तिची समजूत करून मी बाहेर पडलों, फार दूर गेलों नाहीं तोंच मजवर दहा पांच असामींचा घाला आला, पण सुदैवानें त्यांतून निभावून घरीं आलों, तों पत्नीचा ठिकाण नाहीं. तेव्हां तर संशय दृढच झाला. तिचा शोध करतों आहे, इतक्यांत यांचे खानगी दिवाण बख्तसिंग मोठ्या गडबडीनें मला बोलावूं आले, कीं महाराजांनीं आतांच्या आतां बोलविलें आहे. शेवटीं पत्नीच्या शोधाचें काम तसेंच टाकून त्यांच्याबरोबर राजवाड्यांत गेलों. तेथें पहातों तों सोमदत्त, राजा व हा विश्वसेन, यांशिवाय दुसरें कोणीही नव्हतें.

लागलीच खुनाचा माझ्यावर अपराध लागू करून मला प्रतिबंधांत ठेवलें. एवढ्या या कृत्यावरून काय ध्यानांत घ्यावयाचें ? राजाच्याच मनांतून मला जगांतून नाहींसें करावयाचें होतें. ह्मणून त्यांनीं हे दोन्ही तिन्ही प्रकार योजून ठेवले होते, असें ह्मणण्यास काय हरकत आहे ! याला दुसरें एक प्रत्यंतर ! हें पत्र पहा. (पत्र काढून विचित्रवीर्यांच्या हातांत देतो.)

विचित्र०–(पत्र वांचून पाहून) सोमदत्तजी, तुह्मी आपल्या मुलाला कुठें पाठविलें होतें ?

सोम०–चंद्रनगरास, मुलाची मावशी आहे तिच्याकडे पाठविलें होतें.

विचित्र०–त्याच्याबरोर कांहीं पत्र दिलें होतें कां ?

सोम०–हो. मी आपल्या एका शिपायाबरोबर पत्र व मुलास देऊन पाठविलें होतें. तेंच हें पत्र आहे वाटतें !

विचित्र०–हें पहा बरें, तुमचेंच का ? (त्याच्या हातांत पत्र देतो.)

सोम०–(पत्र पाहून) हेंच तें पत्र. पण यांच्या हातीं कसें आलें ?

कुमार०–माझी दासी चमेली, हिनें मला कारागृहांतून मुक्त केल्यावर मी आपल्या शरदिनी नदीच्या तटाकीं आलों. तों नदीच्या पलीकडच्या तिरावर एका मनुष्यानें त्या शिपायास मारून मुलास नेलें. पाठीमागून मी तेथें गेलों तों शिपाई नदी किनाऱ्यावर मरून पडला होता. त्याच्या खिशांत मला हें पत्र सांपडलें. आतां तो मनुष्य कोण होता, हें मात्र मला माहीत नाहीं. (खालीं बसतो. इतक्यांत चतुरसिंह उठतो.)

चतुर॰–तो मनुष्य मीच. मी त्याला मारून सोमदत्तजीच्या मुलाला कां नेलें, हें सांगण्यापूर्वीं राजाचा व माझा संबंध काय आहे, हें अगोदर निवेदन करतों. विचित्रवीर्य महाराज, या तुमच्या पदभ्रष्ट राजाचें नांव सर्वांस विदित असेलच, मलाही माहित आहे; पण पुन्हां एकदां तोंडून ऐकावें अशी माझी इच्छा आहे.

विचित्र॰–जग जाहीर असलेलें नांव सांगण्यास काय हरकत आहे ? यांना सिंधुराज महाराज ह्मणतात.

चतुर॰–असें काय ? कायहो महाराज, हें तुमचें खरें नांव आहे काय ?

राजा–हो, हेंच आहे.

चतुर॰–महाराज, अझून तरी खरें बोला. कुटिल मार्ग सोडा, ही तुमच्या आयुर्मर्यादेची शेवटलीच पायरी आहे.

राजा–माझें हेंच नांव खरें आहे. दुसरें नांव असलें तरी तें राजपदापूर्वीचें आहे. त्याच्याशीं आतां काय कारण राहिलें ?

चतुर॰–कारण तर नाहींच. मग तुह्माला राज्याभिषेकाच्या वेळीं सिंधुराज हें नांव देऊन काश्मीराधिपतींनीं इकडे पाठविलें वाटतें ?

राजा–(थोडे ताठ्यानेंच) हो, हो, असेंच !

चतुर–पहा, दुष्ट इतक्या पेंचाटींत सांपडला आहे तरी खरें बोलतो आहे का ? कृतघ्ना, मागली कांहीं ओळख धर. तुझा अद्याप मद उतरला नाहीं असें दिसतें. जखमी करून विहिरींत टाकून दिलेला कमलनाभ हाच. बरें का ? व तोच चतुरसिंह बंडवाला ! तुझ्या हातांतून कालिंदीला हिरा-

वून नेणाराही हाच. अधमाधमा, नीचांत गणलेली यःक-
श्रित अबला तिनें उपकार स्मरून आपल्या धन्यास ह्मणजे
कुमारसिंहास बंदिवासांतून मुक्त केलें, आणि मांगा, तूं पुरुष
असून, सारासार विचारशक्तीस झुगारून देऊन स्वार्थानें-
ज्याच्या योगानें तूं योग्यतेला चढलास, त्या आपल्या धन्यास
मारून, व त्याच्या मुलास जखमी करून-राज्यपदावर
आरूढ झालास; कन्येप्रमाणें जिला जवळ बाळगलीस तिच्या-
वर पापदृष्टि ठेवून आपली प्रज्वलीत झालेली कामवासना तृप्त करून
घेण्याकरितां तिला नाहक छळून तिच्या तान्ह्या अर्भकास मारण्यास
प्रवृत्त झालास ? धिःकार असो, तुझ्या मनुष्यपणाला ! मनुष्य-
जन्मास आलास त्यापेक्षां एखाद्या हिंस्रक पशुचा जन्म कां नाहीं
घेतलास ? या वेळेस माझ्या संतापाग्नींत तुझी आहुतीच दिली
असती. पण हा दरबार आहे, ह्मणून मला तसें करतां येत
नाहीं. (वळून) सुजनहो, या तुमच्या दुष्ट, कृतघ्न, राजाचें
नांव कांतिवर्म. हा माझा बाप सिंधुराज, त्यांच्यापाशीं कारकून
होता. माझ्या वडिलांस काश्मीराधिपतीकडून कांचीपूर प्रांता-
च्या जाहागिरीची सनद मिळाल्यानंतर ते इकडे येत असतां
मार्गांत त्यांना मारून मलाही नामशेषच करून टाकलें होतें,
परंतु पूर्वसुकृतानें मी जीवंत राहिलों ह्मणून आजचा योग्य
प्रसंग तरी आला. कुमारसिंह व कालिंदी हीं माझीं भावंडें
होत. (कुमारसिंह उठून. दादा ! असें ह्मणून एकमेकांस भेटतात.
नंतर) आतां कुमारसिंहास मारण्याचा याचा काय हेतु होता,
व मी याचा खजिना वगैरे लुटून कालिंदीची व कुमारसिंहाची
इतकी कळकळ बाळगून त्यांना संकटमुक्त व दोष मुक्त कर-
ण्याचा कां प्रयत्न करीत असें, हें सर्वांच्या लक्षांत आलेंच असेल ?

सोम०-पण महाराज, मला असेंच दुःखांत ठेवणार का ?

चतुर०–(वळून) मदन, मणिभद्राला आण पाहूं. (मदन पडद्यांत जाऊन त्याला घेऊन आल्यावर) शेटजी, हाच का तुमचा मुलगा ?

सोम०–(आनंदानें) होय महाराज. (त्याला भेटतो)

योगी–परमेश्वराच्या कृपेनें जो दिवस मी मनांत बहूत काल योजून ठेवला होता तो हा आजचा असल्यामुळें फार आनंदाचा भासत आहे, तेव्हां मलाही चार शब्द बोलण्याची परवानगी असावी.

विचित्र०–महाराज, आपण असें कसें बोलतां ? आपण गुरुस्थानीं अहांत. आपल्याला कोठें व कोणत्याही प्रकारची मना नाहीं. आपले चार शब्द आमच्या कानांवर आलें तर आह्मी मोठें धन्य होऊं !

योगी–(कृत्रिम दाढी वगैरे टाकून रागानें) अधमा, ओळख मला, पुरता ओळख ! (इतक्यांत चतुरसिंह त्यांस ओळखून)

चतुर०–बाबा ! (असें ह्मणून धांवत जाऊन त्यांना भेटतो. नंतर कुमारसिंह व द्युमत्सेन त्यांस जाऊन भेटतात. नंतर) कृतघ्ना, विश्वास घातक्या ! तुझ्यावर मी पूर्ण विश्वास टाकला ह्मणून त्याचें फळ तूं मला हें दिलेंस काय ? (तो थरथर कांपूं लागतो) सज्जन हो, चतुरसिंह उर्फ कमलनाभ, यांनीं तुह्मांस सर्व हकीकत सांगितलीच आहे. आतां सांगावयाची राहिली ती काय थोडीच आहे. काश्मीर देशाचा सरदार सिंधुराज तो मीच, हें तुह्मी आत्तांच्या कमल नाभाच्या भाषणावरून जाणलेंच असेल. या मांगानें मला मार्गांत अन्नांत मादक पदार्थ चारून मी बेशुद्ध झाल्यावर मला जीवंतपणींच पुरून टाकलें, परंतु ‘ तारत्यापुढें मार-

त्याचें कांहीं चालत नाहीं ' असें ह्मणतात, त्याप्रमाणें माझ्या एका विश्वासू चाकरानें याचा मुक्काम हालल्यानंतर मला काढून आपल्या घरीं नेलें. तेथें मी दोन वर्षे अजारी होतों. माझी त्या नोकरानें चांगल्या प्रकारें सेवा करून उत्तम सुश्रुषा ठेविली ह्मणून मी जीवंत राहिलों. पुढें येथून दोन कोसांवर एक दाट अरण्य आहे, तेथें भिल्ललोकांच्या मदतीनें आश्रम बांधून राहिलों असतां, तेथेंच कमलनाभाची व माझी अकस्मात गांठ पडली. मी वेषांतर केलें असल्यामुळें त्यानें मला ओळखलें नाहीं. पण मी तात्काळ ओळखून त्यास ओळख न देतां आपला शिष्य बनविला. तेव्हांपासून आजपर्यंत त्याच्या द्वारानें ही मलसत पार पडली, व तुमच्या सारख्या थोरांचा त्यास आश्रय मिळाला ह्मणून आज हा आनंदाचा दिवस दृष्टीस पडला. या नीचाला पाहिल्यापासून मला अतिशय त्वेष आला होता, परंतु तो सर्व राग मी या वेळेस गिळून टाकला आहे.

(" मारा, तोडा, उभा जाळा, " वगैरे शद्बांचा एकच गलबला होतो.)

विचि०–(तो गलबला थांबवून) प्रजाजनहो, इतका वेळ झालेल्या संभाषणावरून मूळचें हें राज्य कोणाचें आहे, व त्याचा अपहार कोणी केला, हें तुमच्या ध्यानांत येऊन चुकलेंच असेल ? तेव्हां योगीरूप धारण केलेल्या सिंधुराज महाराजांस राज्यपदावर आरोहण करण्यास कोणतीच हरकत नाहीं, असें मला वाटतें !

सर्व–तुमचा विचार आह्मांला पसंत आहे.

विचि०–सिंधुराज महाराज, आपण कृपा करून आतां गादीचा स्वीकार करावा.

सिंधु०–मी हा कारभार बहुत दिवस करून ज्यांच्या करतां ही जोड करून ठेवली, त्यांसच गादीवर बसवावें ह्मणजे झालें. त्यांत माझा संतोष आहे.

विचि०–कमलनाभजी, वडिलांच्या वचनास आपण मान द्यावा.

चतुर०–माझें लग्न झालें नसल्यामुळें मला गादीवर बसण्याचा अधिकार नाहीं. तेव्हां तुह्मी कुमारसिंहासच राज्यपदावर आरूढ करावें, असें मला वाटतें.

सिंधु०–माझेंही मत तेंच आहे.

विचि०–बरें आहे; तुमच्या मर्जीप्रमाणें. (वळून) प्रजाजनहो, ज्याचें राज्य त्यास दिल्यानें आपण कांहीं अन्याय केला असें होत नाहीं. करितां सर्वानुमतें कुमारसिंहजीस राज्यासनावर बसवितों.

सर्व–आमची त्याला अनुकूलता आहे.

विचि०–(शामसुंदरास पोषाख आणण्याची खूण करतो, त्यांनीं तो आणल्यावर) कुमारसिंहजी, इकडे यावें. (तो जवळ आल्यावर) हा पोषाख आंगावर घाला. (त्या प्रमाणें करतो.) आतां वडील मंडळीस वंदन करून गादीवर पाय ठेवा. (त्याप्रमाणें तो सिंधुराज, चतुरसिंह, वगैरे मंडळींच्या पायांवर डोकें ठेवून गादीवर बसतांच–)

सर्व–(आनंदानें टाळयांच्या गजरांत) कुमारसिंह महाराज कीं जय ! (असें ह्मणतात.)

कुमार०–आजपर्यंत माझ्या पित्यानीं व वडील बंधूंनीं आपल्या शरीरास हाल अपेष्टा भोगून त्यांनीं केलेल्या श्रमाचें फळ

मला अर्पण केलें, त्याचा मी मोठ्या आनंदानें स्वीकार करतों. ज्या सद्गृस्थांनीं या कामीं श्रमाचा वांटा घेऊन आपली सहानुभूति दाखविली त्यांचेंही मी अभिनंदन करतों. मला लाभप्रद झालेल्या या सिंहासनाची इभ्रत राखून प्रजाजनास ममतेनें वागवीन, व यथान्याय त्यांचें मी पालन करीन, अशी मला उमेद आहे. (टाळयांच्या गजरांत खालीं बसतो.) आतां पदभ्रष्ट झालेल्या राजास ह्मणजे कांतिवर्म नांवाच्या आमच्या पूर्वींच्या कारकुनास शिक्षा देण्याचें मी विचित्रवीर्यावरच सोंपवितों. त्यांनीं वडिलांच्या संमतीनें त्यास यथायोग्य शासन करावें !

विचि०—मी या अधिकारास योग्य नसतां कुमारसिंह महाराजांनीं सोंपविलेली कामगिरी माझ्या हातून यथान्याय पार पडो, अशी त्या जगच्चालक प्रभुपाशीं प्रार्थना करतों. (पदभ्रष्ट राजास) कांतिवर्मराज, तुह्मी जे कांहीं अपराध केले आहेत त्याची मालिका पुन्हा उच्चारण्यांत कांहींच अर्थ नाहीं. तुह्मांस कांहीं गुन्हारद्दीचा पुरावा द्यावयाचा आहे काय ?

राजा—(कांतिवर्म) कांहीं नाहीं.

विचि०-यावरून अनेक अपराध तुमच्यावर शाबित झाले आहेत, हें सिद्धच होतें. (वळून) सिंधुराज महाराज, त्यांस काय शिक्षा द्यावयाची ती आतां आपणच सांगा ?

सिंधु०—याच्या अनंत अपराधांवरून या दुष्टास मरणापेक्षांही भयंकर शिक्षा पाहिजे. परंतु ज्या अर्थीं मी वाढविलेला वृक्ष आहे, त्या अर्थीं तो आपण होऊनच त्याचे मुळापासून छेदन करणें मला बरें दिसत नाहीं. या करितां याला हद्दपारीची शिक्षा द्या ह्मणजे झालें.

विचि०-आपल्या दयाळूपणाची व उदारत्वाची स्तुति करावी तेवढी थोडीच आहे. (वळून) कांतिवर्म, आज खरोखर तुमच्यावर परमेश्वराची पूर्ण कृपा आहे, असेंच समजलें पाहिजे. तुह्मांस हद्दपार करण्यांत येत आहे. (मंत्री विजयसेनास) विजयसेनजी, यास खुलें करा, आणि राज्यांत अशी दौंडी देववा कीं, येथून हा दुष्ट आपल्या राज्याची सीमा उल्लंघन करून जाईपर्यंत यास कोणी अन्न, वस्त्र किंवा आश्रय देऊं नये, दिल्यास त्यासही शिक्षा दिली जाईल.

विजय०-ठीक आहे.

विचित्र०-आतां विश्वसेनास शिक्षा सांगावयाची राहिली आहे. परंतु दुष्टाच्या संगतीनें अघोर कृत्य करणारांची संख्या नगरांत बरीच आहे. तेव्हां शोध करून त्यास शिक्षा देण्याचे वेळीं या अपराध्याचाही विचार करतां येईल. (वळून) प्रजाजनहो, पुन्हां एकवार कुमारसिंह महाराजांचा जयघोष करा, ह्मणजे दरबार बरखास्त करूं?

सर्व-राजाधिराज कुमारसिंह महाराजकी जय ! (त्रिवार जयघोष होतो, भालदार ' दरबार बरखास्त ' ह्मणून पुकारतात.)

पडदा पडतो.

षष्ठांक समाप्त.

आगाऊ आश्रयदात्यांचीं नांवें.

नांव	प्र.
मोखाडे (ठाणें)	
रा. रा. वि.कृ. देवधर, स.ओ.	१
,, ,, ग. म. कुंठे, का.म.क.	१
,, ,, दा. ना. जोशी, स इ.	२
,, ,, आ. आ. माने हे.मा.	१
,, ,, आंबर्डेकर, हा. अ.	१
मे० स. ज. उसमान, रें.फा.	१
रा. रा. शंकर आ. शेट	१
मे. नादिरशहा जी.अ.दुकान.	१
रा. रा. गो.आ.भांगरे, अ.मा.	१
,, ,, ना.व. कंट्राक्टर प. व.	१
,, ,, बापूराव ब. स. इ.	१
,, ,, वा. कृ. बरवे, का.प.व.	१
,, ,, स.ता. पाटील, मोखाडे	१
,, ,, दा.वा. धामणकर, त.	१
,, ,, ग. बा. अ. मास्तर	१
,, ,, ना. रा. मोंडकर, तलाटी	१
,, ,, श्री. ना. देवकुटे	१
वे. रा. रा. रा. अ. मुळे,	१
रा. ,, रा.ग.वैद्य दप्तरबंद का.	१
,, ,, भा. त्रि. साठे, व्या.	१
,, ,, रा. ना. प्रधान, अ. इ.	१
,, ,, ज. वि. कर्णिक अ. का.	१
,, ,, मो. वा. पुरंदरे का. म.	१
,, ,, रा. वि. दोंदे, स. इ.	१

नांव	प्र.
,, ,, बापू दाजी कदम.	१
,, ,, पां. कृ. सोनार,	१
,, ,, दि. गो. वाळामें	
भिवंडी.	
श्री. रा. स.ह. जोग, सु.प.व.	१
रा. रा. अ. र. पळसुलें,	१
,, ,, ग. र. पळसुलें,	१
,, ,, गो. ना. करंदीकर,	१
,, ,, रा. प. गाडगीळ,	१
,, ,, धुं. अ. जोशी,	१
,, ,, रा. गं. जोशी,	१
,, ,, वा. भि. जोशी,	१
,, ,, भा. ब. पिंपळखरे,	१
,, ,, रा. ल. गोडबोले,	१
,, ,, कृ. ना. गाडगीळ,	१
,, ,, ह. बा. आणि कंपनी,	१
,, ,, ना. गो. चक्रदेव,	१
,, ,, वि. बा. सोमण	१
,, ,, ग. वि. गुळवेलकर	१
,, ,, सि. के. वैद्य.	१
मे० यासिंद आमिरकाजी	१
रा. रा. म. ग. पेंडसे	१
,, ,, गो. ग. कानडे	१
,, ,, त्र्यं. वि. चिंचोरे	१
,, ,, म. कृ. जोगळेकर	१

डहाणु.

रा. रा. पुरुषोत्तम लालजी १
,, ,, जग. त्रिकम. दावडा. १
,, ,, छोटालाल गोविंदजी
,, ,, वा. शि. नाचणे, १
,, ,, ह. के. कर्णिक, १
,, ,, शेट ना. न. आढ्या २
,, ,, शे. मू. चंद्रमल २
,, ,, शेट छो. नरोत्तम २
,, ,, रामचंद्र वा. फाटक २
,, ,, सेक्रेटरी आर्यन ए. सो. २
,, ,, शेट लखमीदास कुबेर २
,, ,, पुरुषोत्तम प्रेमजी २
,, ,, नारायण दामोदर २
श्री. रा. ज. धों. करंदीकर २
,, ,, शेट चुनीलाल लक्ष्मण २
,, ,, अ. ना. खरे बी. ए. एल् एल्. बी. २
,, ,, पां. रा. करंदीकर २

उंबरगांव.

श्री. रा. द. ना. नाडकर्णी २
रा. रा. मा. ग. घोटे, अ. का. २
,, ,, वा. शि. आरेकर स. र. २
,, ,, अं. दा. भावे कारकून २
,, ,, ग. त्रिं. सानें, अ. सबइ. २
श्री. रा. गो. कृ. परांजपे, २
रा. रा. ग. मो. गांगल का. म. २

खोडाळे.

,, ,, ज. काळण, खर्डीकर १
,, ,, नथू महादू रौं. गा. १
,, का. दा. खटावकर, प. व. १
रा. रा. वि. ह. अंबेडकर, स्कू. मा. १
,, ,, सि. स. घांग किनिस्ते १
,, ,, वामन दे. मुळे, १
,, ,, ग. का. पाटणकर १

कसारा.

,, ,, वि. स. चव्हाण, स्कू मा. १
मे. जल्लु रामजी मिस्त्री, *२
रा. रा. भ. म. चैतन्य. १

खर्डी.

रा. रा. वि. गो. नाईकरें. फा. आ १
,, ,, द. वा. भदे, १
,, ,, वा. ह. अग्निहोत्री, १
,, ,, सा. आ. सिरोडकर, १
,, ,, पां. ना. भदे, १
,, ,, रा. शं. डिके, स्टे. मा. १

के. माहिम

श्री. रा. गंगाधर मोरेश्वर दांडे० २
रा. रा. रंगो रामकृष्ण केळकर २
,, ,, रं. कृ. दांडेकर बी. ए. २
,, ,, लक्ष्मण सखाराम दांडे० २
,, ,, धोंडो विष्णु दांडेकर, २
,, ,, सेक्रेटरी ने. ज. लाय० २
,, ,, रंगो काशिनाथ पेंडशे २
श्री. रा. वा. ग. दांडेकर, के. २

पंढरपूर.

रा. रा. गो. ग. आपटे २
,, ,, जी. एच. परिचारक कं. २
,, ,, द. ना. मांगले, २
,, ,, शं. रं. मांगले, २
,, ,, गो. अ. नातु. १

रा. रा. वि. शि. जोग, वकील २
,, ,, पं. धों. भोसेंकर, १
,, ,, वा. श्री. नेवासकर, १
,, ,, से. स. आ. ध. तत्व प्रसारक मंडळी, २

खालापूर.

,, ,, गो. ब. जोशी, हे.मा. २
,, ,, मो. वा. परांजपे, अ. २
,, ,, वि. गो. भागवत १
,, ,, पु. वा. वत्सराज, १
श्री. रा. सी. ग. मुळे, इ. १
,, ,, शि. वि. ठोसर, १

शहापूर.

,, ,, मो. ना. कर्वे १
,, ,, म. सि. कुळकर्णी १
,, ,, दा. त्रिं. सासवडकर, १
,, ,, पु. सि. कुळकर्णी, १
,, ,, ना. ज. परांजपे. १
,, ,, नाना महादजी पो.ज. १
,, ,, गोपाळ रामचंद्र कर्वे १
,, ,, वि. मो. जोशी, १
,, ,, शंकर वामन जोशी, १
,, ,, भि. मो. देव. १

मनमाड.

सेक्रेटरी श्री शिवाजी लायब्ररी, मनमाड (नाशीक) २
रा.रा. द. स. रिसवडकर. १

येवलें

रा.रा.ल.स.आठवले,का.मु.कोर्ट१
श्री. रा. शेट सुकराम ओटाजी, २
रा. रा. स. दा. बरवे, येवलें २
शेट किसन नंदराम येवलेंकर, २
,, ,, दामोदर शालिग्राम २
,, ,, वि. भा. पोटादकर गु. २
शेट पीतांबर एकनाथ गुज० २
,, ,, श्रीधर गोवर्धनदास १
रा.रा.स. मा. कुळकर्णी, येवलें २
,, ,, रा.सा. पंडित ऑ.माजि. २
,, ,, कारुळकर, नाझर २
,, ,, सेक्रेटरी ने. ज. ला. २

भडगांव

,, ,, सखाराम कृ. मोहरीर २
,, ,, रा. विठ्ठल सहस्त्रबुद्धे २
,, ,, वामन पु. आरकडी २

वसई

,, ,, वा. दा. तिरोडकर, २
,, ,, सदानंदकाका वैद्य वसई २

वाडें (ठाणें)

,, ,, कृ. स. सहस्त्रबुद्धे, * २
,, ,, ल. ब. जोशी, लो. १
,, ,, वा. म. देवधर स.ओ. १
,, ,, पां. ल. ठोसर, स. इ. १

मोखाडे पेटा.

,, ,, मा. रा. पेठे, सूर्यमाळ. २
,, ,, वा. श्री. भडसावळे, २
,, ,, म. वि. ठोसर, तलाटी १
,, ,, सी.स घैसास, वेरिस्ते १
,, ,, मों. कृ. साठे, मेढें १
,, ,, कृ. ब. गोडसे कारेगांव १
,, ,, प. ह. जोशी १
,, ,, पां. रा. भिडे, पळसुंठे १
रा. रा. ना.सि. दामले, आशे १

त्रिंबक.

रा. रा. ना. वि. घैसास, त्रिंबक १
,, ,, पु. स. फडके, त्रिंबक १
,, ,, दा. ना. मोरे, त्रिंबक १
,, ,, भास्कर त्रिंबक काळे, १

ठाणें.

,, ,, त्रिं. वि. गद्रे, का. क. १
,, ,, वि. गो. आठवले, १
,, ,, दि. ग. भिडे, का. क. १
,, ,, गं. ग. दामले (ठाणें) १

कल्याण.

,, ,, त्रिं. ना. पेठे सर इ. १
श्री. रा. लक्ष्मण विष्णू फडके, २
रा. रा. वा. गं. जोशी कल्याण. २
,, ,, वा. स. मोडक तलाटी १

सोलापूर जिल्हा.

,, ,, वा. तु. मुंडफण पांगरी २
श्री. रा. ना. भा. देशपांडे, २
रा. रा. रा. मो. अभ्यंकर, बार्शी १
,, ,, बा. दा. देशपांडे मा. माढें २
,, ,, सेक्रेटरी वाचनगृह माढें २

बांद्रे.

रा. रा. ब. आ. जोशी फा. ऑ. १
,, ,, र. बोरकर, क्ला. फा. १
,, ,, इं. धों. मारवाडी द-
हिटनेंटकर घोडनदी. १
,, ,, वि. दे. घोडनदी १
,, ,, रें. फा. आ. श्रीगोंदें १
,, ,, रें. फा. आ. कोपरगांव २
,, ,, रें. फा. आ. नगर २

रा. रा. रा. ज. विध्वंस तलाटी २
,, ,, ह. रा. जोशी (रोहें) १
,, ,, कृ. अ. जोशी, कुंद १
,, ,, वा. म. पाटील, मु. दहेली. १
,, ,, हे. चिं. देव इनाम-
दार, (सं. चिंचवड) शिवणें, २
रा. रा. शं. ग. देशपांडे शिवणें, २
,, ,, मो. गोऱ्हे, उरसें, २
,, ,, ग. ना. गोऱ्हें उरसें २
,, ,, वि. ब. जानवेकर, पुणें *८
,, ,, भा. रा. घारपुरे, कर्जत २
,, ,, पटवर्धन, आद्रा (बंगाल) १
,, ,, ल. धों (सं ग्वाल्हेर) २
,, ,, गो. वा. जोशी, नागपूर १
श्री रा. पु. के. गडबोले,
कंट्राक्टर प. व. डी. घोटी- १
रा. रा. वा. गो. भगत का. कं. १
,, ,, म. ह. वैद्य का. कं. १

मुंबई.

,, ,, हरी वामन देवळें २
,, ,, मो. गणपत देसाई, १
,, ,, डी. एस्. वेळणकर, १
,, ,, विश्वनाथ के. लिमये, १
,, ,, त्रिंबक मोरेश्वर जोशी, १
,, ,, वासुदेव वि. जोगळेकर १
,, ,, नारायण रा. डोंगरें, १
,, ,, अनंत मारुती गोंदकर १
,, ,, नरसिंह वा. सांपटणेकर १
,, ,, ग. पां. वेलकर, २

(बाकी नांवें 'वी. मो. पु.' येतील.)

* फुली शिवाय दोन प्रती आहेत. त्यांत सं. वीरमोहिनी ना. १ प्र. स.